

१५ जून १९६६ | ४० पैसे

# अवमूलन !

मग ते अमेरिकेच्या दडपणामुळे आलेले असो की आपण राजीखुषीने व पूर्ण अक्कलहुषारीने केलेले असो, अर्थ एकच ☐ आज आपण दिवाळखोर आहोत ☐ या दिवाळखोरीची कारणे कोणी काहीही देवोत एक कारण हे जरूर आहे, की आपले नियोजन पायाशुद्ध नाही. 'आधी कळस मग पाया रे' हे परमार्थात ठीक आहे. पण प्रपंचात, ऐहिकात पाया आधी, कळस मग! पायाशुद्ध नियो-जन याचा ठोस अर्थ साधा आहे. अन्न–वस्त्र–निवारा–शिक्षण–संरक्षण या माणसाच्या मूलभूत गरजांबाबत माणूस 'स्वतंत्र' असावा. स्वावलंबी असावा. अन्नस्वावलंबन–आमच्या शेतात गरजे एवढे अन्न निर्माण करू, जे पिकेल ते आणि तेवढेच खाऊन राहण्याची शिस्त प्रथम अंगी बाणवू ! मग वेळप्रसंगी, अडीअडचणीला, कोणाचे चार दाणे उसने आणले–समजू शकते ! पण रोजचा तुकडा दुसऱ्याने चारावा–ही शुद्ध भीक आहे. 'मदत' वगैरे तज्ज्ञांचे शब्दजंजाळ सब झूट आहे. संरक्षणदेखील भीक मागून आण-लेल्या शस्त्रास्त्रांनी होऊ शकत नाही हे पाकिस्तानच्या पॅटन-पराभवाने सिद्ध झाले आहे. . . .

माणूस

# पथ्ये कोणती ?

शस्त्रे व ती वापरणारा माणूस यांचे काही परस्परनाते असते. नव्या शस्त्रांबरोबर नवा माणूस जन्मावा लागतो.

**नवे तंत्र नव्या माणसाची अपेक्षा करत असते. आणि हे परस्परनाते उधार-उसनवारीने निर्माण होत नसते. ते निर्माण होते--आपल्या अंतर्यामीची, आपल्या सभोवतीची साधनसामग्री विकसित करण्याची, गतिमान करण्याची माणसाची प्रेरणा जागी असेल तर !**

अशी प्रेरणा जागृत असेल, सर्व क्षेत्रात स्व-तंत्राने विकास घडवून आणण्याची दृष्टी असेल, धडपड असेल तरच मदत ही उपकारक ठरते, पोषक ठरते.

नाहीतर न पेलणारे एक प्रचंड ओझे हेच तिचे खरे स्वरूप.

गुलामगिरी, भ्रष्ट अनुकरण ही तिची फलिते.

हे ओझे कमी व्हावे म्हणून अगदी प्रामाणिक बुद्धीने अवमूलनाचा निर्णय घेतला गेला असे समजू !

पण येवढ्याने भागत नाही. यातून स्वयंपूर्णता प्राप्त झाली नाही तर ही लज्जास्पद माघार दर खेपेस घ्यावी लागेल, दर पाच-दहा वर्षांनी अवमूलन करावे लागेल.

सरकारचे प्रवक्तेच सांगत आहेत, की अगदी नाइलाज म्हणून ही शस्त्रक्रिया केलेली आहे. पण याबरोबरच अवश्य ती पथ्ये पाळली नाहीत तर रोग उलटण्याचाच संभव अधिक.

पथ्ये कोणती ?

श्री. स. का. पाटील यांनी ती परखडपणे सांगितली आहेत.

*" केवळ अवमूलनाने आर्थिक डोलारा सावरता येणार नाही. त्याला सामाजिक व आर्थिक शिस्तीची जोड दिली पाहिजे.* उत्पादनात वाढ करून नासधूस थांबवली पाहिजे. शासनयंत्रणेत सुधारणा घडवून आणली पाहिजे. येत्या दहा वर्षांत निर्यात तिपटीने वाढवून चोवीसशे कोटी रुपयांपर्यंत नेली पाहिजे...."

[ मुखपृष्ठ ३ पाहा ]





वर्ष सहावे : अंक दुसरा : १५ जून १९६६

किंमत चाळीस पैसे : वार्षिक वर्गणी दहा रुपये

संपादक : श्री. ग. माजगावकर

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.


* * *

'माणूस'चा यापुढील अंक

१ जुलैऐवजी

१० जुलैला प्रसिद्ध होईल.

निवेदन पाहा – मुखपृष्ठ १, २ व ३

—व्यवस्थापक

* * *


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# देश-विदेश

## ☐ अमेरिकेचे दुःख

गरीब बिचारी अमेरिका ! एवढे प्रचंड, एवढे महाबलाढ्य, एवढे ऐश्वर्यसंपन्न राष्ट्र, पण दुःखी आहे, कष्टी आहे. या अफाट सामर्थ्याचा, ऐश्वर्याचा काहीच उपयोग नाही का, असे तिला वाटू लागले आहे. कारण जगातले कोणतेच राष्ट्र तिच्यावर मनापासून प्रेम करीत नाही.

जगातले लोक तरी औरच आहेत. ते अमेरिकन लोकांवर, अमेरिकन संस्कृतीवर, फार काय अमेरिकन सामर्थ्यावर आणि संपत्तीवरही प्रेम करतील. पण अमेरिकन राष्ट्र म्हटले की, ते ज़रा भुवया आकुंचित करून आपल्या प्रेमाचे माप मागेच घेतील.

असे का हे अमेरिकनांनाही कळत नाही. १७७६ सालचा अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा या फ्रेंचांच्या जाहीरनाम्यापेक्षा कितीतरी भव्य, उदात्त आहे. पण स्वातंत्र्य, लोकशाही, समता हे शब्द निगडित झाले आहेत, फ्रेंचांशी. अमेरिकेत इतकी वर्षे अखंडपणे लोकशाही यशस्वी रीतीने चालू राहिली आणि फ्रेंचांपेक्षा ती कितीतरी स्थिर राहिली. पण वरील शब्द उच्चारले की, आठवण होते फ्रेंचांची. चुकून माकून अमेरिकेचे नाव उच्चारले जाते एवढेच.

बरे, गेल्या काही वर्षांमध्ये अमेरिकेने गरीब, अविकसित राष्ट्रांच्या मदतीसाठी म्हणून अक्षरशः अब्जावधी डॉलर्स ओतले आहेत. दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राने परक्यांच्या मदतीसाठी एवढे पैसे ओतले नाहीत. जगातला कुठलाही देश अगदी रशिया आणि चीनसुद्धा या बेमाप मदतीच्या लाभावाचून राहिले नाहीत. पण एवढेही असून गरिबांचा कैवारी म्हणून कुणी अमेरिकेकडे बोट दाखवते काय ? नाव नको ! गरिबांचा कैवारी देश म्हटला की कुणीही चटकन रशियाकडेच बोट दाखवते.

आणि वेगवेगळ्या देशांतील जनतेचे स्वातंत्र्य, स्वयंनिर्णयाचे हक्क अबाधित राखण्यासाठी अमेरिकेने किती मनस्ताप सहन केला, किती अमेरिकन्स बळी दिले ! कोरिया, बर्लिन, क्यूबा, व्हिएटनाम आदी किती उदाहरणे सांगावीत. पण या दर प्रसंगी जगातल्या लोकांनी अमेरिकेलाच मूर्ख ठरवून फाडून खाल्ले ना !

हे असे का व्हावे हे अमेरिकनांना कळत नाही. त्यामुळे ते दुःखी आहेत, कष्टी आहेत. थोडेसे विकलही आहेत.

पण आता नुकतीच नव्याने एक जाणीव अमेरिकनांना होऊ लागली आहे. ती तर फारच भयंकर आहे.

अमेरिकेने एवढ्या जणांना मदत केली. कितीतरी राष्ट्रांना संरक्षण दिले, दुसऱ्या महायुद्धानंतर अवघ्या पश्चिम युरोपला राखेतून उभे राहण्यास मदत केली. आता व्हिएतनाममध्ये अमेरिका जरा अडचणीत आहे. युरोपियन राष्ट्रांनी आपणांला काही मदत करावी, अशी अमेरिकेची इच्छा आहे. आपला उपकारकर्ता संकटात आहे हे पाहताच सारी पश्चिम युरोपियन राष्ट्रे आपल्या मदतीला धावून येतील, अशी तिची खात्री होती.

पण ह्याय ! 'कठिण समय येता कोण कामास येतो '— हेच खरे. एका तरी युरोपियन राष्ट्राने आपला एक सैनिक व्हिएतनाममध्ये अमेरिकेच्या बाजूने लढायला पाठवला असेल तर शपथ. एवढे ब्रिटन, अमेरिकेचे सर्वांत जवळचे मित्र राष्ट्र. दुसऱ्या महायुद्धात अमेरिका धावून आली नसती तर ब्रिटनची राखरांगोळी होणे कठीण नव्हते, असे ब्रिटन तरी अमेरिकेच्या मदतीला येते आहे काय ? मुळीच नाही. अनेक सबबी सांगून ब्रिटन स्वतः व्हिएतनामपासून दूर राहण्याचा प्रयत्न करते आहे.

कृतज्ञता हा गुण युरोपियन राष्ट्रांमध्ये मोठ्या प्रकर्षाने आढळतो असे म्हणवत नाही ते यामुळेच.

जगातील कम्युनिझमचा प्रसार थांबवावयाचा हे कार्य अमेरिकेने आपल्या शिरावर उचलले व त्यासाठी वाटेल तो खर्च सोसला. आपले सैन्यबळ पणास लावले. साऱ्या जगात आपले सैन्य ठिकठिकाणी विखरून ठेवले. पश्चिम युरोपला दुसऱ्या महायुद्धानंतर रशियन आक्रमणाची मोठी भीती वाटत होती. म्हणून पश्चिम युरोपच्या संरक्षणासाठी तेथील राष्ट्रांशी अमेरिकेने अनेक करार केले. त्यांना शस्त्रास्त्रे पुरवली आणि आपले सैन्य तेथे ठेवले.

या युरोपियनांनी किती फायदा घ्यावा. अमेरिका म्हणजे अनंत ऐश्वर्याचे, अमाप सामर्थ्याचे भांडार आहे अशीच युरोपियनांनी कल्पना करून घेतली व तिला आपल्या फायद्यासाठी वाटेल तसे पिळून काढले.

## 'नाटो 'चा पुनर्विचार

पश्चिम युरोपियन राष्ट्रांच्या संरक्षणासाठी अमेरिकेने केलेल्या नाटो करारानुसार त्या राष्ट्रांच्या मदतीला अमेरिकेने धावून जावयाचे, अशी तरतूद आहे. पण अमेरिकेवर संकट येताच या राष्ट्रांनी अमेरिकेच्या मदतीला धावून जावे अशी उलट तरतूद या करारात मुळी नाहीच. त्यामुळे ही सारी युरोपियन राष्ट्रे कशी सुखात आहेत.

परंतु अमेरिकेने मात्र आपल्या कर्तव्यात थोडीही कसूर केलेली या राष्ट्रांना

चालत नाही. अमेरिकेचे कित्येक लाख सैनिक नाटो करारानुसार युरोपियन भूमीवर आहेत. त्यांपैकी सुमारे अडीच लाख पश्चिम जर्मनीत आहेत. व्हिएतनाम युद्धात अमेरिकेवर चांगलाच ताण पडतो आहे. त्यामुळे पश्चिम जर्मनीतील आपले सुमारे तीस हजार सैनिक काढून ते व्हिएतनाममध्ये पाठवण्याचा संकल्प अमेरिकेने जाहीर केला. त्याबरोबर पश्चिम जर्मनीने आरडाओरडा सुरू केला आणि अमेरिका आपल्या करारांच्या शर्ती पाळत नाही, असे आरोप करावयास सुरुवात केली.

फ्रान्सचा पवित्रा तर याच्या अगदी उलट. युरोपियन भूमीवर सैनिक ठेवून आम्हा युरोपियनांच्या सार्वभौमत्वावर गदा आणणारे अमेरिकन राष्ट्र कोण लागून गेले आहे, असा खडा सवाल फ्रान्सचा अध्यक्ष जनरल द गॉलने टाकला आहे. आणि फ्रेन्च भूमीवरून आपले सैन्य काढून घेण्यास अमेरिकेला सांगितले आहे. एवढे झाले तरी नाटो करारच नको असे काही फ्रान्स म्हणत नाही, म्हणजे प्रसंग पडल्यास अमेरिकेने आमच्या मदतीला धावलेच पाहिजे, आम्हांला शस्त्रे पुरवलीच पाहिजेत, पण अमेरिकेचे सैन्य मात्र आमच्या भूमीवर नको, असे फ्रान्स आणि इतर काही युरोपियन राष्ट्रांचे म्हणणे आहे.

कारण उघड आहे. आता अमेरिकेची युरोपमधील उपयुक्तता कमी झाली आहे. थंडया युद्धाच्या ऐन भरात रशियाची युरोपियनांना भीती वाटत होती. आता काय रशियाच मऊ झालेले आहे. तेव्हा आता अमेरिकनांचा उपयोग संपला. द्या त्यांना बाहेर घालवून, अशी त्यांची वृत्ती आहे.

हे सारे आता अमेरिकेला प्रकर्षाने जाणवू लागले आहे. दुसऱ्या महायुद्धात युरोपच्या मुक्तीसाठी आपण जे रक्त सांडले त्याची आठवण आता युरोपियन्स विसरले आहेत, हे अमेरिकेला कळून चुकले आहे. आणि कम्युनिझम विरोधाची आघाडीही आपली एकखांबी आहे हेही आतापर्यंत अमेरिकेच्या ध्यानात आले आहे. या कम्युनिझम विरोधाच्या कार्याकडे बाकीची युरोपियन राष्ट्रे गंमतीने बैलाच्या झुंजीचा खेळ पाहतात तशी दूर उभी राहून अमेरिकेला टाळ्या देत खेळ बघताहेत. रिंगणात मात्र एकटीच अमेरिका उभी आहे.

ही जाणीव धक्का देणारी आहे. अमेरिकेला हे कळत आहे हे निश्चित. त्यामुळेच नाटो आणि इतर करारांच्या बाबतीत अमेरिकेने फेरविचार चालू केला आहे.

असे हे लबाड युरोपियनांनी फसविलेले साधे भोळे (!) अमेरिकन राष्ट्र सध्या दुःखी आहे ! कष्टी आहे !

●

**श्री. ब. मो. पुरंदरे**

*यांची नवी ऐतिहासिक कादंबरी*

# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २

# विचार धारे

समीर

## विज्ञानाचा विस्तार कसा करावा ?

" विज्ञान आणि तंत्रज्ञान–विकासाच्या क्षेत्रात मोठ्या योजनांवर भर देण्याची हल्ली जी सर्वत्र प्रवृत्ती दिसून येते तिला सरकारने आळा घातला पाहिजे, " असे मत अमेरिकेच्या ' नॅशनल अकॅडमी ऑफ् सायन्सेस् 'चे अध्यक्ष डॉ. फ्रेडरिक सीझ् यांनी नुकतेच नव्या दिल्लीचे भेटीत प्रकट केले. ' अमेरिकेत सरकार व विज्ञान यांचे संबंध ' या विषयावर भाषण करताना ते म्हणाले :

" हल्ली अमेरिकेत ही प्रवृत्ती वाढली आहे. एकीकडे कॉंग्रेसचे ( विधानसभेचे ) सदस्य व इतर राजकारणी मंडळी शास्त्रज्ञांचा सल्ला न घेता आपल्या भागासाठी मोठ्या शास्त्रीय योजना मिळविण्याची खटपट करतात व त्यासाठी दडपण आणतात, तर दुसरीकडे अनेक लहान योजनांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवरून वैज्ञानिक कार्यक्रमाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात तोल राहिलेला नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी सबंध देशभर लहान योजना पसरविण्याची आवश्यकता आहे. "

अमेरिका खंडात गोऱ्या माणसांची वसाहत झाली, तेव्हापासून अमेरिकन विज्ञानाच्या प्रगतीचा इतिहास पाहिला तर असे दिसते की एका प्रसिद्ध ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञाने आपली अफाट संपत्ती अमेरिकेत विज्ञान-विस्तार व्हावा म्हणून दान केली, तेव्हा केवळ ' कर्मधर्मसंयोगा ' ने अमेरिकेच्या वैज्ञानिक प्रगतीला प्रारंभ झाला. या पैशाच्या बळावर अमेरिकतील पहिली ' नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ् सायन्स ' स्थापन झाली. नंतर गेल्या शतकाच्या मध्यास सरकारने विश्वविद्यालये स्थापन करण्यासाठी जमिनी दिल्या व प्रत्येक राज्याला स्वतःच्या हद्दीत उच्च शिक्षणाची संस्था प्रस्थापित करण्यास प्रोत्साहन दिले. याच सुमारास १८६९ साली ' नॅशनल अकॅडमी ऑफ् सायन्सेस् ' ही राष्ट्रीय संस्था स्थापन झाली व तेव्हापासून अमेरिकेचे वैज्ञानिक धोरण ठरविण्याच्या कामी ही संस्था महत्त्वाची कामगिरी बजावीत आहे.

सुरुवातीला बरेच दिवस अमेरिका पश्चिम युरोपच्या तांत्रिक मदतीवर अवलंबून होती, पण अंतर्गत युद्धाच्या वेळी तिला स्वतःचे तंत्रज्ञान वाढविण्याची गरज भासली, आणि त्यानंतर पहिले महायुद्ध, १९२९ चा मंदीचा काळ आणि दुसरे महायुद्ध या घटनांमुळे तर ही गरज सारखी वाढतच गेली आणि शास्त्रीय संशोधनाचे महत्त्व अधिकाधिक पटू लागले. त्यामुळे अंतर्गत युद्धानंतर अमेरिकेत

विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची खूप झपाट्याने प्रगती झाली आहे. अमेरिकन सरकार वैज्ञानिक संशोधनाच्या कार्यक्रमावर जो खर्च करीत असते त्यात दुसऱ्या महायुद्धानंतर खूपच भर पडली आहे व दरवर्षी हा खर्च वाढतच आहे. संशोधन कार्यक्रम सर्वत्र देशभर चालू असून त्यावर केंद्रीय सरकारच्या निरनिराळ्या संस्था प्रचंड पैसा खर्च करीत आहेत. येत्या १० वर्षांत अमेरिकेच्या राष्ट्रीय खर्चाचा १० ते १५ टक्के भाग वैज्ञानिक व तत्सम विकास-कार्यावर खर्च होणार आहे.

## • सरकारी डॉक्टरांचे कागदी घोडे


अमेरिकेतील हार्वर्ड मेडिकल स्कूलचे डॉ. वॉल्टर उट्शर हे हाडांच्या रोगांचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तज्ज्ञ आहेत व ते वर्ल्ड हेल्थ आर्गनायझेशनचे सल्लागार म्हणून भारतात चार महिने राहून नुकतेच गेले. त्यांच्या मते हाडांच्या क्षयासारख्या रोगाचे निर्मूलन पश्चिमेत झाले असले तरी अजून हिंदुस्थानात झाले नाही. तरीदेखील येथे अनावश्यक शासकीय नियमांवर फार वेळ फुकट घालविण्यात येतो. येथल्या सरकारी डॉक्टरांना कागदी घोडे फार नाचवावे लागतात, आणि फायली पुढेमागे करण्यात त्यांचा फार वेळ जातो. त्यांचे दुसरे महत्त्वाचे मत म्हणजे येथल्या वैद्यकीय संस्थांतून वाजवीपेक्षा जास्त मोठा नोकरवर्ग असतो, व त्यात कमी उपयोगाच्या अशा खालच्या दर्जाच्या नोकर मंडळींचा अधिक भरणा असतो.

## • प्रत्येक शहराची समस्या

मोठ्या शहरांच्या समस्या इथून तिथून सारख्याच. जपानमधल्या ओसाका शहराचे मेयर श्री. कोरू चुमा नुकतेच दिल्लीला भेट देऊन गेले. तेव्हा ते म्हणाले, "नगर–विकासाच्या बाबतीत ओसाका व दिल्ली या शहरांच्या पुढे सारख्याच समस्या आहेत. ज्याप्रमाणे दिल्लीसाठी एक मास्टर-प्लॅन आखला आहे त्याचप्रमाणे ओसाकाच्या विकासासाठी व सुधारणेसाठी एक २५-वर्षीय योजना तयार करण्यात आली आहे. गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करण्याच्या बाबतीत ओसाकाने खूप प्रगती केली आहे. प्रथम या वस्त्या खाली करण्यात येतात व तेथल्या रहिवाश्यांना तात्पुरत्या शिबिरात पाठविण्यात येते. नंतर त्यांच्यासाठी नगरपालिकेने नवीन घरे बांधली की त्यांना तेथे राहण्यासाठी परत आणण्यात येते.

दिल्लीप्रमाणे ओसाकापुढेही लोकसंख्येचा प्रश्न आहे. ओसाकाची आजची लोकसंख्या ५० लाख असून दरवर्षी एक लाख लोक नवीन येत असतात. पण त्यांना शहराच्या आत स्थायिक होऊ देण्यात येत नाही, त्यामुळे ते ओसाका भोवतालच्या दहा लहान शहरांत पसरले आहेत."

•




## ☐ रामायण आणि ' मातीचा गुण '

मद्रासमधील एका विद्वान प्रवचनकारांनी रामायणातील स्थलाबाबत नवीनच काही सिद्धांत प्रस्थापित केले आहेत म्हणतात. त्यांच्या मते रामायणातील 'पंपा' म्हणजे आजचे मुंबई बेट असावे. पंचवटीहून – म्हणजे नासिकहून – श्रीराम पश्चिमेकडे गेले असा उल्लेख येतो त्यावरून त्याने हा तर्क केला आहे. सध्याचे माटुंगा हे त्या वेळी बेट होते. पूर्वीचे मातंग ऋषींचे ते निवासस्थान. या स्थानाचे रामायणात जे वर्णन आहे, ते वीस वर्षांपूर्वीच्या माटुंग्याला अगदी बरोबर लागू पडते, असे त्या विद्वान प्रवचनकारांचे म्हणणे आहे. प्रभु रामचंद्राची वाट पाहत शबरी याच प्रदेशात थांबली होती. तिच्या पुण्यप्रद निवासामुळेच त्या प्रदेशाला पावित्र्य आले. आजही माटुंगातील जनता धार्मिक आणि पैसेवाली आहे याचे कारण हेच होय... सदरहू प्रवचनकार पुढे म्हणतात, "श्रीराम दक्षिणेकडे जात असताना हल्लीच्या तंजावर जिल्ह्यात येऊन पोचले. त्याबरोबर लक्ष्मणाच्या वृत्तीत एकदम फरक पडला. आपले – म्हणजे लक्ष्मणाचे– धनुष्य रामाने स्वतः वाहून नेले पाहिजे असा आग्रह त्याने धरला. या उद्धट वर्तणुकीबद्दल लक्ष्मणाला दोष देणे योग्य होणार नाही. या प्रदेशाचाच तो गुण आहे असे सीतामाई म्हणाली. अजूनही या भागात जाणाऱ्या लोकांना हा अनुभव येतो. माणसे एकाएकी उद्दाम आणि उद्धट होतात. त्यांच्या मनाचा तोल एकाएकी जातो. येथील हवामानाचा हा परिणाम असावा. लक्ष्मणावरही या हवामानाचा परिणाम झाला असेल. दुसरे काय ? "

वर्तमानपत्रे चाळताचाळता सहज हे नवीन संशोधन पाहण्यात आले. पंपा नगरी म्हणजेच मुंबई. माटुंगा म्हणजे मातंगऋषींचे पूर्वीचे निवासस्थान. हे शोध मला महत्त्वाचे वाटले. श्रीरामप्रभू बॉम्बेला येऊन गेले होते ही माहिती कोणाला महत्त्वाची वाटणार नाही ? मुंबईच्या सध्याच्या भरभराटीचे हेच तर कारण नसेल, अशीही शंका मनात डोकावून गेली. रामाचे पावन पाय लागल्यावर एवढा लाभ पदरी पडणे यात अशक्य काय ? (मुंबईत काही राम नाही असे म्हणणाऱ्यांनी आता तरी धडा घ्यावा.) माटुंगा आणि मातंगऋषी यांतील साम्यही आश्चर्यकारक आहे. पुराणिकबुवा म्हणतात तसे असेलही. नाही कोणी म्हणावे ! मातंगऋषींचा आश्रम पूर्वी तिथे असेलही. एरवी माटुंगा हे नाव पडण्याचे काय कारण ? मला

तर वाटते, मुंबईतल्या अनेक जुन्या नावांचा शोध या नव्या दृष्टीने घेता येण्यासारखा आहे. 'पायधुणी' हे नाव का पडले असावे हे मला इतके दिवस गूढ वाटत होते. सीतामाईने त्या ठिकाणी आपले पाय धुतले नसतील कशावरून? म्हणूनच त्या स्थळाची स्मृती या नावाने लोकांनी ठेवली असावी. नाहीतर हे नाव उगीचच का पडेल?

माझ्या एका सुशिक्षित मित्राला हा तर्क सांगितला तेव्हा त्याने गंभीर मुद्रा केली. थोडासा विचार करून तो म्हणाला, "तुझ्या म्हणण्यात तथ्य आहे. 'फाउंटन' हे नावदेखील असेच असेल. त्या भागातून हिंडताना रामांच्या वल्कलांच्या खिशातून फाऊन्टनपेन खाली गळून पडलं.' 'फाउंटन' ... 'फाउंटन असा सगळीकडे आरडाओरडा झाला असेल. अन त्यावरनंच 'फाऊंटन' हे नाव पडलं असेल. धोबीतलाव म्हणजे रामायणातील तो प्रसिद्ध धोबी –"

माझ्या मित्राचा हा चावटपणा मला बिलकुल आवडला नाही. मोठी माणसे अभ्यासपूर्वक संशोधन करतात. काही महत्त्वाचे सिद्धान्त मांडतात, त्याची अशी चेष्टा करणे मला बरोबर वाटत नाही. तंजावरच्या प्रदेशातील उद्धटपणाची गोष्ट मला गंभीरपणे विचार करण्यासारखी वाटते. त्या भागात गेल्यावर म्हणे लक्ष्मण एकदम उद्धटासारखा वागायला लागला. "माझं धनुष्य रामानं वाहून नेलं पाहिजे" असा हट्ट धरून बसला. हा इथल्या मुलुखाचा दोष, लक्ष्मणाचा दोष नव्हे, असे सीतामाई म्हणाली. ही सगळी मला गंभीरपणे विचार करण्याची गोष्ट वाटते. असतो काही काही मुलुखाचा गुण! तिथल्या हवामानात माणसांचा तोल जातोच, माणसे उद्धट आणि उर्मट होतातच, असे पुराणिकबुवा सांगतात ते खोटे नसावे. मी कोकणात गेलो असताना तिथल्या एका रसिक विद्वानांनी अशीच गोष्ट सांगितली होती. एकदम म्हणे सीतेला समुद्र पाहण्याची इच्छा झाली. म्हणून श्रीराम, सीता आणि लक्ष्मण यांसह पश्चिमेकडे आले. (याच प्रवासात तर ही बॉम्बेट्रिप झाली नसेल? शक्यता आहे.) सीतेने समुद्र पाहिला. सर्वांनी समुद्रात स्नान केले. मग हळूहळू मंडळी दक्षिणेकडे उतरली. परशुरामाच्या भूमीत आली. तेथे आल्याबरोबर लक्ष्मणाच्या मनोवृत्तीत एकदम फरक पडला. रामाची सेवा करायचे व्रत त्याने एकदम टाकून दिले. पाणी भरणे बंद, हातात धनुष्य घेऊन कुटीचे रक्षण करीत बाहेर उभे राहणे बंद. सगळे बंद. लागला उलट रामाशी भांडायला, "... तुमचं आपलं ठीक आहे! तुम्हांला सीतामाई आहेत. लोकप्रियता आहे. पण आमचं काय? ... आम्ही कुठवर अशी हमाली करून मरायचं?"...... श्रीराम आणि सीता लक्ष्मणाचा हा अवतार पाहून थक्कच झाले. त्यांना काही बोलणंच सुचेना. एक महिनाभर लक्ष्मणाने असा त्रास दिला. रोज भांडण, रोज कटकटी. शेवटी आंबाघाट चढून मंडळी परत घाटावर दाखल झाली. त्याबरोबर लक्ष्मणाची वृत्ती एकदम बदलली. पुन्हा तो आज्ञाधारक

झाला. काही न बोलता मुकाटयाने पाणी आणू लागला. आश्रमाचे रक्षण करीत ताठ उभा राहिला. उभयतांची मनोभावे सेवा करू लागला. हा पुन्हा काय चमत्कार झाला हे प्रत्यक्ष श्रीरामांनाही कळले नाही. बरोबर असलेल्या एका विद्वान ऋषींना त्यांनी हा चमत्कार सांगितला तेव्हा ते ऋषी हसून म्हणाले, " थांबा, तुम्हांला पुन्हा हा चमत्कार दाखवतो. " त्यांनी आपल्या कमंडलूतील मूठभर माती काढली आणि लक्ष्मण बसत असे त्या हरीणजिनाखाली पसरून ठेवली. काम संपवून लक्ष्मण आपल्या आसनावर बसला न बसला तोच ताड्कन उठला. रामाला म्हणाला, "..., तुमचं ठीक आहे हो. तुम्हांला लोकप्रियता आहे. खायला-प्यायला मिळतंय, सीतामाई आहेत. पण आमचं काय ? तुमच्यामुळं आमचं ' करिअर ' खलास होतंय याचा काही विचार ! " ऋषिवर्यांनी हळूच ते आसन दुसरीकडे सरकवून ठेवले. मग मात्र लक्ष्मण पुन्हा पहिल्यासारखा आज्ञाधारक झाला. नम्रतेने वागू लागला. एक शब्दही बोलेनासा झाला. स्तिमित झालेल्या रामचंद्राकडं पाहून ऋषिवर्य म्हणाले, "बाबारे, यात लक्ष्मणाचा काही दोष नाही. एकेका मातीचा एकेक गुण असतो. अपरा नाकाच्या भूमीत म्हणजे कोकणच्या मातीत भांडणे आणि भाऊबंदकी यांचेच कण मिसळलेले आहेत. त्या मातीचा स्पर्श झाल्याबरोबर लक्ष्मणाला भाऊबंदकी आठवली, यात त्याचा बिचाऱ्याचा काय अपराध ! "

मला वाटते, ही कथा खरीही असेल. कारण तंजावरच्या भूमीत पुन्हा लक्ष्मण उद्धटपणाने वागू लागला. तेव्हा सीतामाईने त्या वेळी त्याला दोष दिला नाही. हा या प्रदेशाचाच गुणधर्म, हे तिने बरोबर सांगितले.

ते जाऊ द्या. एकच गोष्ट मनात येते. आमचे पुढारी परक्यांशी वाटाघाटी करतात. तहनामे करतात आणि बरेचसे गमावून परत येतात, असे का ? दिल्लीच्या हवामानातच तसले काही गुण आहेत काय ? संशोधकांनी विचार करावा. तूर्त मात्र एक गोष्ट करावी. चीन, पाकिस्तान, नागा बंडखोर यांच्याशी वाटाघाटी करण्यापूर्वी आमच्या मुत्सद्यांना तंजावरच्या हवेत चार दिवस भिजत ठेवावे अन् मगच वाटाघाटींसाठी मोकळे सोडावे. थोडा उद्धटपणा, थोडा उर्मटपणा अंगी आलाच तर देशाचा आयता थोडाबहुत फायदा तरी होईल.



## □ गाईंनाही लूपवती करण्याची योजना

आता गोमातेलाही लूप बसविण्यात येणार आहेत असे ऐकतो. केंद्र सरकारचे अन्न आणि शेतकी खात्याचे गोसंवर्धन मंडळ आहे. या मंडळाची ही योजना आहे. अनावश्यक गुरांची पैदास टाळण्यासाठी हे लूप बसविण्यात येतील. कारण भारतातील ७५ टक्के गुरांची पैदास आर्थिक दृष्टचा तोटयाची असते म्हणे. ती गुरे फक्त वैरणीचा फडशा पाडतात. माणसाचे अन्नही काही वेळेस खातात. पण कामधंदा मात्र कसलाही करण्याच्या उपयोगाची नसतात. अशी गुरे वाढवून करायचे काय ? ज्या गाई भरपूर दूध देत नाहीत किंवा दरवर्षी वीत नाहीत त्यांना हे लूप बसविण्यात येतील. त्यांच्यासाठी खास लूप कलकत्त्यात तयार केले आहेत. निरनिराळचा राज्यांत यासाठी खास केन्द्रे लवकरच उघडण्यात येतील.

परवा वर्तमानपत्राच्या चौकटीत ही बातमी ठळकपणे प्रसिद्ध झालेली पाहिली. वाचली आणि डोक्यात विचारांचे काहूर माजले. गाईला जर लूप बसवायचे तर इतर प्राण्यांना का नाही बसवीत ? गाढवांचा सुळसुळाट या देशात काय कमी आहे ? त्यांच्या बाबतीत का नाही लूपचा प्रयोग ? एकटचा गाईनेच काय पाप केले आहे ? की गाय आपली गरीब सापडली म्हणून हा उद्योग करायचा ? असेल, निरुपयोगी गुरांची पैदास खूप होत असेल. विनाकारण वैरणीचा फडशा पाडणारी अन् दूधदुभते काहीच न देणारी गुरेढोरे या देशात असतीलही. त्यांचा प्रश्न सोडवला पाहिजे हेही कबूल. पण तरीसुद्धा गाईला लूप हे कानाला कसेसेच वाटते बुवा. बसवा. माझे काही म्हणणे नाही. पण निरुपयोगी जनावरापेक्षा निरुपयोगी माणसे या देशात जास्त आहेत ही गोष्ट लक्षात असू द्या. खूप खाणारी, पिणारी, मोटारीतून हिंडणारी अन काही न करणारी. त्यांची वीण कमी करण्यासाठी आम्ही काय करणार आहोत ? खरा प्रश्न तो आहे. बिचारी गुरे कामाला लावलीच तर थोडेबहुत काम नक्कीच करतील. ती मेली तर निदान त्यांचे कातडे, शिंगे यांचासुद्धा काही उपयोग माणसाला आहे. पण या मानवी टोणग्यांचा जिवंतपणीही काही उपयोग नाही आणि मेल्यावर तर नाहीच नाही. यांची पैदास थांबवण्यासाठी आणखी एखादी लूपची योजना नाही काय ?

## □ परीक्षांचे निकाल घरपोच करा

माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल नुकताच लागला. आदल्या दिवशी वर्तमानपत्रांच्या कार्यालयाभोवती विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनी नेहमीप्रमाणे प्रचंड गर्दी केली. वर्तमानपत्रवाल्यांना सळो का पळो करून सोडले. यंदा तर मुंबईला याहीपेक्षा आनंददायक गोष्ट घडली. मुंबईची वर्तमानपत्रे हा निकाल प्रसिद्ध करीत नाहीत. त्यामुळे मुंबईच्या विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी कोठे गर्दी करून गोंधळ

माजवावा याची अडचणच होती. सरकारने ही अडचण दूर केली. यंदा हा निकाल सचीवालयांत शिक्षणमंत्र्यांच्या कार्यालयात आदल्याच दिवशीच प्रसिद्ध करण्यात आला हे छान झाले. बिचाऱ्या गरीब विद्यार्थ्यांचा प्रश्न सुटला. त्यांच्या प्रेमळ पालकांचीही डोकेदुखी नाहीशी झाली. 'चलो सचीवालय' म्हणून त्यांनी इतकी प्रचंड गर्दी केली की काही विचारू नका. शिक्षणमंत्र्यांचे वैयक्तिक कार्यवाह हेच स्वतः यादी पाहून निकाल सांगत होते. मग गर्दीला काय तोटा ! अखेर गोंधळ इतका झाला की सचीवालयाच्या सुरक्षाधिकाऱ्यांना बोलवावे लागले. त्यांनाही विद्यार्थी ऐकेनात. कर्मचाऱ्यांना काम करणे अशक्य झाले. कारभार सुधारणा मंडळाचे अध्यक्ष श्री. मोरारजी देसाई, हनुमंतय्या इ. मंडळी याच सुमारास सचीवालयात होती. शिक्षणमंत्र्यांच्या कार्यालयात चाललेल्या या प्रकाराकडे पत्रकारांनी त्यांचेही लक्ष वेधले. या गोष्टीची नोंद आपण घेतल्याचे मोरारजींनी सांगितले. अशी मोठी गंमत झाली !


शिक्षणमंत्र्यांच्या कार्यालयात निकाल सांगण्याची ही जी सोय सरकारने केली तीबद्दल मी सरकारचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. एकट्या पुण्यातीलच विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनी गर्दी करावी, त्यांनाच फक्त गोंधळ करण्याची संधी मिळावी हा घडघडीत अन्याय आहे. आता मुंबईतही ती सोय झाली– सरकारने मुद्दाम करून दिली– ही फारच छान गोष्ट झाली. आजच्या लोकशाहीच्या काळात सर्वांना समान अधिकार असावेत हे तत्त्व सर्वांनाच मान्य आहे. तोंडाने आम्ही कोण म्हणतो ? पण प्रत्यक्षात काही घडत नाही-हीच ज्याची त्याची तक्रार. ती अशा रीतीने दूर करून लोकशाहीचा नवा संकेत सरकारने रूढ केला याबद्दल सरकारचे मनःपूर्वक अभिनंदन करावयास नको काय ? निदान मी तरी करणार बुवा. मग तुम्ही काही म्हणा.

आजचे विद्यार्थी परीक्षेच्या आणि अभ्यासाच्या बाबतीत जागरूक नसतात असा एक आरोप उगीचच करण्यात येत असतो. घ्या हे उत्तर ! एकदा या गर्दीत मिसळा आणि पाहा म्हणावे. आपला निकाल आजच्या आज समजावा यासाठी गंभीर चेहरे करून आमची भावी तरुण पिढी कशी गर्दी करीत असते हे प्रत्यक्ष पाहा. म्हणजे त्यांच्या उत्सुकतेची, निष्ठेची कल्पना कोणालाही येईल. काही बुद्धिमान विद्यार्थी आणि पालक याही आधी जागरूक झालेले असतात. शालान्त परीक्षा मंडळ किंवा विद्यापीठ यांच्या कार्यालयांत कोणी ओळखीचे भेटते का यावर त्यांची बारकाईने टेहळणी असते. कोणी ओळखीचा निघाल्यास त्यांना स्वर्गप्राप्तीचा आनंद होतो. आपल्या क्रमांकाची चिठ्ठी त्याला तत्परतेने देण्यात आणि त्यांच्या निर्णयाची वाट पाहण्यात केवढे नाट्य भरलेले आहे याची इतरांना कल्पनाच येणे शक्य नाही. प्रत्यक्ष निकालाच्या आधीच आठ-पंधरा दिवस गुपचुप निकाल माहीत करून घेण्यात केवढा 'रोमान्स आणि थ्रिल' भरलेले आहे याची कल्पना ज्यांना

येत नसेल ते अरसिकांचे शिरोमणीच म्हटले पाहिजेत.

हां, एक तक्रार खरी आहे. या सगळ्या गोष्टींमुळे सचीवालयात काय, वृत्तपत्रात काय किंवा शालान्त मंडळाचे कार्यालय काय, विद्यापीठ काय, त्यांत काम करणाऱ्या लोकांना किंचित त्रास होतो. त्यांचा एक दिवस वाया जातो. इतर काही कामे करणे त्यांना अशक्य होऊन बसते. पण त्यांनी हे लक्षात घ्यावयास हवे की, हजारो जणांची उत्सुकता आणि मूर्तिमंत नाटय यांच्या मोबदल्यात एक दिवसाचा हिशेब हा काहीच नव्हे. वाटल्यास दुसऱ्या काही मार्गांनी हा प्रश्न सोडविता येईल. कारभारमुधार मंडळाने नोंद घेतलीच आहे म्हणा. पण सांगितल्यावाचून राहवत नाही! हो, आपले आपण कर्तव्य करावे. अशा परीक्षांचे काम उघडयावरच चालावे. पेपर तपासणे, त्यांची फेरतपासणी करणे, गुणांची नोंद करणे, आणि अंतीम निर्णय तयार करणे ही सर्व कामे गुप्तपणाने न होता अगदी जाहीरपणे करावीत. कोणासही तेथे येण्यास मुक्तद्वार असावे. काय हरकत आहे? म्हणजे आपापल्या सवडीनुसार हे बिचारे विद्यार्थी आणि त्यांचे पालक आपापले नंबर घेऊन येतील आणि निकाल पाहून जातील. त्यांचीही सोय होईल आणि यांचाही त्रास वाचेल. वाटल्यास रेल्वे किंवा एस्. टी. याप्रमाणे तेथे रिझर्व्हेशनचीही सोय ठेवावी. अमुक दिवशी अमुक वेळी अमकेअमके नंबर तपासले जातील आणि त्यांचे गुण मांडले जातील असे जाहीर करण्यात यावे आणि त्या वेळी ज्यांना यावयाचे असेल त्यांना पैसे घेऊन रिझर्व्हेशन द्यावे. म्हणजे गरजूंची उत्तम सोय होईल. वाटल्यास घरपोच निकालाचीही व्यवस्था करावी. मी म्हणतो, बिघडले कुठे? दूध, किराणा माल, फर्निचर, फळफळावळ या गोष्टी घरपोच होतात तर परीक्षांचे निकाल का होऊ नयेत? योग्य तो दाम घेतला म्हणजे झाले! सगळयांचाच फायदा होईल की नाही? बोर्डालाही आणखी उत्पन्न मिळेल. काय हरकत आहे? चांगल्या चांगल्या कल्पना कुणीही सुचवल्या तरी संकोच न करता त्या पत्करान्यात. मग कुणी काही म्हणो.

– ग्यानबा



# दिवस कधी संपलाच नाही !

लेखक

श्रीपाद काळे

रस्त्याच्या तिठ्यावर मी उभा होतो. वास्तविक कोल्हापूरहून टपालगाडी यायला अवकाश होता. पण सारखा रस्त्याकडे पाहत होतो. पान खाणं सुचत नव्हतं-- वळणावळणाचा लालभडक रस्ता आडवा तिडवा पडला होता. एखादं चुकार गुरू कडेला चरत होतं. एस्. टी. च्या शेडमध्ये माझ्यासारखीच दहापाच माणसं होती. नेहमी दिसणारी--उगाच प्रत्येकाची चौकशी होत होती. कोणाचं कोणी येणार होतं. गणपती गेले होते. आता अडी-अडचणीलाच माणसं येणार-जाणार होती. मला अधून मधून कोणी तरी विचारलं होतं, "श्रीभाऊ, तुमचं कोण येणार आहे ? "

कोण येणार आहे ? सांगायचं मी टाळीत होतो. येणारा पाहुणा आला तर ठीक. नाहीतर चार गप्पा मारणारांपैकीच मी एक. मी अशाला फार भितो. मला कमी जास्त मोबदला मिळाला, तरी मी म. ऑ. चे कुपन दाखवतो. हो, नाहीतर लोक केव्हातरी शंका काढायचे, याला एवढे पैसे मिळतात कुठून-- मी जेव्हा मोटारीची वाट पाहतो, तेव्हा नेमकी मोटार उशीरा येते. निदान मला तरी तसं वाटतं-- उगाच वाटतं. मोटार यायची तेव्हाच येते--

अखेर मोटार दूरवर दिसली. सारे सरसावले, म्हणून मीही सरसावलो. कोण पाहुणा येणार हे मी कोणालाच सांगितलं नाही म्हणून बरं झालंसं वाटू लागलं.

मोटार येऊन सावकाश उभी राहिली. मी जवळ गेलो. कंडक्टरनं विचारलं, " कोण येणार आहे तुमचं ? "


पण एवढयात खिडकीतून माझा पाहुणा दिसला. मी यापूर्वी त्याला कधी पाहिला नव्हता पण चट्कन ओळखला. सुरेख दाढी, सरळ तरतरीत नाक-- मी हाक मारली, "आप्पा--"

"आलो आलो--"

# येत्या आठ जुलैला गोपाल नीलकण्ठ दांडेकर

## □ आप्पा □

### एक्कावन्नाव्या वर्षात पदार्पण करीत आहेत.



माझा पाहुणा खाली उतरला. स्वच्छ धोतर—
सदरा-- गोड डोळे--" आप्पा ? "

" ओ-- "

" ठरल्याप्रमाणं आलेत तुम्ही-- "

" येणारच-- "

आप्पा बोलत होते-- वेडचासारखे पाहत होते. सतेज डोळचांत सारं साठवीत होते-- इथलं कातळ, इथली पसरलेली शेते, खळाळणारे वहाळ-- उभे आडवे डोंगर--

" हेच तुम्ही रानपाणीत रंगवलंत ? "

मी लाजलो. मनातल्या नाजूक जागेवर फार हळूवार स्पर्श झाला-- आप्पा आणि मी चालत राहिलो— गावात येणाऱ्या मोटारीला अवकाश होता. आम्हांला उद्याच्या एका दिवसात खूप बोलायचं होतं. म्हणजे मला ऐकायचं होतं. आप्पांबद्दल मी खूप ऐकलं होतं. ' शितू ' माझी आवडती कादंबरी. पडघवलीच्या अनेक ओळी माझ्या लक्षात आहेत. माचीवरच्या बुध्याची शेवटची ओळ अजून लक्षात आहे. आप्पा केवढे मोठे-- मी केवढा लहान. आप्पा सबंध देश फिरले. मी गावाच्या बाहेर कुठे सटकलो नाही. आप्पांनी खूप पाहिलं-- खूप अनुभवलं. मी काहीच नाही. आप्पांनी अनेक प्रकार लिहिले-- समर्थपणे लिहिले. खूप सरकारी बक्षिसं मिळवली. आप्पांच्या ओळखी जबर, पण आप्पा धावत आले. माझ्यामाझ्या सामान्य, गरीब, एका बाजूला राहणाऱ्याकडे. आप्पांना हे ठाऊक नाही का, की मी अजून अगण्य आहे. कोणीही जाणकार माझा उल्लेख करीत नाही. प्रादेशिक साहित्याची नोंद झाली, तर माझा उल्लेख टाळला जातो— मी गरीब आहे—पण आप्पांनी या कशाला जुमानलेले दिसत नाही. ' रानपाणी ' वाचल्यापासून आप्पांना भेटण्याची ओढ मला लागली. ' रानपाणी 'त मी त्यांना कुठेतरी दिसलो-- दोनशे मैल आप्पा धावत आले.

घरी आप्पांची वाटच पाहत होतो. हा पाहुणा नवखा आहे, हे पाच मिनिटात कोणाला पटलेच नाही. आप्पांनी खाऊ म्हणून पेरू आणले—एकदोन नासले. आईला महालक्ष्मीचे कुंकू आणले. आप्पा म्हणाले, " मी दह्याची कवडी, वेसवार आणि पातळ भात जेवायला आलो." घरात परमेश्वराच्या कृपेने सगळे होते. आहेही. रात्री खूप गप्पा मारल्या. आप्पांना म्हटल्यावेळी झोप आली. मी हळूच त्यांची प्रुफांची मेंडोळी काढली. ' अजूनि नाही जागे गोकुळ ' कादंबरीची प्रुफे मी वाचून काढली. आप्पांना अनेक लेखकांच्या बऱ्यावाईट गोष्टी माहिती. दुसऱ्या दिवशी अनंत चतुर्दशी. घरात पूजा. आप्पांना म्हटले, " आप्पा, आज कथा वाचा."

आप्पांनी कथा वाचली. व्यासस्वरूपी ब्राह्मणाची पूजा केली. गावात फिरून आलो– हायस्कूलमध्ये त्यांचे भाषण झाले. संध्याकाळी आमच्या शेतावर गेलो. शेत तरारलेले. विहिरीच्या कठड्यावर बसलो. पाऊस पडून गेला होता. निळे आभाळ मोकळे होते. इकडे तिकडे असंख्य रानफुले फुलली होती. एक मंद गोड वास सुटला होता. केसरे फुलली होती. माझ्याबरोबर एक रसिकराज होता. मी म्हटले, " आप्पा, तुम्ही संगीतिका लिहिता— मला ऐकायची आहे—"

आप्पांनी ' यशोधरा ' म्हटली. आप्पांचा आवाज लागला होता. मी भारावलो— डोळे भरले. माझ्या भाग्याला पारावार उरला नव्हता. हा दिवस माझ्या आयुष्यात कसा उगवला— पुष्कळ मागचा काळ आठवला, माझे वडील आईला म्हणत, " आमच्याकडे फारसे कोणी येत नाही "— आई माझ्या पाठीवरून हात फिरवून म्हणे, " माझा श्री मोठा होईल, त्याच्या ओळखीचे लोक आमच्याकडे येतील." पंडित महादेवशास्त्री जोशींचे पाय माझ्या वास्तूला लागले. आणखी अनेक सारस्वत पाय लावून गेले—

पण आजचा सबंध दिवस असा गेला. आप्पांनी सगळे सांगितले. फोटो दाखवले. आप्पांना अत्तरांचा हव्यास. आप्पांचे ' वाहव्वा ' अजून स्मरले. आप्पा पाच हजार मैलांपेक्षा अधिक फिरले. त्यांच्या चालीला गती आहे. त्यांना चालता चालता एकदम थांबता येत नाही. आप्पांसारखा बुद्धिमान माणूस मी अजून पाहिला नाही. रात्री माझ्याकडे गावातले दहा–पाच स्नेही जमले. एकाने गाडगेबाबांच्या आठवणी सांगायला सांगितले. घरात चहा–कॉफीची तयारी होती. आप्पांना मी सांगितले, " आप्पा, ' अजून नाही जागे गोकुळ ' वाचा—" आप्पांनी प्रुफे घेतली. माझी बायको म्हणाली, " साधारण अर्ध्या तासाने पोहे–कॉफी करते." आप्पांनी वाचायला सुरुवात केली— आप्पा फार छान वाचतात— दुसऱ्याच्या मनाला गचका देतात. कसे वाचतात सांगून जमायचे नाही. आप्पा गोकुळात रंगले— कुब्जेच्या मन:स्थितीशी समरस झाले—बहुतेकांचे डोळे पाणावले. वाचन संपले, तेव्हा बारा वाजले होते. कॉफीसाठी उठायचे माझी बायको विसरली, तिला चाळवून भानावर आणावी लागली...

आप्पा दुसऱ्या दिवशी निघाले. खळाळून हसणे मागे ठेवून निघाले. भ्रमणगाथा सुरू झाली.

या दिवसाला आता तीन वर्षे होतील. आप्पांचा माझा पत्रव्यवहार आहे. योग असला, तर पुन्हा एकमेकांकडे आम्ही जाऊ–येऊ...

पण एक गंमत राहिली आहे, रोज सकाळी उठल्यावरोबर आप्पांचे दर्शन घडते. माझ्या घराखाली बाग आहे. लहान आहे. माड, पोफळी, चिकू, रामफळ, लिंबू यांची झाडे आहेत. थोडा भाजीपाला आहे, फुलझाडे आहेत. चांगल्या पेरूची कलमे मी लावली, पण जगली नाहीत. रोप लावले, ते सारे नर निघाले. पेरूच्या झाडाशिवाय घराला शोभा नाही. प्राजक्त असल्याशिवाय बागेला शोभा नाही, तशी. आप्पांनी पेरू आणले. दोन नासके पेरू घराजवळ टाकलेले होते. महिन्याभरानं तिथं लहान झाड दिसलं. गुरांच्या तोंडातून सुटणं कठीण होतं. पण घरातल्या माणसांनी त्या झाडाला जपायचं ठरवलं. दोनदा गाईनं कोवळा पाला खाल्ला. हे झाड जगेलसे वाटले नाही. झाड सगळ्या प्रतिकाराला न जुमानता वाढत गेले. कलम धरलं, तसं रुजलेलं रोप लवकर धरलं नाही— आप्पांनीच आणलेल्या पेरूचं हे झाड असेल कशावरून— घाटावरचं इथल्या मातीत तसंच निपजेल कसं म्हणावं ? हे एवढंसं रोप मोठे होऊन वर पेरू लागेपर्यंत मराठी कथा कुठल्या कुठे जाऊन पोचेल—

आता हे तीन वर्षांचं झाड आश्चर्यचकीत व्हावं असं चारी खांद्यांना वाढलं आहे. दहा–बारा वर्षांचा मुलगा सहज वर चढेल, असं वाढलं आहे. पहिल्या पेरूची फोड देवाधर्माला देऊन झाली आहे. जात सुरेख आहे. घाटावरच्या पेरूसारखी. आता चार–पाच पेरू आहेत. झाड अशा ठिकाणी आलं आहे, जिथं हवं तिथं. आणखी कुठंही असतं, तरी बिघडलं असतं. डेरेदार विस्तार आहे—

माझी बायको परवाच म्हणाली, "आप्पांची आमच्यावर खरीखुरी माया आहे."

●

देवघरात ती आणि तिचा नवरा
दे वा स मो र ब स ले हो ते,
ध र णं ध रू न. . .

# नवस

## रमेश काशीनाथ नाईक

तिनं काळ्याकुट्ट आकाशाकडे बघितलं. साऱ्या चांदण्याच. चंद्र अजून उगवतीला नव्हता. आपल्याला जशा खंडीभर पोरी तशा आकाशाला चांदण्या. ती विशादपूर्ण मुस्कारली.

केव्हा उगवायचा हा चंद्र ? ती आकाशाकडे पाहत ओसरीवरच बसली.

वीस चतुर्थ्या अशा गेल्या. अंगातले प्राण घेऊन. अभुक्त. व्रतस्थ. सात पोरींनंतर तरी मुलगा व्हावा या एकाच विवंचनेत सतराशे उपचार झालेत. पण प्रत्येक वेळी मुलगीच झाली. वेणा देताना प्रत्येक वेळी तिला वाटलं होतं, आपल्याला या वेळी मुलगाच होणार आहे. पोट बरंच मोठं दिसतंय. या एकाच आशेवर तिनं प्रत्येक बाळंतपणाच्या वेदना साहिल्या होत्या. पण—?

कुठल्याशा आजीबाईंनी तिला सांगितलं होतं, मिठाच्या एकवीस चतुर्थ्या करायला. खात्रीनं गुण येतो म्हणे ! पहिलाच मिठाचा मोदक लागला तर मुलगा नक्की पोटी येतो, असं तिच्या मनावर बिंबवलं होतं. आपल्या सुनेचं उदाहरण जेव्हा डोळे विस्फारीत आजींनी तिला सांगितलं तेव्हाच तिनं मिठाच्या एकवीस चतुर्थ्या करावयाचा संकल्प सोडला होता.

आजची एकविसावी चतुर्थी होती. सकाळपासनं तिनं तोंडात पाण्याखेरीज काही सोडलं नव्हतं. नेहमीची उस्तपास्त मात्र तिला चुकली नव्हती. धुणंभांडी तिलाच करावं लागलं होतं. येणाऱ्या–जाणाऱ्याचं बघावं लागत होतं. नेहमीसारखंच. आज ही अभुक्त आहे याची कोणालाच जाणीव नसल्यासारखी. विहिरीवरून तिनंच पाणी आणलं. स्वैपाकाला तिलाच लागावं लागलं आणि परत मुलींकडे बघावं लागलं ते लागलंच. पोरी असल्या म्हणून का टाकून द्यायच्या ? दुसऱ्यांनी नावं ठेवली डुकरीण, म्हणून का आपण पोरींवर त्याचा राग काढायचा ? त्यांचा तरी काय दोष ?

तिनं आतापर्यंत संयमानं मन आवरलं होतं. पण कधीकधी सहन करायची



: चित्र :
माधुरी पुरंदरे

सीमा ओलांडायची. पार मेटाकुटीला आली की पोरींवर चिडण्याशिवाय तिला दुसरं मन मोकळं करायचं साधनच राहत नसे. दिसेल ती पोरगी झोडपली जायची. पिसाटल्यासारखी ती थापट्या मारायची. पोटांत चिमटे काढायची.

पोरींचे भोंगे सुरू झाले की मात्र ते कसे बंद करावेत हेच तिला कळेनासं व्हायचं. मग ती स्वतःवर इतकी चिडायची की स्वतःचा कडेलोट करून घ्यावा असं तिला वाटायचं.

काय मागच्या जन्मी पाप केलं होतं ते या जन्मी पोरींच्या रूपानं उभं केलं जगन्नाथानं ! गावच्या भिक्षांदेहीवर आणि देवापुढं पडणाऱ्या दक्षिणेवर चुलखंड पेटायचं, तेथे या पोरींना कुठून नीटनेटकं ठेवायचं ? लग्नं होतात की नाही पोरींची हीच चिंता तिला पोखरीत आली.

चंद्रोदय झाला इकडे तिचं लक्षच नव्हतं. तिसरी पोरगी केसांच्या झिपऱ्या मागे करीत अंगणातून धावत आली आणि म्हणाली, " चंद्रोदय झाला आई. बसलीस का ? आम्हांला भूक लागलीय केव्हाची ! "

तेव्हा ती आपल्या तंद्रीतून जागी झाली.

" खाण्याशिवाय काही दुसरं सुचतंय का मेल्यांना ? खायला काळ अन् भुईला भार नुसत्या ! " ती तिसरीवरच डाफरली. मवयीनुसार. उगीचच.

तिसरी हिरमुसली होऊन बाजूला उभी राहिली तेव्हा तिच्या हृदयात एकदम कळवळून आलं. खरंच, केवढी रात्र झाली. पोरींना भुका लागल्या असतील.

उगाच कावलो आपण.

या विचाराने ती भुईवर मागे हात टेकीत उठली.उठवत नव्हतं अगदी. आणखीन् एक जीव पोटात दडून बसला होता ना ? मुलगाच असणार तो ! नवसासायासाने होणारा. दहा वर्षांत सात पोरींवर होणारा. कृष्ण आठवा नव्हता का ? तसाच हा !

ती या विचारानं मोहरली. सात पोरींची आई अल्लडपणानं उठली. तिसरीला म्हणाली,

"साती जणी चला पुजेला. बोलाव सगळयांना ! आणि शांत बसायचं पुजेच्या वेळी. खायखाय करायची नाही कोणी ! सांगून ठेवते."

तिसरी हाका मारायला जशी गेली तशी ती उठली. हातपाय धुऊन तिनं सोवळं नेसलं. पूजा होईस्तवर आपला नवरा देवांची शेजारती आटोपून येईल, असा अंदाज तिनं बांधला होता.

देवघरात ती बसली होती पुजेचं ताट घेऊन. एकवीस दुर्वांची जुडी घेऊन. एकवीस मोदकांचं ताट घेऊन. आणि अवतीभवती श्वास रोखून बसलेल्या सात पोरी घेऊन ! देवाला निक्षून सांगण्यासाठीच. ह्या सात पोरी आहेत, आता मुलगी नको; मुलगा हवाय मला, मुलगा !

देव्हाऱ्यातल्या उजव्या सोंडेच्या तांब्याच्या गणपतीला तिनं हळदीकुंकू वाहिलं. मोठ्या मनोभावे दुर्वांची जुडी वाहिली. उदबत्ती ओवाळली. धुराची निळसर रेषा समईच्या पिवळसर प्रकाशात तरंगत राहिली.

नैवेद्याच्या ताटाखाली अनामिकेनं तांब्यातलं पाणी घेऊन तिनं चौकोन केला. ताटाभोवती तीनदा पाणी फिरवून नैवेद्य दाखविला. हात जोडले. बराच वेळ ती डोळे मिटून ताठ बसली. पोरी बिचाऱ्या आळीपाळीनं ध्यानस्थ बसलेल्या आपल्या आईकडे, देवांकडे आणि मोदकांकडे डोळे विस्फारून पाहत राहिल्या. अजून किती वेळ आई अशी बसणार ?

पण त्यांच्या आईनं डोळे उघडले. किती श्रद्धापूर्ण वाटत होते ते.

आता पुढे आई काय करते हे जणू त्या पोरींना माहीत होतं. एकीनं फुलपात्र उचललं, एकीनं कुयरी. आणि त्या ओटीवर जायला निघण्यासाठी उभ्या राहिल्या.

तिनं परत एकदा गणेशाला नमस्कार केला. कुयरी, फुलपात्र पोरींनी घेतलं की नाही हे बघितलं.

"हं चला. तुम्ही दोघीजणीच. या सगळयांचं काय काम आहे ? बसा !" ती दरडावली तशा बाकीच्या भेदरलेल्या नजरेनं टकामका बघत राहिल्या. अंगवळणी पडल्यासारख्या चोरून बसल्या.

ओटीवर येऊन तिनं चंद्राला हळदीकुंकू वाहिलं. फुले चंद्राच्या दिशेने टाकली. आरती ओवाळली. आणि मनोभावे नमस्कार केला.

"हं चला !" ती असं म्हणाली, तशा दोन्ही पोरी कळसूत्री बाहुल्यांसारख्या

वळून चालू लागल्या.

"जगदंबऽऽ जगदंऽऽब !" असा आवाज करीत भटानं बंडी खुंटीला टांगली. त्यावर काळी टोपी ठेवली. जानवं दोन्ही हातांनी सारखं करीत त्यानं विचारलं, "आटोपला का नैवेद्य ?"

"हो !" ती देवघराच्या दरवाज्याशी थांबली.

"आलोच हातपाय धुऊन" भट म्हणाला. पण देवघरातल्या पोरींच्या कलकलाटात तिला ते ऐकू आलं नाही. तशी ती देवघरात बघत वसकन ओरडली,

"गप्प बसा की रांडेच्यानो !"

तशा पोरी गप्प बसल्या.

भट मोरीकडे वळला तशी ती देवघरात नैवेद्याचं ताट ठेवायला गेली. ताट ठेवून पोरींना म्हणाली,

"तुमची पानं वाढते तोवर लक्ष ठेवा इथं." पदर खोचीत ती स्वैंपाकघराकडे गेली.

ताटं वाढता वाढता तिला देवघरातल्या पोरींचं संभाषण ऐकू येऊ लागलं तेव्हा ती चांगलीच हबकली.

एक विचारत होती, "आई एवढे मोदक खाणार ? "

"हो तर ! मिठाचा मोदक लागत नाही तोपर्यंत खाणार ! " थोरलीनं बहुधा सांगितलं असावं, तिनं कयास बांधला.

" आणि बाकीचे ? "

" ती तसेच राहू देणार ! "

" आपल्याला देणार ? "

" देईल की ! " थोरली पोरगी समजूतदारपणे सांगत होती. बहुधा तिसरीनंच असं विचारलं असणार. तिनं भाकरी ताटांत वाढता वाढता कयास केला.


स्वादिष्ट मिठाईसाठी

आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी,

मंडई रस्ता, पुणे २.

"पण आई मुद्दामच मिठाचा मोदक लागला नाही म्हणून खात राहिली तर आपल्याला मोदकच मिळायचा नाही! "

देवघरातलं हे वाक्य तिच्या कानावर आदळलं मात्र, तिची तळपायाची आग मस्तकाला गेली.

ती ताडकन् उठली आणि तरातरा देवघरात शिरली. तिसरीचं बखोटं खसकन धरून तिला उभं केलं आणि थोरल्या मुलीला विचारलं,

"हीच टवळी विचारत होती ना आता ? "

साऱ्या पोरी भेदरून आईच्या अवताराकडे बघत होत्या. आता हिला चांगला मार बसणार. आणि न जाणो हिच्यामुळं आपल्यालाही.

"दुष्काळात जन्माला आली होतीस? मोदक बघितलेच नव्हते बापजन्मी?" तिनं जोरानं तिसरीच्या पोटाला चिमटा घेतला. केवढ्यानं कळवळली पोरगी पण तिला तिची दया आली नाही. देवघराच्या बाहेर तिनं तिला ढकलून दिलं.

"कोडगी मेली! जा. ओट्यावर बैस. आज तुला उपाशीच ठेवते. जातेस की नाही?"

आपल्या आईचा रुद्रावतार बघून ती मुळूमुळू रडत ओटीवर गेली.

"सगळं तरी ह्यांच्याकरिता करायचं आणि ह्या अशा जिवावर उठल्या. एकीला तरी दया येते का आपल्या आईची ? " असं पुटपुटत ती स्वैंपाकघरात गेली आणि वाढू लागली.

ताटांत वाढणं झाल्यावर तिनं तेथूनच सगळ्याजणींना हाक मारली. "चला चेंदायला! बसू नका अशा घुम्यासारख्या. त्या डुकरिणीलाही बोलवा. कधी खायला मिळालं नव्हतं जसं." ती धुमसत बोलत राहिली.

तशा सगळ्या पोरी ताटांवर येऊन बसल्या. चोरट्यासारख्या जेवू लागल्या. कंदिलाच्या पिवळसर मंद्र प्रकाशात त्यांचे चेहेरे तिला दिसले तेव्हा तिला एकाएकी कळवळून आलं.

मुकाट्यानं जेवतात बिचाऱ्या. आई असून आपण काय खायला देतो तर ज्वारीची लाल भाकरी आणि कालवणास वरणाचं फुळूक पाणी. याशिवाय दुधाचा थेंब, तुपाचं बोटसुद्धा त्यांना देता येत नाही. कशा वाढायच्या या? त्यांच्या भुका शमत तरी असतील का? आपण दरडावतो म्हणून बिचाऱ्या मनात चिडत, कुढत जेवतात, राहतात. एक नाही दोन नाही. साती जणी! आणि परत पोटातला हा एक जीव या खाईत येऊन पडणार. कसा वाढणार तो?......कसा वाढणार?

तिच्या असमर्थपणाची जाणीव सारखी डंख मारीत राहिली आणि ती बधीर झाल्यासारखी पाटावर बसून राहिली. चोरट्यासारखा जेवत असणाऱ्या पोरींकडे तिचं लक्षच नव्हतं. पानातली भाकरी संपली म्हणून मागण्याचा धीर न झाल्यानं तिसरी बोटं चाटत होती. तिकडं तिचं लक्ष गेलंही. पण परातीत भाकरी तरी

कुठं होती ? डोळ्यावर असं कातडं ओढून घ्यायचे क्षण हे. तिच्या जमिनीत गाडल्या गेलेल्या डोळ्यांच्या पापण्यांआड अश्रू थबथबून होते. आपल्या पोरींना आपण धड जेवू घालू शकत नाही. आईबाप झालो कशाला ?.... सरळ भीक मागायला का नाही पाठवत त्यांना ?... दाही दिशा मोकळ्या- . . . कोणीही काहीही घालील. पण अशी उपासमार नाही व्हायची त्यांची.

"मोदक खाल्लेत का ?" भटानं स्वैंपाकघरात डोकावून विचारलं. तेव्हा ती सचेतन झाली. समोरची रिकामी परात बाजूला सारून तिनं हात धुतला. 'झालं असलं तर ऊठ आता !' असं तिसरीला म्हणायचं तिच्या जिवावर आलं होतं.

देवघरात ती आणि तिचा नवरा देव्हाऱ्यातील देवासमोर बसले होते. मुलगा व्हावा म्हणून धरणं धरून बसले होते. सात पोरींनंतर तरी मुलगा व्हावा असं विनवीत होते.

तिनं नैवेद्याच्या ताटाभोवती पाणी फिरविलं. तुळशीचं पान ओलं करून मोदकांवर ठेवलं. थोडं पाणी घेऊन डोळ्यांना लावलं. नमस्कार केला आणि पहिला मोदक उचलला. गेल्या वीस चतुर्थीत एकदाही मिठाचा मोदक पहिल्यांदा लागला नव्हता. तो या वेळी तरी लागावा असा विचार तिच्या मनात उभा होता.

तिनं डोळे मिटून मोदक उचलून तोंडाजवळ आणला तेव्हा भटाची–तिच्या नवऱ्याची–उत्सुकता शिगेला पोहोचली होती. दर वेळी पहिल्या मोदकाला तो समईच्या मंद प्रकाशात तिच्या चेहऱ्याकडे उत्सुकतेने असाच बघायचा. त्याचा तेलकट चेहरा समईच्या प्रकाशात चकाकत होता.

तिनं मोदकासाठी तोंड उघडलं तेव्हा तिसरीचा चेहरा तिच्या डोळ्यांसमोर उभा राहिला. गणपतीचं प्रसन्न वदन डोळ्यांसमोर यावयाच्या ऐवजी, तिसरीचा


**खास प्रवासी डब्याने आलिशान व्यवस्था**

**२४ जुलै १९६६**

**काशी हरद्वार यात्रा**

**२१ ऑगस्ट १९६६**

**भू–नंदन काश्मीर सहल**

**राजकमल यात्रा कंपनी**

मालक–कर्वे बंधू ६०५ शनवार, लोखंडे तालमीजवळ, पुणे २.

फोन : ५४४५७.

मुकेजला, कोमेजला चेहरा तिच्या डोळ्यांसमोर आला ... भाकरीसाठी इतरांच्या ताटांकडे बघणारा...आशाळभूतपणे बोटं चाटणारा...

तिला उमाळून आलं.

मोदक तोंडात घातला न घातला तोच तिला रडं कोसळलं. मोदक तोंडात फिरू लागला: गोड मोदक...साखरेचा ?... मिठाचा नाही ?...मुलगा नाही ! ...

" काय झालं तुम्हांला रडायला ?" भटानं विचारलं. तेव्हा तिला बोलताही येत नव्हतं आणि गिळताही येत नव्हतं.

" सांगा, अश्रू वाहायला काय अरिष्ट आलं आपल्यावर ?"

भटानं करड्या आवाजात विचारलं तेव्हा कसातरी आवंढा गिळीत तिनं सांगितलं, " मिठाचा मोदक लागला या वेळी. मिठाचा !"

भटाला या वाक्यासरशी आनंदाचं उधाण आलं. त्यानं देवापुढं सपशेल लोटांगण घातलं. देवानं आपली कसोटी पाहिली. वीस चतुर्थ्या होईपर्यंत हुलकावणी दिली. कौल दिला नाही. पण शेवटी पावला तो ! आपल्याला आता मुलगा होणार ! मुलगा होणार !

तिनं ताट बाजूला सारलं. पाण्याचा एक घोट घेऊन तिनं देवाला नमस्कार केला. मोदकांचं ताट घेऊनच ती तडक स्वैंपाकघरात गेली. अजून पोरी तिथंच एकमेकींकडे बघत बसल्या होत्या. ताटावर रेघोट्या ओढीत होत्या. एरवी ती तसं ताटावर रेघोट्या ओढीत बसलेल्या पोरींवर ' दळभद्री लक्षण मेल्यांचं !' असं म्हणून डाफरली असती. पण ही वेळ तशी नव्हती.

" जेवणं आटोपली का ? थांबा हं, मोदक वाढते तुम्हांला, उठू नका ! " असं म्हणत तिनं थोरलीपासून धाकटीपर्यंत सर्वांच्या ताटांत मोदक ठेवलेत.

" खा, पोट भरून खा !" असं म्हणताना, पाटावर बसून मोदक खाणाऱ्या पोरींकडे बघताना तिला अतीव समाधान लाभत होतं. पोटात दिवसभराची घुमसत राहिलेली भुकेची आग ती विसरून गेली होती.

पोरींच्या इवल्या इवल्या मोदक खाणाऱ्या तोंडांकडे ती कौतुकाने बघत होती. आईच्या संतृप्त मनाने पाहत होती. कंदिलाच्या प्रकाशात तिला सर्वांचे चेहेरे दिसत होते. पोरी मटामटा खात होत्या.

तिचं तिसरीकडे लक्ष गेलं मात्र. तिचा चेहरा खर्रकन् उतरला. तिसरी तोंडातला मोदक थू थू करीत बाजूला काढीत होती.

...क्षणात तिला सारी कल्पना आली.

भट दारात केव्हा येऊन उभा राहिला ह्याचं तिला भान राहिलं नाही. तिसरी आता काय बोलेल आणि ते ऐकून भटाला काय वाटेल या एकाच विचारानं ती बधीर होऊन गेली... जागच्या जागी थिजून गेली.

• • •

# भस्मासुराचा उदयास्त

: लेखक :

रा. म. शास्त्री

**पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे.**

रॉयल आकार : पृष्ठसंख्या सुमारे पाचशे

भरपूर छायाचित्रे

**किंमत : अठरा रुपये**

प्रसिद्धिपूर्व सवलतीची किंमत

**रुपये बारा केवळ**

- *सवलतीची मुदत ३० जून १९६६ पर्यंत*
- *रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास दोन रुपये टपालखर्च अधिक पडेल. ( १२ + २ = १४ रु. )*

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण पेठ, पुणे २

# दिहांगच्या तीरावर



आजाद हिंद सेनेच्या
नेफा-आसाम-ब्रह्मदेशमधील क्रांतिकार्यावर आधारित
एक साहसरम्य प्रदीर्घ कथा

भाग २ रा

लेखक

□ सुधाकर डोईफोडे

## कथेचे पूर्वसूत्र....

दुसऱ्या महायुद्धाचा हा काळ. भारतातून इंग्रजांना 'चले जाव' म्हणून ठणकावून सांगण्यासाठी महात्माजींच्या नेतृत्वाखाली जनतेने प्रचंड तयारी चालवली होती. सशस्त्र क्रांतिकारकांनाही उठावाचे निरनिराळे मार्ग दिसत होते. विशेषत:, बंगालमध्ये तर हे क्रांतिकारक अधिकच प्रखर मार्ग अवलंबीत होते.

लष्करी साहित्यनिर्मितीचा एक सरकारी कारखाना उडवून लावण्याचा कट तरुण क्रांतिकारकांच्या एका गटाने आखलेला असतो. अशोषकुमार हा यातील प्रमुख.

हा कट मोडून काढण्याची जबाबदारी पडते कलकत्त्यातील एका राजनिष्ठ महाराष्ट्रीय अधिकाऱ्यावर. याचे नाव आमोद विश्वनाथ कुंटे. एका गर्भश्रीमंत घराण्यात याचा जन्म झालेला असतो. राजनिष्ठेचे संस्कार याच्या रक्तातच भिनलेले असतात.

कट उघडकीस येतो. क्रांतिकारक सापडतात, मारले जातात. पण आमोदलाही जबरदस्त मार बसून घरी पडून राहावे लागते. करुणेच्या (पत्नीच्या) शुश्रूषेमुळे तो हळूहळू बरा होतो. पण बदललेला असतो. करुणेची क्रांतिकारकांना सहानुभूती असते. बाहेरून राजनिष्ठेची बतावणी करणारा सरित हा अगदी जवळचा मित्र तर पक्का क्रांतिकारकच असल्याचे आमोदला कळून येते. सुभाषचंद्रांनी रणशृंग फुंकलेले असते. क्रांतिकारक एका नव्या साहसाची योजना आखतात, ज्यात आमोदच्या शस्त्रास्त्रनिर्मितीच्या ज्ञानाची त्यांना खूपच मदत होणार असते.

आमोद गुप्तपणे या साहसात सहभागी होण्याचे ठरवतो....

नेताजींनी आजाद हिन्द सरकारची स्थापना करताच साऱ्या जगात भयंकर खळबळ माजली. आजाद हिन्द सरकारला जपान, जर्मनी, इटाली, फिलिपाईन्स, मँच्युरिया, चीन, सयाम, ब्रह्मदेश, आयर्लंड इत्यादी राष्ट्रांनी मान्यता दिली तर ब्रिटन व अमेरिकन सरकारांनी या सरकारविरुद्ध युद्ध जाहीर केले! आजाद हिन्द सरकारचे ठाणे आधी सिंगापूरला व नंतर रंगूनला नेण्यात आले. जपान्यांच्या ताब्यातील हजारो युद्धबंद्यांतून व मलाया–ब्रह्मदेशातील भारतीयांतून आजाद हिन्द सेना उभी राहिली. 'झाशीची राणी पथक' ही उभे राहिले! स्वातंत्र्यार्थ या सेनेने जो संगर केला त्याला जगात तोड नाही. ब्रिटिश सैन्यास खडे चारून ही सेना आसामच्या रोखाने निघाली. त्यांच्या भारतातील हालचालींचा विचार करण्यासाठी कलकत्त्यात काही निवडक लोकांची गुप्त सभा सरितनं बोलावली.

मी बैठकीस पोचलो तो तेथे आणखी चार लोक जमले होते, सरितनं ओळख करून दिली. कर्नल सरदार रामसिंग हे आजाद हिन्द सेनेचे अधिकारी होते व सेनेच्या गरजा कानांवर घालण्यासाठी ते गुप्तपणे बैठकीस आले होते. शिवस्वामी हे मद्रासी गृहस्थ इंजीनिअर होते. पर्वतारोहणतज्ज्ञ श्री. वर्मा हे यू. पी. चे गृहस्थ होते. चौथा गृहस्थ स्वतःच माझ्यासमोर येऊन म्हणाला, "मला ओळखलंत?"

भगवी कफनी घातलेला, केस वाढविलेला! या काळचासावळचा गृहस्थास कुठंतरी पाहिल्यासारखं वाटत होतं. पण ओळख पटत नव्हती.

सरित हसून म्हणाला, "बघ विचार करून! या गृहस्थाला तू एकदा मरणाच्या दारी ढकललं होतंस!"


"अरेच्या!" मला क्षणात ओळख पटली. "तू अशोषकुमार तर नव्हे?"

"होय, तोच मी!"

अशोषकुमार! स्वातंत्र्याच्या भावनेनं वेडया झालेल्या याच ध्येयवादी तरुणाचा कट मी उधळून लावला होता. त्याच्या सहकाऱ्यांच्या मृत्यूस मी कारणीभूत झालो होतो. याचीही मान मी फासात अडकविलीच होती! क्रांतिकारकांनी याची सुटका केली नसती तर......! मी खाली मान घातली व म्हणालो, "अशोष, मला क्षमा कर!"

अशोषनं पुढं होऊन मला मिठी मारली. त्या मिठीत प्रेम होतं, बंधुभाव होता, मागील गोष्टी विसरण्याचं आश्वासनही होतं. एक दृढ मिठी! त्यात सर्व काही आलं!

बैठक सुरू झाली. कर्नल सरदार रामसिंग आजाद हिन्द सरकारची योजना समजावून सांगत होते. आजाद हिन्द सेना भारतात घुसू पाहत होती. ब्रह्मदेशात घनघोर संग्राम चालला होता. दोस्तांचे सैन्य भरपूर होते त्या मानाने आजाद हिन्द सैन्य थोडे! प्रारंभी जपान्यांची मदत होती. नंतर त्यांनी हात आखडता घेतला. या मोठ्या आघाडीवर भारतीय सेनेस एकाकी तोंड द्यावं लागणार होतं. तसा आजाद



कर्नल सरदार रामसिंग आजाद हिंद सरकारची योजना समजावून सांगत होते.

हिन्द सेनेतील प्रत्येक सैनिक पाच शत्रू सैनिकांस भारी होता. स्वातंत्र्याच्या भावनेने वेडे झालेले हे सैनिक शत्रूला आटोपत नव्हते. पण शस्त्रास्त्रे नसतील तर वैयक्तिक शौर्य कितीसे उपयोगी पडणार ! शस्त्रास्त्रांच्या अभावी त्यांचा पराक्रम उणा पडत होता. आसाम–बंगालमधील जनता भारतीय सैन्याची वाट पाहत होती. आजाद हिन्द सेनेने कलकत्त्यापर्यंत मजल मारली असती तरी भारतातील ब्रिटिश राजवट कोलमडून पडली असती ! पण शस्त्रास्त्रे ? स्वातंत्र्य सैनिकांना त्याचीच आवश्यकता होती ! !

"जपानची मदत का होत नाही ?" शिवस्वामींनी विचारले.

"कारण, आजाद हिन्द सरकार आपल्या ताटाखालचं मांजर व्हावं अशी त्यांची इच्छा होती !" सरदारजी म्हणाले, "पण नेताजी ही अट कधीही मान्य करणार नाहीत. आपण स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढत आहोत ते पुन्हा दुसऱ्याला विकण्यासाठी नव्हे ! जपानला आमचा उपयोग करून स्वत:चे साम्राज्य उभारावयाचे होते. त्यांचा डाव आम्ही उधळून लावला. आता आम्हांस स्वत:च्या पायांवर उभं राहणं भाग आहे. आम्हांला स्वत:चा शस्त्रास्त्रांचा कारखाना उभारणं भाग आहे !"

"पण तो उभारणार कुठं ?" वर्मांनी विचारलं.

"तो कारखाना भारतीय भूमीत उभारणं सुरक्षितपणाचं ठरेल." सरदारजी म्हणाले.

"भारतीय भूमीत ! आणि सुरक्षित ?" अशोष ओरडला.

"होय. भारतीय भूमीतच तो सुरक्षितपणे उभारता येईल!" सरित म्हणाला. "सकाळी मी आणि कर्नलसाहेबांनी या योजनेचा विचार केला." बोलता बोलता सरितनं आसामचा नकाशा उघडला. "आपणांस सुरक्षित भारतीय प्रदेश हवा आहे ना? मग इकडे नजर टाका! आसामच्या डोक्यावरचा हा बालीपारा सरहद्द भाग पाहा (जो आज नेफा नावाने ओळखला जातो) हा भारताचाच भाग आहे, पण यावर ब्रिटिशांचा पक्का ताबा नाही. बालीपारा विभागाचा पूर्व भाग 'सादिया फ्रॉंटियर' या नावानं ओळखला जातो. तो भाग आपल्या योजनेसाठी उपयोगी आहे. या भागात ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात कुठंतरी आपणांस कारखाना उभारता येईल. येथील वस्ती विरळ आहे व मागही जंगली, डोंगराळ असल्यामुळं सरकारी अधिकाऱ्यांची इकडे सहसा फेरी होत नाही. या भागाचे आणखी एक महत्त्व आहे. हा टापू आजाद हिन्द सेनेस अत्यंत जवळ आहे."

"पण लोखंड?" शिवस्वामींनी विचारलं.

"त्याचाही विचार केला आहे." सरित म्हणाला, "आपणांला लागणारे लोखंड तिबेटच्या पूर्व भागातून मिळू शकेल. या भागात लोखंडाचे थर अतिशय वर आहेत. तिबेटी लोक तेथूनच लोखंड काढीत असतात."

सरित थोडा वेळ थांबला. त्याने सगळीकडे नजर फिरवून माझ्यावर स्थिरावली. तो मला म्हणाला,

"आमोद, आता येथून तुझं काम सुरू होतं. मशिनगन तयार करण्याचा सुटसुटीत प्लॅन्ट तू शोधला आहेस, तेव्हा नियोजित जागी मशिनगन्स तयार करण्याचं काम तुझं."

"पण ही सामग्री तेथवर गुप्तपणे कशी पोचविणार?" वर्मांनी विचारलं.

"तीच तर गम्मत आहे!" सरित हसून म्हणाला. "त्यासाठी आम्ही एक जंगी प्लॅन रचला आहे. आणि वर्मासाहेब, त्या प्लॅनचं नेतृत्व आपणांसच करावं लागणार आहे!"

"म्हणजे, मी नाही समजलो!" वर्मा गोंधळून म्हणाले.

"हे बघा मि. वर्मा," आता सरदारजी बोलू लागले, "तो प्लॅन असा आहे: बालीपाराचा मुलूख अजून तरी दुर्लक्षित आहे. या प्रान्ताची भौगोलिक पाहणी करणे व जमल्यास गिर्यारोहण करणे या दोन उद्देशांसाठी आपण एक मोहीम काढू या. या मोहिमेचा पुढाकार तुम्ही व सरितने घ्यावा. आमोद, शिवस्वामी इत्यादी लोक ५०–६० जणांचा इतर गट घेऊन बरोबर असतीलच. या मोहिमेस सामान किती प्रचंड लागते याचा तुम्हांला अनुभव आहेच. यात मशिनगन प्लॅन्टही नेता येईल."

"हां! ही आयडिया ठीक आहे. पण सरकार परवानगी देईल काय?" शिवस्वामींनी शंका काढली.

"प्रयत्न करणं आपल्या हाती आहे." सरदारजी म्हणाले, "शिवाय या मोहिमेचे स्वरूप निव्वळ संशोधनात्मक राहील. मोहिमेचे सूत्रधार सरित–आमोदसारखे 'राजनिष्ठ' लोक आहेत. मोहिमेचा खर्चही तेच करतील. तेव्हा सरकार नाही म्हणणार नाही."

"बरं, पण शिखर कोणतं पादाक्रांत करायचं ?" आता वर्मांचे बाहू फुरफुरू लागले !

"अहो वर्मा, आपल्याला खरंच पर्वतारोहण नाही करायचं !" इतका वेळ गप्प बसलेला दाढीवाला अशोष वर्मांना चिडवत म्हणाला, "आपण पहाडाला फक्त वळसा घालणार ! नाही तर आम्ही जातो पुढे. तुम्ही चढत बसा एकटेच !"

वर्मांनी त्यांच्याकडे डोळे मोठे करून पाहिले. पण सावरून ते पुढे म्हणाले, "तसं होऊ द्या. पण योजनेत तर एखादा सुळका पाहिजे ना ! या भागात असं कोणतं शिखर आहे ?"

"तशी बरीच शिखरं आहेत पण आपल्या योजनेसाठी... ..." सरित नकाशा उलगडून बालीपाराच्या पश्चिम मध्यभागी बोट ठेवून म्हणाला, "... हे शिखर योग्य आहे. याचं नाव ताकपाशिरी ! उंची २२११९ फूट !"

आम्ही सारे नकाशाभोवती गोळा झालो !

'अरे वा ! आपल्या कारखान्याची जागा पूर्वेस आणि मोहीम जाणार पश्चिमेस ! मजा आहे की !" वर्मांकडे पाहत हसत अशोष म्हणाला. "हा डाव वर्मांची समजूत घालण्यासाठी की काय ?"

आता मात्र वर्मा भडकले ! "हा काय प्रकार आहे ? आपले स्थळ पूर्वेस असताना हा उत्तरेचा मार्ग कशासाठी आखण्यात येत आहे ?"

सरित उठून त्यांच्याजवळ गेला व त्यांच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, "वर्मासाहेब, हा युद्धातील एक साधा डावपेच आहे. आपलं खरं ठिकाण शत्रूला कळू नये म्हणून आपणांस हा गनिमी कावा करावा लागत आहे. आपली नियोजित जागा पूर्वेस ब्रह्मपुत्रेच्या तीरी असेल. पण त्यासाठी सादियाचा मार्ग धरणं म्हणजे शत्रूस सरळ माहिती दिल्याप्रमाणं होणार नाही काय ?"

"पण या मार्गाने तरी तिथे कसे पोचणार ? "वर्मा थंड होत कुरकुरत म्हणाले.

"कसे म्हणजे पायाने !" दाढीदीक्षित पुन्हा बरळला.

एकूण भडक डोक्याच्या वर्मांना चिडविण्यात अशोषला गम्मत वाटत असावी. सुदैवानं वर्मांनी अशोषचं ते वाक्य ऐकलं नव्हतं ! ते सरितची योजना मन लावून ऐकत होते.

सरित सांगत होता :

"तसं पाहिलं तर त्या ठिकाणी जाण्याचा रस्ता काही आखलेला नाही. सरकारला सुगावा लागू नये म्हणून आपण बालीपाराहून या सरहद्द प्रदेशात प्रवेश

करणार. अर्थात् आपला रोख ताकपाशिरीकडेच असेल. पुढे जमेल तसं करू !"

म्हणजे पुढची सारी योजना हवेतच होती. पण त्याला सरितचा नाइलाज होता. मुळात या प्रदेशात कुणी फारसा गेलेलाच नाही मग दळणवळणासाठी रापलेले रस्ते कुठून असणार ! हा सारा प्रदेश इतका दुर्गम आहे की, एका टोळीवाल्याचा दुसऱ्या टोळीवाल्यांशी संबंध क्वचितच येतो. या देशातील टोळ्यांची माहितीही नीट जमा झाली नाही. आमच्या मोहिमेच्या आदल्या वर्षी म्हणजे १९४२ साली दोन नवीन टोळ्यांचा शोध लागला होता. अशा आणखी किती टोळ्या येथे जगाशी संबंध न येता वावरत आहेत, ते ईश्वरासच ठाऊक ! एकूण ही मोहीम अतिशय कठीण– अंधारात सुई शोधण्याइतकी कठीण–भासत होती. हे दिव्य करणं म्हणजे प्राणांची आशाच सोडणं भाग होतं. पण स्वातंत्र्याची भावनाच अशी आहे की, इतर साऱ्या भावनांवर ती मात करते ! मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी आम्हीही आपल्या प्राणांचे मोल देण्याची शपथ घेतली होती. आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्राणाचा त्याग करण्याची तयारी ठेवणाऱ्यांना अडवू शकणारी कोणती शक्ती जगात आहे ?

आता पुढील तयारीचं काम सोपं होतं. प्रथम आम्ही कामाची वाटणी करून घेतली. मी व सरित यांनी सरकारकडून गिर्यारोहण व भौगोलिक पाहणीसाठी परवानगी मिळविण्याचं काम घेतलं. वर्मांनी मोहिमेचा आराखडा करण्याचं व शिवस्वामींनी त्याबरहुकूम साधनसामग्री जमविण्याचं काम घेतलं. सरदारजी आमचा कारखाना व आजाद हिन्द सेनेत संपर्क साधणारा दुवा निर्माण करण्यासाठी सादियाला निघाले. अशोकला कुठलेही उघड काम देणे शक्य नव्हते, तेव्हा त्याने वर्मांना डिवचण्याचं काम स्वतः होऊन घेतलं !

तो ऑक्टोबर महिन्याचा पहिला आठवडा असावा. गेला संपूर्ण सप्टेंबर महिना आम्ही मोहिमेस परवानगी मिळविण्याकरिता सरकारच्या पाठीस लागलो होतो. कधी आसामचे लेफ्टनंट गव्हर्नर तर कधी बंगालच्या गव्हर्नरची आम्हांस मनधरणी करावी लागे. सरित तर दोन वेळा दिल्लीलाही जाऊन आला पण आमची दखल घेण्याच्या मनःस्थितीत कुणीही नव्हता. युद्ध, युद्ध आणि युद्ध ! युद्धाशिवाय दुसरी कुठलीही योजना दिल्लीत ऐकली जात नव्हती. ब्रिटिश सरकारची 'हालत' फारच नाजूक झाली होती. त्या वेळेच्या अफवांच्या आधारेच सांगायचं तर जपान अगर आजाद हिन्द सेनेनं कलकत्ता जिंकलं तरी सारा भारत सोडून पळ काढण्याची 'योजना' व्हॉईसरॉयने तयार केली होती म्हणे ! आजाद हिन्द सेना कलकत्त्यात प्रवेशताच भारतीय जनता व सेना उठाव करील याची सरकारला खात्री पटली होती. पूर्व आघाडीवर ब्रिटिशांचा सारखा पराभव होत असल्यामुळे येथील अधिकाऱ्यांत हताशपणा आला होता. अशा वातावरणात सरित व मी आमची

योजना त्यांच्या गळीत उतरवू इच्छित होतो !

मी व सरित दिल्लीस पोचलो तेव्हा राजधानीवर युद्धाची कळा आली होती. त्यातच भारतीय जनतेची चळवळ जोरात चालली होती. सरकारनं दिल्लीत कडेकोट बंदोबस्त केला होता. दिल्लीस येणाऱ्या प्रत्येकास त्याच्या आगमनाचं कारण विचारलं जाई. आम्ही ' गिर्यारोहण ' हे कारण सांगताच तो अधिकारी आमच्याकडे वेडयासारखा पाहू लागला. आम्ही सरकारचे बंदे, सन्माननीय प्रजाजन आहोत हे समजताच क्षमा मागून त्यानं आम्हांस जाऊ दिले !

दोन-तीन दिवसांच्या खटपटीनंतर आम्हांला व्हॉईसरॉयकडून बोलावणे आले. मुलाखतीची वेळ अतिशय थोडी म्हणजे अर्धा तासच होती. आम्ही तेथे वेळेवर पोचलो व व्हॉईसरॉयसाहेबांना लवून कुर्निसात केला. बसण्याचा हुकूम झाल्यावर आभार मानून आम्ही स्थानापन्न झालो. सरितने बंगालच्या गव्हर्नरचे ' हरकत नसावी 'चे पत्र व्हॉईसरॉयसाहेबांना दिले. आमच्या साऱ्या योजनेबद्दल आम्ही आधी पत्रानं कळविलंच होतं.

पत्र वाचून त्याची नीट घडी करून त्यांनी टेबलावर ठेवलं.

आम्ही श्वास रोखून त्यांच्याकडे पाहू लागलो !

" पण या युद्धाच्या काळात अशा मोहिमांचा काय उपयोग ? " व्हॉईसरॉय विचारते झाले.

" युवर ऑनर ! " मी म्हणालो, " कदाचित् युद्ध पुढील दोनतीन वर्षांत सम्पेल. या युद्धात दोस्तांचा विजय ठरलेलाच आहे. ( येथे व्हॉईसरॉयच्या चेहऱ्यावर स्मिताची लकेर चमकून गेली.) आमच्या या मोहिमेतून सरकारला या प्रदेशाची जी माहिती होईल तिचा युद्धोत्तर पुनर्रचनेसाठी उपयोग करून घेता येईल. "

" शिवाय ही मोहीम मी माझ्या खर्चानं करणार आहे. " सरितनं आपलं घोडं दामटलं. ' या बिकट काळात सरकारला थोडीदेखील तोशीश पडणार नाही ! "

" तरीही सध्याच्या काळात तुम्हांला परवानगी देणं मला इष्ट वाटत नाही. " व्हॉईसरॉयचं हे वाक्य आमच्या कानांवर जणू वज्राप्रमाणं आदळलं ! मोहिमेस परवानगी न मिळाल्यास आमचा सारा प्लॅन कोलमडून पडणार होता.

मी घडयाळाकडे पाहिलं. वेळ संपत आली होती. आम्हांला निघण्याचा इशारा करण्यासाठी व्हॉईसरॉयचा पी. ए. चुळबुळत होता. आम्ही अत्यंत निराशेनं उठलो.

मी हस्तांदोलनासाठी हात पुढे केला. माझा हात दाबत व्हॉईसरॉय म्हणाले,

" सॉरी... मला अतिशय वाईट वाटतं. तुमची तयारी वाया जाणार ! पण मी तरी... "

" तयारीचं जाऊ द्या साहेब, " मी जड आवाजात म्हणालो, " पण, आम्ही

ब्रिटिश सरकारची जी सेवा केली ती लक्षात घेऊन तरी ...

'पाहता पाहता व्हॉईसरॉयचा चेहरा पालटला. ही गोळी नीट लागू पडली. हे पाहताच सरितला अवसान चढलं ! तो पुढे होऊन म्हणाला,

"सर, सुखाच्या प्रसंगी सारेच सोबती असतात पण या बिकट प्रसंगीही आम्ही आपले वफादार आहोत. आमच्याकडून होईल तेवढी मदत देत आहोत. माझ्या जहागिरीतील मनुष्यबळ सरकारसाठी राबत आहे. माझे धन, आमोदची बुद्धी सारे सारे आपले राज्य चिरकाल टिकण्यासाठी खर्ची पडत आहे ! सर, आमची एवढी किरकोळ मागणी......वाटल्यास बालिश हट्ट म्हणा..."

"ऑल राईट !" सर गरजले ! "जा. दिली परवानगी ! पण तुमच्या मोहिमेचा अहवाल रोज कलकत्त्यास आला पाहिजे. तुम्ही जाल त्या प्रदेशातील प्रजा ब्रिटिश अमलाखाली प्रजा आहे हे लक्षात घेऊन वागा ! तेथे आपणांस प्राप्त होणाऱ्या साऱ्या वस्तूंवर व अशोधित भूमीवर ब्रिटिशांचीच मालकी राहील हे लक्षात ठेवा ! गुडलक !"

...आणि व्हॉईसरॉयचा निरोप न घेता आम्ही स्टेशनकडे पळत सुटलो. वाटेत फक्त दोन मिनिटं थांबून वर्मांना तार ठोकली, "काम फत्ते तयार व्हा !"

रेल्वेने आम्ही कलकत्त्याला पोचलो तोवर वर्मांनी बरीच तयारी करून ठेवली होती. आम्हां वरिष्ठ लोकांखेरीज डॉ. चौधरी, आसामी तरुण बिजोय बोरा, संरक्षक दलाचा कॅ. गुरुनाथ हल्दर, बौद्धधर्मीय कुणाल दुरुंग इत्यादी लोक होते. या सर्वांना आपल्या कार्याची पूर्ण जाणीव होती. निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या व्यवसायांतील ही मंडळी सरितच्या क्रांतिकारक मंडळाने जमा करून ठेवली होती. सरितच्या कार्यकुशलतेबद्दल माझा आदर दुणावला.

वर्मांनी भारवाहक म्हणून भोटिया जमातीतील लोक निवडण्याची दक्षता घेतली होती. त्यांची संख्या पन्नास तरी होती. त्यात आठ-दहा स्त्रियाही होत्या. भोटियांनाच निवडून घेण्यामागे काही कारणे होती. एक म्हणजे या लोकांना बालीपारा प्रान्ताची साधारण माहिती होती. बालीपारा प्रान्तातील बोलीभाषेशी त्यांची भाषा मिळती जुळती होती. तसेच हे लोक अत्यंत काटक व प्रामाणिक म्हणून प्रसिद्ध होते. आणि मुख्य म्हणजे आम्ही निवडलेले हे सारे लोक भूतानचे नागरिक होते त्यामुळे ते ब्रिटिशांना फितूर होण्याचा संभव कमी होता !

वरील लोकांखेरीज आमच्याबरोबर पंचवीस हत्यारी लोकांचा एक गट होता. एवढ्या मोठ्या लवाजम्यास संरक्षक लागणारच ! यात पगारी हत्यारी मंडळीं-बरोबर आमच्या क्रांतिकारक साथींचा समावेश होता. अशोषदेखील हिरवा गणवेश घालून त्यांच्यांत सामील झाला !

आमच्याजवळील सामान मोठ्या सर्कशीलाही लाजवील असे होते. गिर्या-रोहणाला लागणारी निरनिराळी सामग्री, पेटारे, खिळे, कुदळी, दोऱ्या, हातोडे,



**आणि मोठ्या मिनतवारीने व्हॉईसरॉयकडून आमच्या मोहिमेला परवानगी मिळाली.**

ऑक्सिजनचे सिलेंडर्स, सुरुंगाची दारू, खिळ्याच्या बुटांचे प्रत्येकी चार जोड, गरम कपडे, तंबू एक ना दोन शेकडो प्रकारचे सामान होते. खाद्यपदार्थ, हवाबंद डबे तर होतेच, पण वर्मांनी काही गोणी मीठही भरून घेतले होते ! मला तरी त्यांचा उद्देश समजला नाही.

... या सामानाबरोबरच मशिनगन तयार करण्याची सामग्री छपवून न्यायची होती !

एवढे प्रचंड सामान वाहून नेण्यास वाहनांची गरज होतीच. त्यासाठी शिवस्वामींनी पुढे जाऊन १०० खेचरांची सोय केली. आमचा पहिला टप्पा बाली-पाऱ्यास होणार होता. तेथे ही खेचरे गोळा करण्यात आली.

युद्ध चालू असल्याने रेल्वेचे सारे बळ सैनिकी सामान वाहून नेण्याकडे खर्च होत होते त्यामुळे आमचे सामान ब्रह्मपुत्रेच्या मुखातून होड्याद्वारे तेजपूरकडे रवाना करण्यात आले. त्या वेळी पूर्व पाकिस्तान अस्तित्वात नव्हते त्यामुळे कुठलाही अडथळा न येता ते व्यवस्थितपणे पोचले. तेजपूरच्या उत्तरेस थोड्याशा मैलांवर बालीपारा हे गाव आहे. येथूनच आजच्या नेफाची सरहद्द सुरू होते. बालीपारा म्हणजेच महाभारतकालीन भालुकापूर अशी या भागातील लोकांची श्रद्धा आहे.

आमच्या पथकातील सर्व लोकांची माहिती घेण्याचा बंगाल पोलिस खात्याचा प्रयत्न होता. पण आम्ही व्हॉईसरॉयच्या परवानगीनं ही मोहीम आखली आहे, असं दरडावून सांगताच त्यांनी माघार घेतली. या प्रकारामुळे आमचे क्रांतिकारक मित्र सहीसलामत बचावले. वरील प्रकारानंतर आमच्या सामानांची तपासणी करण्या-सही पोलिस धजावले नाहीत !

ऑक्टोबर महिन्याच्या १२ तारखेस आम्ही बालीपाऱ्यास जमा झालो. प्रत्ये-काच्या हृदयात एकप्रकारची धडधड होत होती. काम मोठं जोखमीचं होतं. आज-वर कुणी केला नाही असा अचाट विक्रम आम्ही करणार होतो. हा प्रयत्न साधला तर भारतमातेचे स्वातंत्र्य दूर नाही याची खात्री वाटत होती. पण हा प्रयोग फसला अगर शत्रूला सुगावा लागला तर ...... पण नकोच तो विचार !

बालीपारा हायस्कूलच्या मैदानावर आमचा तळ पडला. वर्मा व शिवस्वामी प्रत्येक भारवाहकास एक एक खेचर व सामान वाटून देत होते. भारी सामान खेचरा-वर व हलके सामान भोटियांनी स्वतः वाहायचे असे ठरविले होते. प्रत्येक भार-वाहक आपले झोंबू निवडून घत होता. भोटियांच्या भाषेत खेचराला झोंबू म्हणतात.

सारी तयारी झाली ! १५ तारखेस प्रातःकाली प्रस्थान मुहूर्त होता. त्या दिवशी सारे गाव आम्हांला निरोप देण्यास आले होते. तेजपूरचे डेप्युटी कमिशनर पण बालीपाऱ्यास हजर होते. त्यांनी निरोपादाखल केलेल्या भाषणात आम्ही या भागाची नीट पाहणी करून सरकारला मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. आम्ही 'चढणार' असलेल्या ताकपाशिरीवर फडकविण्यासाठी त्यांनी युनियन जॅक पण आमच्या स्वाधीन केला. ( आम्हीही तो दुसऱ्याच दिवशी दरीत फेकून दिला ही गोष्ट वेगळी ! ) ऑक्टोबर महिन्यातील पहाडी वाऱ्यांनी आम्हां कलकत्ता-वासियांची चांगलीच त्रेधा उडविली. बारिक पाऊसही होता. वर्मांच्या इशाऱ्याबरो-बर आमचा काफिला उत्तरेचा रस्ता काटू लागला. भोटियांचे आवाज व खेचरांचे खिकाळणे यांचे एक विचित्र मिश्रण वातावरणात पसरू लागले.

वर्मा काफिल्याच्या आघाडीवर होते. बिजोय बोरा त्यांच्याबरोबर होता. बाली-पाऱ्याचा पश्चिमेकडील हा भाग म्हणजे बोमदि—ला. तवांगपर्यंतचा भाग तसा बराच परिचयाचा होता. कारण तिबेटमध्ये जाण्याचा हा राजमार्ग होता. शिवाय तवांग येथे बौद्धांचा आशियातील सर्वांत मोठा मठ आहे. यात्रेनिमित्त भारत व तिबेटातील यात्रेकरू याच रस्त्याने येतात. बिजोयचे वडील या भागात जंगला-धिकारी होते. बिजोय आपल्या वडिलांबरोबर बऱ्याच वेळा या भागात आला होता.

काफिल्याच्या मध्यभागी मी, अशोष व शिवस्वामी होतो. आम्ही तिघेही झोंबू-वर स्वार झालो होतो. आमच्यासमोर चाललेल्या खेचरांवरील सामानात प्लँटचे सुटे भाग भरले होते. ही खेचरे नेहमी आपल्या दृष्टीसमोर ठेवण्याचा आमचा निश्चय होता.

आमच्यामागून भोटिया भारवाहक आपापल्या खेचरांसह येत होते. तुकडीच्या शेवटी सरित, कॅ. हल्दर व डॉ. चौधरी होते. आम्ही सारे उत्तरेस निघालो होतो! एक 'शिखर' गाठण्यासाठी! खरोखरच आम्ही स्वातंत्र्य शिखर गाठण्यासाठी निघालो नव्हतो काय?


आमच्या पहिल्या टप्प्याबाबत काही फारसे सांगण्यासारखे नाही. चिनी आक्रमणानंतर तुम्हांला पाठ झालेली चाकू, शेरगाँ ही खेडी मागे टाकून आम्ही बोमदि-लास तळ ठोकला. बोमदि-ला हे त्या वेळी कामेंग विभागाचे ठाणे नव्हते. ला म्हणजे खिड! बोमदीच्या खिडी मुळे ते या भागात प्रसिद्ध होते. याच खिडीतून तवांग व पुढे तिबेटला जाणारा परंपरागत रस्ता होता. रापलेल्या रस्त्याने गेल्यास जमणार नव्हते म्हणून बोमदि-लाहूनच आम्हांला ईशान्येस ताकपाशिरीकडे तोंड करून वळायचे होते.

बोमदि-लातील रहिवाशांनी आमचे प्रेमाने स्वागत केले. हे रहिवासी मोन्पा जमातीपैकी आहेत हे आता सर्वांनाच माहिती आहे. हे लोक अतिशय शान्त, आनंदी व कलाप्रेमी आहेत. बुद्धाचा संदेश जर कुणी आचरणात आणला असेल तर तो यांनीच! मोन्पांचे 'बुढाबाबा' बिजोयला ओळखत होते. त्याच्याकरवी आमची नीट व्यवस्था लागली. तेथील रिवाजाप्रमाणे सत्काराचे प्रतीक म्हणून आम्ही बुढाबाबांस खादा गळपट्टा भेट दिला.

ऑक्टोबर १७ ची रात्र! आम्ही रात्री बैठक बोलवली होती. बैठकीस बुढाबाबा व दोन प्रमुख आले होते. १८ ला सकाळीच निघावे असे ठरले होते पण संध्याकाळपासून पावसाची ही झोड लागली होती. या भागातला पावसाळा विचित्रच! एप्रिल ते ऑक्टोबर हे पावसाळ्याचे दिवस. तसा सप्टेंबर महिन्यातच पावसाला उतार पडतो व दिवाळीपासून बर्फ जमण्यास सुरुवात होते. पावसाळा ते बर्फ वर्षाव या दरम्यान आम्हांला जेमतेम महिना मिळत होता. तेवढ्या वेळात आम्हांला नियोजित जागी पोचणे भाग होते. तेव्हा पावसाची पर्वा करून चालणार नव्हते. बाहेर पावसाबरोबरच थंडीचा कडाका वाढत होता. कदाचित् धुके पडत असेल!

आमच्यासमोर बुढाबाबा व त्यांचे साथीदार तोंडाने मंत्र म्हणत हातांतील चक्र फिरवीत बसले होते. त्यांना आम्ही ताकपाशिरीकडे जाण्याचा जवळचा रस्ता विचारला. बिजोयने भाषांतर करून आम्हांस सांगितलेली माहिती अशी :—

बोमदि-लाच्या उत्तरेस परंपरागत रस्त्याने १४ मैल चालून गेल्यावर तांगा नदी लागेल. रस्ता सोडून या नदीच्या काठाकाठाने उगमाकडे गेल्यास ताकपाशिरीकडे जाता येईल. कारण ही नदी तेथूनच कुठूनतरी उगम पावत असावी. तांगा खोऱ्यात तागीन जातीचे वास्तव्य आहे. हे लोक मोन्पाचे भाऊबंद आहेत. बुढाबावांचा निरोप दिल्यास त्यांचीही मदत होण्यासारखी आहे.




पथकाच्या प्रवासाचा मार्ग

सामने

आम्हांला तेवढी माहिती पुरेशी होती. बुढाबाबांना निरोप तर दिल्यानं आमची बैठक पुढे चालू झाली.

" मग धरायचा का हा रस्ता ! " सरितनं विचारलं. " अर्थात् ! त्या शिवाय दुसरा मार्गच नाही." शिवस्वामी उत्तरले.

" पण मला वाटतं, " कुणाल म्हणाला, " यापेक्षा आपण परंपरागत रस्त्याने थाग-ला पर्यंत गेलो तर आपला बराचसा त्रास वाचेल. नंतर आपण थाग रांगांच्या कडेने पूर्वेकडे वळू शकतो."

पण सरितने त्याला विरोध केला. " कारण एकतर नेमका ताकपाशिरीकडे जाण्याचा आपला हेतू नाहीच. शक्यतो लवकर हा रस्ता सोडून पूर्वेकडे वळणेच सुरक्षितपणाचे ठरणार आहे."

" सरितचं म्हणणं योग्य आहे. " अशोष म्हणाला. पुढे तो कुणालकडे तिरप्या नजरेनं पाहत म्हणाला, ' पण या महंताची तवांग यात्रा मात्र हुकली ! "

सकाळचे ६ वाजले आहेत. तसा आसामकडे सूर्योदय सकाळी साडेपाचलाच होतो. त्या मानाने सहाला चांगलेच उजाडायला पाहिजे. पण दाट धुक्यामुळे चांगलाच अंधार दाटला होता. दोन हातापलीकडचे काही दिसत नव्हते. पाऊस बंद झाला होता. पण रस्त्यांतून ओहोळ वाहतच होते. बुढाबाबाचा आशीर्वाद आणि इतर मोन्पांचा निरोप घेऊन आमची यात्रा पुन्हा सुरू झाली.

हळूहळू रस्ता अधिकाधिक वर चढू लागला. पर्वतांच्या रांगा एकामागे एक अशा उभ्या होत्या. जणू जमिनीवरील लाटाच ! एक रांग पार केली की दुसरी त्याहून मोठी रांग दत्त म्हणून पुढे उभी राही ! या साऱ्या पहाडांवर किर्र जंगल होते. इतकी सुंदर वनश्री मी दुसरीकडे पाहिली नव्हती. भारताचे नंदनवन शोभेल असा हा भाग ! निसर्गनिर्मित उपवने ! औषधी वनस्पती, वेळू, देवदारांचा समूह त्यांना लपेटून स्त्रीसारखा लाजणारा वेलगुलाब ! पाच-सहा पाकळ्यांचा नाजुक गुलाब. निसर्गबालकाचे निरागस हास्यच जणू. मधून मधून पांगराही होता. विशेष म्हणजे या ऋतूत तो अग्नीसारखा फुलून तांबडालाल दिसत होता.

आज मी वर्माच्याबरोबर पुढच्या टोळीत होतो. माझ्या मागोमाग अशोषही आलाच ! तांगा नदीच्या काठाने आम्ही चाललो होतो. काठाने म्हणणे फारसे बरोबर होणार नाही. त्या ऐवजी तांगाच्या दरीतून चाललो होतो, असे म्हणणे योग्य होईल. दोन पर्वतरांगांमधून तांगा नदी सापाप्रमाणे वळसे घेत धावत होती. तिच्या प्रवाहाच्या उलट दिशेने, पात्रापासून दोन हजार फूट उंचीवरून पायवाटेने आम्ही चाललो होतो. विरलेल्या धुक्यातून तिचे बेफाट धावणारे फेसाळ पाणी मधून मधून दिसे. खरं म्हणजे इतक्या उंचीवरून नदीकडे पाहताच डोळे फिरत ! या विकट पायवाटेने चालतानाही सारखी भीती वाटे. त्यापेक्षा 'झोम्बूवरी भार

टाकुनिया' डोळे झाकून बसणे अधिक सुरक्षितपणाचे होते.

आम्ही सारखे वरवर चढत होतो. मधूनच थोडा सपाट भाग लागे. क्वचित् उतारही येई. पहाडावर चढण्यापेक्षा उतरणे किती कठीण असते याचा अनुभवच घेतला पाहिजे. सपाट भाग अगर चढतीवर झोम्बूचा उपयोग करावा, उतरणीवर झोम्बुवरून खाली उतरावे, अशा आम्हांस सूचना दिल्या होत्या. आता चढउतार सारखा लागत होता आणि झोम्बूवरून चढउतार करण्याची कवाईत करून आम्ही थकून गेलो. आधीच मांड ठोकून बसल्यामुळे गुडघ्याच्या सांध्यांना चांगलीच रग लागली होती. अशा परिस्थितीत खेचरावरून उतरून पायी चालणे म्हणजे एक प्रकारे शिक्षाच होती.

"छे ! छे ! हे काही आपल्याला जमणार नाही बुवा !" अशोष कुरकुरला, "कलकत्याला कसा आराम होता."

"मग जा परत ! तुझी कोणी मनधरणी केली होती !" वर्मा कडाडले. त्यांना बरेच दिवसांनी संधी मिळाली होती.

"गेलो असतो हो ! पण तुम्हांला त्या शिखरावर चढलेले पाहण्याची फार इच्छा आहे. तुम्ही ताकपाशिरी पादाक्रांत केले की, मी सुखाने परत जाईन !"

"तुम्ही सुखरूप पोचलात की, मी सुखाने प्राण सोडीन," या बाजी प्रभूच्या चालीवर अशोष म्हणाला.

वर्मांनी मनात अंक मोजण्यास सुरुवात केली !

काही वेळ शान्ततेत गेला.

"का हो वर्मा," अशोषने पुन्हा त्यांना हाक मारली, "समाजवादाबद्दल तुमचं काय मत आहे ?"

"चांगलं मत आहे." वर्मा तुटकपणे म्हणाले.—

"तसं नव्हे हो !" अशोष पुढे बोलला, "सम्पत्तीच्या समान वाटणीबद्दल तुमचं काय मत आहे ?"

"गप्प बसून राहा !" वर्मांनी दरडावले.

"रागावू नका बुवा ! मी विचारतो की, एखाद्याकडे कुठल्याशा वस्तूचा आवश्यकतेपेक्षा अधिक संचय असला आणि दुसऱ्यास त्याची गरज असली तर पहिल्याने ती दुसऱ्यास द्यावी का नाही ?"

"देणे माणुसकीस धरून होईल." आता वर्मा त्या चर्चेत नकळत भाग घेऊ लागले.

"आणि तो देत नसेल तर गरजवन्ताला ती वस्तू हिसकावून घेण्याचा हक्क आहे की नाही ?"

"बरोबर आहे ! मूर्ख संचयदारांना लुबाडलेच पाहिजे !"

"तर मग वर्मासाहेब, तुम्ही 'तसे' संचयदार आहात, आणि गरजवन्त

त्यांचा हक्क बजावीत आहेत !"

वर्मांनी लगाम खेचून झोम्बूला थांबविले. ते गोंधळून गेले. ते ओरडले, "काय म्हणतो आहेस तू ?"

"काही नाही," अशोष थंडपणे बोलला. "तुमच्या अंगात वाजवीपेक्षा अधिक रक्त आहे आणि गरजवन्त जळवा ते पीत आहेत एवढेच तुमच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो !"

वर्मांनी झोम्बुवरून ताडकन् खाली उडी मारली. त्यांच्या डाव्या पायास तीन जळवा चिकटल्या होत्या. रक्त पिऊन त्या चांगल्या ४-४ इंच लांबीच्या झाल्या होत्या ! त्यांना ओढून काढण्यास वर्मांना चांगलेच प्रयास पडले. "माझं रक्त आटवायला एकटा अशोष पुरे आहे. तुम्ही कशाला आलात बायांनो !" वर्मा त्राग्याने पुटपुटले !

सायंकाळी ४ च्या सुमारास आम्ही केवळ १५ मैलांची मजल मारून सिंग-चाँग या खेड्यात आलो. कुणालच्या ॐ पद्येन नंखे दुकवेन खेदुकपेन जमातीत आमच्याबद्दल आपुलकी निर्माण केली.

तिसरा मुक्काम पोशिंगला येथे पडला. पोशिंगखिंड चांगलीच कठीण होती. या भागाची उंची १५ हजार फुटांवर होती. झाडी विरळ होऊन बर्फाचं प्राबल्य वाढत होतं. येथील हवा अतिशय विरळ आणि भयंकर थंड ! कल्पना करता येणार नाही एवढी थंड ! श्वासोच्छ्वास करणे जड जात होते. नाकातून हवा ओढताच वेदना होत. बाहेर सोडताच ती गोठून ओठावर जमा होई ! चारचार हातमोजे घातले तरी ऊब येईना ! या थंडीत हातापेक्षा पायाला अधिक जपणे आवश्यक होते. शरीराचा थोडासा जरी भाग अनावृत राहिला असला, असता तरी तो ताबडतोब बधीर होऊन तोडणे भाग पडले असते !

पोशिंगखिंड १५ मैल तरी लांब असेल. वर पाहिले तर उंच सुळके, खाली खोल दरी यांतून एक यार्ड रुंदीची पायवाट होती. वाटेवर गुडघाभर बर्फ साचला होता. भारवाहकांनी प्रथम देपाग या खिंड देवाची प्रार्थना केली व आम्ही जिवाचा धडा करून खिंड ओलांडण्यास सुरुवात केली.

पोशिंग दरीतून आमचा भयंकर प्रवास सुरू झाला. खाली डावीकडे पाहिले तर डोळे गरगरा फिरत. खाली ४-५ हजार फुटांवर नदी असावी. 'असावी' म्हणण्याचे कारण ती दिसत नव्हती. तिचा भयानक खळखळाट तेवढा ऐकू येत होता. विशाल काळे मेघखंड दरीत विहरत होते त्यामुळे वातावरण कुंद झाले होते. हे कृष्णमेघ रस्त्यावर आले की पुढली वाट दिसत नसे. थोडा पाय चुकला की दरीत मोक्ष ! पण अशा वेळी चतुर झोम्बू कड्याच्या बाजूस आपले अंग घासत पुढे जात !

एकच्या सुमारास सूर्यकिरणांनी अविरत युद्ध करून मेघखंड व थंडीचा जोर

थोडा कमी केला. आता वाट नीट दिसू लागली. आमचा काफिला एक मैल तरी लांब असेल. प्रत्येकजण दुसऱ्यापासून थोडे अंतर राखून चालला होता. एखादे खेचर आपल्या आपल्या पितृवंशाच्या गुणाचा साक्षात्कार होऊन दुगाण्या झाडू लागले तर मागच्यांची दरीत गच्छंती होऊ नये म्हणून ही खबरदारी होती!

आमच्या रस्त्याने भयानक वळणे घेतली होती. रस्ता आतल्या अंगास वळला की चंद्रकोरी रस्त्यावर आमचा सारा काफिला एकदम नजरेस पडे. मग आम्ही आरडा-ओरडा करून एकमेकांना संदेश देत असू. उलट रस्ता बाहेरच्या बाजूने वळताच आपले सारे साथी लुप्त होत आणि या विशाल भूमीवर आपण एकटेच आहोत असा भास होई! एका जागी असेच वळण आम्ही पार केले आणि समोरचे दृश्य पाहून आम्ही दंग झालो. उंच सुळक्यावरून एक प्रचंड प्रपात आमच्या डोक्यावरून वेगाने दरीकडे झेपावत होता! एवढा उंची प्रपात मी पाहिला नव्हता. त्याची उंची ५ हजार फूट तरी असावी. गिरसप्पा, नायगारा त्याच्यापुढे खेळण्यासारखे दिसले असते. कड्यावरून तो उसळी घेऊन थेट दरीत पडत होता आणि त्या कड्याच्या आधारे धबधब्याच्या मागून आमची वाट होती. निसर्गाचा केवढा चमत्कार. ते दृष्य आम्ही डोळे भरून पाहिले आणि पाण्याची कमान ओलांडून पुढे निघालो

आम्ही बराच वेळ चालत होतो. एकाएकी पुढील बाजूस कसला तरी कोलाहल ऐकू आला. त्यांतच खेचरांचे खिकाळणे आणि कुठल्याशा पक्ष्याची कर्कश चिरचिर ऐकू आली. पाठोपाठ बंदुकीचे दोनचार बार ऐकू आले. ५–६ गरुड पक्षी आवाज करीत दरीच्या दुसऱ्या बाजूकडे गेलेले आम्ही पाहिले. कोलाहल माजलेला भाग अगदी पुढे व बाह्य वळणावर होता. त्यामुळे तेथे काय घडले ते दिसत नव्हते. निरनिराळ्या कुशंकांनी माझं हृदय धडधडू लागलं. त्यातच दोन–चार बारही ऐकले होते. मन चिंती ते वैरी न चिंती!

काय बरे घडले असेल! सारा काफिला जागच्या जागी उभा होता. कोलाहलात आता स्त्रियांच्या रडण्याचा आवाजदेखील सामील झाला होता.

पुढे जाऊन काय घडले ते पाहायचे अशा निश्चयाने मी पुढे निघालो पण त्या चिंचोळ्या वाटेवर सामान लादलेल्या खेचरांना ओलांडून जाणे अशक्य असल्याचे मला थोड्याच वेळात आढळून आले. तेवढ्यात माझे लक्ष समोर गेले. भोटिया व संरक्षकांच्या हातून हस्तांतरित होत एक नळकांडे माझ्याकडे येत होते. जवळच्या भोटियाने ते मला दिले. नळकांड्यात सरितने लिहिलेली चिठ्ठी होती.

'... पुढे एक अपघात झाला आहे. उंच कड्यावर राहणाऱ्या गरुडांनी चिडून आघाडीवरील खेचरांवर हल्ला केला. खेचर बिचकून दरीत कोसळले आणि त्याबरोबर एक भोटिया पण!'

अरेरे! अखेर आमच्या मोहिमेत एक अपघात झालाच! पुढे अजून कोणती

संकटे वाढून ठेवली आहेत, ते ईश्वरासच ठाऊक ! पण गरुडराजांनी आमच्यावर का हल्ला केला असावा ! त्यांच्या राज्यांत नवीन प्राणी पाहून ते पक्षीराज चिडले असावेत. कदाचित, उंच कपड्यावर त्यांचे घरटेही असेल. पिलांच्या रक्षणासाठी त्यांनी हे दिव्य केले असेल ! या लढाईत दोन गरुडांनाही प्राणांचे मोल द्यावे लागले होते !

हळूहळू रांग पुन्हा हलू लागली. थोड्याच वेळात मी अपघाताच्या जागी पोचलो. दरीच्या कड्याकडील कच्चा भाग थोडा ढासळला होता. दरीत खेचर किंवा त्या दुर्दैवी भोटियाचा मागमूसही दिसत नव्हता. माझं मन या प्रसंगाने फार विषण्ण झाले.

दरीतून पुढे सरकत आम्ही खिंडीच्या तोंडाशी आलो. आणि सारेच दृष्य पालटलेले दिसले !

समोर एक भव्य पठार होते. हिमालयाच्या माथ्यावर या भागात एवढे औरसचौरस पठार असेल याची कुणास जाणीव नव्हती. उत्तर दिशेस पर्वताच्या तीन रांगा होत्या. शेवटच्या रांगेत जवळ जवळ दोन शिखरे होती. लहान शिखराचे नाव गोरिचेन व दुसरे भव्य रुन्द दिसणारे शिखर त्याचे नाव होते कांगटो ! या दोन शिखरांच्या पूर्वोत्तरेस काही मैल अंतरावर एक उंच निमुळते बर्फाच्छादित शिखर दिसत होते.... तेच आमचे ताकपाशिरी ! किंवा अशोषच्या भाषेत ' वर्मा शिखर ' !

[ पुढील अंकी चालू ]


परसूच्या पशुकथा वसंत सबनीस

सहा साहसे दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

# जे नव्हते ध्यानी मनी

## We never meant to go so far

## या माविस रॉन्सनकृत पुस्तकाचा परिचय

## लेखांक पाचवा

[ माविस – बार्बाराने पाँडिचेरी आश्रमातून पोबारा केला......... ]

भारतात आल्यावर काठमांडू पाहिलेच पाहिजे असे कुणीतरी माविसला सांगितले होते. काठमांडू–नेपाळची राजधानी–जिथे दोन प्रकारांनी पोहोचता येते. विमानाने किंवा पायी. माविस–बार्बारा चालत निघाल्या.

राजगीर लागले. नालन्दा विद्यापीठ दोन हजार वर्षांपूर्वी येथे होते. बुद्धाचे यात्रास्थळ असल्याने तेथे विश्रामधामातून नेहमीच गर्दी असे.

त्यातून माविस–बार्बारा तेथे पोचल्यावर त्यांना कळले की, महत्त्वाचे मोठे यात्रेकरू येणार असल्याने सर्व विश्रामधामे भरलेली आहेत. हे मोठे यात्रेकरू म्हणजे भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू व त्यांच्याबरोबर दलाई लामा व पंचेन लामा हे होते. तिबेटहून भारतभेटीसाठी दोघे आले होते.

राजगीरमधील सरकारी अधिकाऱ्यांशी हुज्जत घालून, दोघींनी एका विश्रामधामात राहण्याची सोय तर करून घेतली.

दुसऱ्या दिवशी उजाडल्यापासून हजारो भारतीय शेतकरी व तिबेटी यात्रेकरू गावात लोटू लागले. दुपारी टॅक्सी, बसेस व जिप्स यांचा भला मोठा तांडा आला व त्यांतून एकशेपन्नास तिबेटी अधिकाऱ्यांचा लवाजमा उतरला.

एका बन्द मोटारीतून थोड्या वेळाने पण्डित नेहरू व त्यांचे दोन पाहुणे आले. त्यांचे चेहरे कुणालाच नीटसे दिसत नव्हते, तरी जमलेली सर्व माणसे आनंदाने टाळ्या पिटीत होती.

गळ्यात कॅमेरा अडकवून माविस बार्बारासह उभी असताना, त्यांच्याजवळ एक सिक्युरिटी पोलिस ऑफिसर आला व त्याने आपणहून या दोघींना पाठोपाठ येण्यास सांगितले. ज्या ठिकाणीं पंडितजी व दोन्ही लामा जेवण घेणार होते,



पंचेन लामा, नेहरू आणि कॅमेरासह बार्बारा

त्या बंगलीच्या दरवाज्याच्या तोंडाशीच त्याने दोघींना उभे केले. माविसला कळना की, जिथे फक्त सिक्युरिटी संरक्षक पोलिसांखेरीज कुणीही जाऊ शकत नव्हते तिथे या दोघींनाच त्या अधिकाऱ्याने का प्रवेश द्यावा? कारण उघड होते. दोघीही गोऱ्या कातडीच्या तरुण पोरी होत्या. आणि त्यांना पाहून कोणालाही आनंदच होणार होता.

माविस कॅमेरा हलवीत उभी होती. तितक्यात पण्डितजी त्या बंगलीसमोर मोटारीतून बाहेर आले. पण्डितजींनी या दोघींकडे क्षणभर पाहिल्यासारखे केले व लगेच ड्रायव्हरला त्यांनी विचारले, की, नालन्दाचा रस्ता ठाऊक आहे ना? कॅमेऱ्याकडे कुतूहलाने पाहत शेजारी उभी असलेली व्यक्ती म्हणजे पंचेन लामा होती. लगेच माविसने विचारले, "फोटो घेऊ का?"

पंचेन लामा अंगावरचा लाल झगा नीट सावरीत स्मित वदनाने फोटोसाठी तयार झाले. मग दलाई लामा, पंचेन लामा व नेपाळचे पंतप्रधान यांच्या गळ्यात गळे घातलेला एक फोटो माविसने घेतला.

एका उघड्या कॅडिलॅक मोटारीत, नेहरूंबरोबर दोन्ही लामा नालन्दाला जाण्यासाठी निघाले. तिघांनी माविस–बार्बाराला 'टाटा' केले. कारण तिथे, त्या दोघींशिवाय बाकी सगळे सिक्युरिटी पोलिस होते.

माविस म्हणाली, "बार्बारा, यांच्या पाठोपाठ गेले पाहिजे."

पण्डितजींच्या मोटारीमागे निघालेल्या सिक्युरिटी जिपमध्ये दोघी घुसल्या... कुणी 'नाही' म्हटले नाही!

जिथे नालन्दा विद्यापीठ होते, त्या ठिकाणी लहानसा समारंभ होता. माविसला

व्यासपीठावर चढून फोटो घेण्याची परवानगी मिळाली. इतकेच नव्हे तर सर्व प्रेस फोटोग्राफर्सना 'चलेजाव' झाले तरी माविसला फक्त मागे राहण्यास कुणी प्रत्यवाय केला नाही.

समारंभ आटोपला. दोन्ही लामा मोटारीतून निघून गेले. नेहरू एकटेच मागे राहिले. स्वतःशीच ते पुटपुटत होते, "It is nobody's responsibility—nobody cares." ( कुणाला जबाबदारी नाही; पर्वा नाही ! ) ते काहीशा रागातच एका चार–पाच माणसे कोंबलेल्या दुसऱ्या छोट्या मोटारीजवळ गेले. हातातला हार व गुच्छ त्यांनी मोटारीतल्या एका स्त्रीच्या हाती दिला व मोटारीतल्या छोट्या मुलाला मस्तकावरून कुरवाळीत, मोटार सुटता सुटता त्यांनी सांगितले, "कलकत्याला भेटू–"

ही सर्व माणसे दलाई लामांची कुटुंबीय होती व त्यांना असे वाऱ्यावर सोडल्याबद्दलच पंडितजी रागावले होते.

नेपाळची सरहद्द ओलांडून माविस व बार्बारा गाडीने काठमांडूला पोचल्या. काठमांडूत पोचल्यावर दोघींना समजले की, दुसऱ्याच दिवशी चीनचे पंतप्रधान चाऊ–एन्–लाय् हे काठमांडूला येणार आहेत. माविसने विचार केला, नेहरूंचे फोटो विनासायास मिळाले तसे चाऊचेही मिळवू. काठमांडूत त्या दिवशी प्रेस फोटोग्राफर्सना पासेस् दिले जात होते. सरकारी कचेरीतून दोघींनी पास काढले.

## पथ्यावर पडलेली धक्काबुक्की

दुसऱ्या दिवशी सकाळी काठमांडूच्या विमानतळावर पोलिस, वृत्तपत्रकार व मंत्र्यांबरोबर माविस-बार्बारा ही दुक्कल चाऊच्या स्वागतासाठी हजर झाली. एक नेपाळी माणूस तेवढ्यात येऊन दोघींशी गप्पा मारू लागला. इकडच्या तिकडच्या गप्पा खूपच रंगल्या. विमान येत असल्याची सूचना मिळताच गप्पा संपवून मंडळी आपापल्या नियोजित जागी गेली. माविसशी गप्पात रंगलेल्या त्या नेपाळी गृहस्थाने चाऊचे प्रथम स्वागत केले तेव्हा त्या दोघींच्या लक्षात आले की, तो गृहस्थ नेपाळचा पंतप्रधान होता !

चाऊ विमानाबाहेर येताच एकच झुंबड उडाली. नेपाळी मुलामुलींनी फुले उधळली. प्रेस फोटोग्राफर्स चोहोबाजूंनी पुढे धावले. पोलीस लोकांना अडवू लागले.

धक्काबुक्कीत माविस चेंगरली. तिला धक्के मारून प्रेस फोटोग्राफर्स पुढे सरकत होते. चारी बाजूंनी रेटा असह्य होताच माविस मोठ्याने ओरडली. तिचे ओरडणे चाऊच्या कानांवर गेले व हाताने गर्दी दूर करीत चाऊने माविसला विचारले, "What do you want? A photograph?" ( काय हवंय तुम्हांला ? फोटो ? ) माविसला आपल्याशी चीनचा चाऊ बोलतो आहे हे पाहून

घक्काच बसला. ती स्वतःला सावरीत म्हणाली, "फोटोच हवाय ! पण माझ्या मैत्रिणीबरोबर तुमचा फोटो घ्यायचा आहे."

गर्दीत लपलेल्या बार्बाराला माविसने हाक मारली व तिची 'ओ' येताच तिला धावत चाऊशेजारी उभी राहा, असे तिने सांगितले. बार्बारा वेड्यासारखी पाहत राहिली. जेव्हा माविसने तिला चाऊजवळ ढकलले व कॅमेरा चालव तितक्यात दुसराच एक फोटोग्राफर मध्ये अडमडला.

चाऊने माविसची गडबड पाहून सावकाश दुसरा फोटो घेण्यास सांगितले. आता बार्बाराचे आश्चर्य संपले होते व तिने चाऊशेजारी आपली हसरी छबी नीट घेऊ दिली.

माविसने बार्बाराला इतक्याचसाठी फोटोत ढकलले होते, की फोटो खरोखरच दोघींनी घेतला हे घरच्या मंडळींना खरे वाटावे. चाऊच्या पुढल्या सर्व कार्यक्रमांत माविस-बार्बारा यांना चाऊने इतक्या वेळा पाहिले की, त्यांच्याशी चाऊची चांगली दोस्तीच झाली. राजे महेंद्र यांना माविसला फोटो घेऊ देण्याची विनंती खुद्द चाऊनेच केली. काठमांडू उरकून दोघी विमानाने दार्जिलिंग येथे आल्या व तेथून सिक्कीमला गेल्या. गंगटोक ही सिक्कीमची राजधानी. तिथे दोघी बसने भारतीय वकिलातीकडे गेल्या. त्या तिथल्या दरवाज्याशी पोचतात तोच तिथल्या द्वाररक्षकाने दोघींना बाजूला उभे राहण्यास सांगितले.

रेसिडेन्सीत गार्डन पार्टी होती. सिक्किमी व तिबेटी वेशात बरीच मंडळी वकिलातीत आलेली होती. या गर्दीतून दोघी आत गेल्या.

तितक्यात एका उघड्या मोटारीतून दलाई लामा व सिक्कीमचे राजे आले. खाना सुरू झाला. माविस व बार्बारा या दोघींचीही त्यातच वर्णी लागली.

गंगटोकहून दोघी कलकत्त्याला गेल्या. तिथे एक-दोन दिवस एका इंग्लिश मैत्रिणीकडे राहून दोघींनी भारताचा निरोप घेतला.

भारतातील मुक्कामात त्यांनी ज्या ज्या गमती अनुभवल्या तशा पुढल्या प्रवासात अनुभवता येतील किंवा नाही या विचारात दोघी रंगून निघाल्या होत्या.

[पुढील अंकी चालू]

**रा. म. शास्त्री**

# ▫ गणगोत

## जिव्हाळ्याने न्हालेली व्यक्तिचित्रे

"अशा प्रकारच्या पुस्तकांमध्ये काय होतं, सगळीच व्यक्तिचित्रे अफाट स्तुती करून लिहिलेली असतात. एक चित्र वाचून आपल्याला वाटू लागतं की हिच्यासारखी असामान्य व्यक्ती दुसरी कोणतीच नाही. आणि पुन्हा पुढचं वाचावं तो तितकीच अफाट स्तुती आढळून येते. प्रत्येक-जण जणू 'न भूतो न भविष्यति' इतका मोठा !"

—पु. लं. चे 'गणगोत' माझ्या हातात पाहून एका 'जाणकार' मर्मज्ञाने अभिप्राय ठोकून दिला होता. त्याच्या अभिप्रायाला मी मुळीच महत्त्व दिले नाही; परंतु असा गैरसमज बऱ्याच वाचकांमध्ये आढळून येतो. त्याचे निरसन करण्यासाठी पु. लं.च्या 'गणगोता'इतके उत्कृष्ट पुस्तक शोधूनही सापडणार नाही.

याचे मर्म असे की मुळात कुणाचे माहात्म्य गावे, कुणाचे गुणवर्णन करावे, कुणाचे मोठेपण आवर्जून पटवून द्यावे यासाठी ही व्यक्तिचित्रे लिहिलेली नाहीतच. यातल्या काही व्यक्ती सामान्य दृष्टिकोनातून मुळीच मोठ्या नाहीत. आणि ज्या मोठ्या व्यक्तींची चित्रे यात आलेली आहेत त्यांचे मोठेपण इतके वादातीत आहे, की ते मुद्दाम पटविण्याची मुळीच आवश्यकता नाही. म्हणूनच ही चित्रे हृद्य होतात ती लेखकाच्या साक्षात जिव्हाळ्यामुळे! मग ते पु. लं.चे 'ऋग्वेदी' आजोबा असोत, अगर गानकोकिळा 'हिराबाई' असोत ! बाबासाहेब पुरंदऱ्यांसारखे



इतिहासकार असोत, अथवा 'दिनेश'सारखी छोटी खट्याळ मूर्ती असो! या साऱ्यांना पु. लं. चा जिव्हाळा न्हाऊ घालीत आहे. त्यांचा त्यांच्याशी निकट—अगदी निकट—संबंध आलेला आहे. पु. लं. नी स्वतःच म्हटल्याप्रमाणे ही सारी माणसे त्यांच्या जीवनात अगदी जवळ येऊन त्यांना भेटली आहेत. "कुणी पोटापाण्याच्या व्यवसायात भेटली. कुणी मैफिलीत भेटली. कुणाकुणाच्या मैफिलीत सामील होण्याचे योग आले. कुणी प्रवासात भेटले. कुणी शेजारी म्हणून लाभले." अशा विविध क्षेत्रांत विविध तऱ्हांनी भेटलेली ही माणसे. पु. ल. म्हणतात, "ही माणसे खरोखरीच तशी आहेत की नाहीत हे मला ठाऊक नाही. आपुलकीच्या डोळयांनी पाहताना त्यांचे जे मला दर्शन घडले त्याची ही चित्रं आहेत. न जाणो, त्यांचा आणि माझा जो सहवास घडला, त्या सहवासाचीच ही चित्रं असतील एखादे वेळी!"

—'गणगोत' वाचून झाल्यावर असे निश्चित वाटते की, ही सहवासाचीच चित्रे आहेत. म्हणूनच कदाचित ती इतकी सजीव बनून शिवाय विविधतेने नटलेली असावीत. पु. लं. चे आजोबा ('ऋग्वेदी'), छोटा दिनेश, बाय, आप्पा ही माणसे पु. लं. च्या जीवनाशी अगदी निकट आणि महत्त्वाचा संबंध आलेली. त्यामुळे त्यांची व्यक्तिचित्रे ही सर्वार्थाने सहवासचित्रे ठरतात. आयुष्यभर ध्येयवादाला साक्ष ठेवून राहणारे आणि शेवटी 'आमंत्रणाची वाट' पाहणारे 'ऋग्वेदी' आजोबा साकार होतात ते पु. लं. च्या हळुवार आठवणींतूनच; आणि पु. लं. च्या चष्म्याच्या काचेमागे कोण्या अज्ञात आनंदाचे दहिवर दाटण्यास निमित्त होणाऱ्या 'दिनेश'चा सारा खट्याळपणा, खोडकरपणा, त्याची आनंदी निर्भर वृत्ती हे सारे रंगत येते तेही त्याने 'माईकाका'ला बहाल केलेल्या बकासुरापासून डुक्कर–झुरळ यांसारख्या विशेषणांचा हात धरूनच. बाय, आप्पा यांच्याही व्यक्तित्वाचा फुलोरा आठवणींच्या कुंडीतच फुललेला आहे. पु. लं. च्या स्वतःच्या व्यक्तित्वाशी सारी व्यक्तिचित्रे सुसंवाद करतात.

### असीम आपुलकी

चिंतामणराव कोल्हटकर, इंटरनॅशनल दीक्षित, चोभे, रा. ज. देशमुख (आणि मंडळी) हे लोक पु. लं. च्या आयुष्यात व्यवसायाच्या निमित्ताने आले. पण व्यवसायाची लक्ष्मणरेषा त्यांनी केव्हाच ओलांडली. ते अधिक जवळ आले, अगदी निकट आले, आतल्या वर्तुळात शिरले. त्यांना पु. लं. ची लेखणी शब्दाशब्दांतून साक्षात पाचारण करते. बळवंत मोरेश्वर पुरंदरे, मास्तर नसलेले फणसाळकर मास्तर, रावसाहेब हे अगदी समुद्रातल्या ओंडक्यांप्रमाणे सहज पु. लं. च्या जीवनात आले. 'यथा काष्ठंच काष्ठंच' त्याचा प्रवास झाला. अगदी दिलखुलासपणे त्यांच्याविषयी लिहिताना पु. लं. ची लेखणी फेसाळून उठते. असीम आपुलकीने चिंब भिजते. त्यातून ही माणसे आपल्यापुढे उभी राहतात. अगदी खरीखुरी. जशी असतील तशी, मग पुरंदऱ्यांच्या आतल्या दृष्टीला दिसणारी ती सगनभाऊची प्रेतयात्रा, रावसाहेबांचा


तो अड्डा हे सारे आपल्याला दिसते. पु. ल. दाखवतात.

पु. लं. ची लेखणी वाचकाला अगदी कुशीत घेते. त्याच्याशी हितगुज करते. सारा काही अगदी मनमोकळा आणि दिलखुलास मामला. पु. लं. च्या मनात पाझरणारा आनंद, एखाद्याविषयी त्यांना एकदम वाटलेला आपलेपणा, एखाद्याला पाहून झालेल्या त्यांच्या मनातल्या प्रतिक्रिया आणि वियोगाने लागलेली हुरहूर हे सारे इतक्या स्पष्टपणे आणि प्रभावीपणे प्रतीत होते की, वाचकाला या आपल्याच संवेदना असल्याचा साक्षात्कार व्हावा. "अस्सल मऱ्हाटी वर्ण, साऱ्या देहावर दिंडीतल्या अबीर–बुक्क्यासारखा रांगडेपणा उधळलेला, डोक्यावर बारीक कापलेल्या ताठ केसांचे, चहाच्या भुकटीत साखर मिसळल्यावर दिसते त्या रंगाचे, आणि झोपडीवर किंचित् पुढे येते तसे कपाळाच्या पट्टीवर आलेले छत, तिरकस पाहण्याची पद्धत, एखाद्याला आपण ठेवून देतो, तसे ठेवून दिलेले नाक, अंगावर लोडाच्या अभ्यासारखा चढवलेला सद्रा, खाली रुंदट पायजमा, अवघड वाटा तुडवल्याची साक्ष देणारे पाय, त्या निराकार चपला, हातात वर्गणी मागायला येणाऱ्या माणसाच्या हातात असते तसली पिशवी, अशा थाटात हा गृहस्थ पुढे येऊन उभा राहिला की, जत्रेतल्या कुस्त्यांच्या दंगलींचे कंत्राट ठरवून किंवा मोडून येणाऱ्या माणसाची आठवण होते."

—रा. ज. देशमुखांचे हे वर्णन पाहिले म्हणजे या लेखकाच्या लेखणीत फोटोग्राफीचा कॅमेरा दडून बसला आहे की काय अशी शंका येते. फोटोतसुद्धा काहीशी रुक्षता असते! इथे वर्णनाच्या जोडीला पु. लं. चे मार्मिक शेरे असे चपखल बसतात की बस्! "एकदा का देशमुखांची सवय लागली की मग मात्र चुनेगच्चीच्या भक्कम तंबाखूच्या बाराची सवय झाल्यावर मीठा पानवाल्यांचा गुळचटपणा आवडेनासा होतो तसे होते."..."पुरंदऱ्यांच्या अंतःकरणातला कवी मोहोरबंद–गोंडेदार भाषा लिहितो. पण हातातला इतिहासाचा लगाम सुटत नाही. वर्तमानाच्या रिकिबीतून पाय निसटत नाही की नजर डळमळत नाही. हा इतिहासकार भुताइतकाच वर्तमानाशी जुळलेला आहे."..."नाटकी हस्तिदंती काढून हसण्याचा भाव चिंतामणरावांच्या चेहऱ्याला रंगूनही दाखविता आला नाही आणि न रंगताही जमला नाही." यांसारखी पु. लं. ची वाक्ये म्हणजे त्या त्या व्यक्तिचित्राला पूर्णत्व देणारे, त्यातल्या 'जागा' भरून काढणारे नाजुक, नजाकतदार रंगच!

**"मैफिल"**

'संगीत' हा पु. लं. चा खास प्रांत आहे. त्यांचा कान संगीतासाठी आसुसलेला आहे. मन हपापलेले आहे. सुरावटीतल्या जागांवर दिल पेश करण्याची बेहोष वृत्ती आहे. हिराबाई, बालगंधर्व ("दया छाया घे."), म्यूझिक डा(यरे)क्टर केशवराव भोळे या संगीतातल्या दर्दी मानकऱ्यांची आणि रामूभैय्या दात्यांसारख्या बेहोष रसिकाचे चित्र रंगविताना त्यांची लेखणी फुलारून येते. तिच्या वळणा-



लेखक

बी. एस्सी.– एम्. ए.

सध्या केवळ निशिकांत मिरजकर म्हणून जवळच्या मित्राना माहीत असणारी ही व्यक्ती लवकरच प्राध्यापक मिरजकर म्हणून मराठी साहित्याच्या टीकाप्रांतात नाव कमावू लागली, तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण 'मराठी' हा विषय घेऊन यंदाच श्री. मिरजकर पुणे विद्यापीठाच्या एम्. ए. परीक्षेत पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले आहेत. गेल्या चार वर्षांत हा बहुमान कोणासही मिळू शकला नव्हता. या वर्षाची या परीक्षेसाठी ठेवण्यात आलेली चिपळूणकर–साठे–लागू स्मरणार्थ पारितोषिकेही मिरजकरांना मिळाली आहेत. बी. ए. ला मराठी विषय घेऊन त्यांनी असेच यश संपादन केले होते व त्याबद्दल त्यांना दिल्ली महाराष्ट्र मंडळाचे सुवर्णपदक व अन्य पाच पारितोषिके देण्यात आली होती.

तत्पूर्वीची चार वर्षे मात्र त्यांनी–का कोणास ठाऊक–बी. एस्सी. साठी रखडपट्टी करण्यात घालवली. बी. एस्सी. कसेबसे उरकून ते बी. ए. कडे वळले आणि त्यांना आपला प्रांत गवसला, 'जागा' सापडली.

आता प्राध्यापकी सांभाळून टीकाशास्त्रातील एखाद्या विषयावर पीएच्. डी. करण्याचा त्यांचा विचार आहे. पण 'माणूस'मधून पुस्तकपरीक्षणेही लिहिण्याचे त्यांनी आनंदाने मान्य केले आहे.

या अंकात सोबत दिलेल्या 'गणगोत' व 'वनफूल' वरील परीक्षणांच्या निमित्ताने श्री. मिरजकर प्रथमच मराठी वाचकांसमोर येत आहेत. त्यांच्या आजवरच्या सुयशाचे अभिनंदन आणि या नव्या प्रवेशाचे स्वागत. – सं.

---

वळणातून लयकारी प्रकटते. मैफिलीतले धुंद वातावरण साक्षात निर्माण होते. " हे गाणं तलम आहे पण विसविशीत नाही; भावपूर्ण आहे पण ओक्साबोक्शी

नाही; हिशेबात आहे पण रूक्ष नाही; हमखास आहे पण पढिक नाही; आणि स्वतंत्र शैली घेऊन आलं आहे, पण घराण्याचे कुलाचार सोडून नाही !" अशा तऱ्हेने हिराबाईंच्या गाण्याचे अचूक रसग्रहण करताना पु. ल. दिसतात आणि जाणकारांची मान डोलते. पण 'संगीताचे परीक्षण' हेच केवळ या लेखाचे वैशिष्ट्य नाही. या साऱ्यांचे घरगुती स्वरूपही पु. ल. सहजपणे दाखवतात. हातात तंबोरा घेऊन रसिकसभेच्या विराट संमर्दाला लुब्ध करणाऱ्या हिराबाई ते दाखवितात, तसाच पाहुणे आल्यावर त्याच्या सरबराईसाठी स्वयंपाकघरात राबणाऱ्या हिराबाईंचाही ते परिचय करून देतात. ठेवणीतल्या पैठणी-लुगड्यांच्या आणि वाळयाच्या संमिश्र सुवासाने येणाऱ्या गुंगीसारखी स्वरगुंगी आणणारे बालगंधर्व ते दाखवितात. तसेच त्यांच्या थकल्या देहातून अक्षय्य वाजणारी वीणा ऐकवितात. संगीतज्ञ आणि संगीत न जाणणारे अशा दोघांच्याही वृत्ती उचंबळून आणणारे आणि डोळे ओलावणारे सामर्थ्य पु. ल. च्या रसिक लेखणीत उतरलेले दिसते.

या साऱ्या सहवासचित्रांत एकच चित्र काहीसे अपुरे वाटते. ते म्हणजे " मला दिसलेले विनोबा !" या चित्रात विनोबांचे पु. लं. ना दिसलेले असे खास कोण-तेच वैशिष्ट्य नाही. कुणालाही दिसतील असेच विनोबा येथे दिसतात. इतर साऱ्या चित्रांतून जाणवलेली आपुलकी, जिव्हाळा, जवळीक इथे थोडीशी दूर जाते.

पुस्तकाला सुशोभित करणाऱ्या श्री. ओक यांच्या रेखाचित्रांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. लेखातून भेटलेली माणसे स्मरणात कोरून ठेवण्याला त्यांनी मोलाची मदत होते.

पु. लं. चे हे ' गणगोत ' मराठी साहित्याच्या गणगोतात जवळचे स्थान पटका-वील यात शंका नाही. □

[ ' गणगोत '– पु. ल. देशपांडे, देशमुख आणि कंपनी. मूल्य १५ रु. पृष्ठे २९७. ]

## □ वनफूल

## प्रामाणिक अभिव्यक्ती

सर्वांच्याच मनात कधी हर्षाच्या तर कधी आमर्षाच्या, कधी प्रीतीच्या तर कधी निराशेच्या लहरी उचंबळतात. कवीचे मन जास्त संवेदनशील असते. या लहरींचा खळबळाट त्याला बेचैन करतो, अस्वस्थ करतो आणि कवितेमध्ये या साऱ्यांचा हळुवार आविष्कार निर्माण होतो.

'वनफूल' मधील कविता वाचताना हे सारे जाणवते. येथे प्रभावी व्यक्तित्वाचे प्रत्ययकारी चित्रण नाही, की जीवनाच्या दारुण सत्याचे विदारक दर्शन नाही. तथापि कविमनातील नाजुक भावनांचे, विचारांचे, आठवणींचे अतिशय हळुवार रेखाटन येथे दिसते. हे करताना त्या भावनांची अगदी सूक्ष्म रंगच्छटाही तितक्याच कोमलतेने उमटवलेली आहे. विचारांचे, चिंतनाचे मूळचे स्वरूप जसेच्या तसे ठेवण्यात कवीला यश मिळाले आहे. कसल्याही जीवनविषयक तत्त्वज्ञानाच्या बासनांत त्यांना गुंडाळून टाकलेले नाही.

नवप्रतिमांच्या आहारी न जाता देशपांडयांची लेखणी अशा काही ओळी लिहून जाते की आशयाला आपोआप सजीव प्रतिमांचे अंकुर फुटतात.

**"छातीवर दगड जरी ठेवला**
**तरी ही हिरवी पाने**
**कुठून फुटतात कळत नाही"**

अशी हुरहूर ते व्यक्त करतात तेव्हा त्यांची सृजनाची, निर्मितीची, उन्मेषाची तळमळ त्यातून दिसतेच, पण शिवाय

**"कुणा अव्यक्ताशी माझे नाते जडले आहे**
**म्हणून मी माझा नाही**
**आणि सये, तुझाहि नाही"**

या पुढच्या ओळी अधिकच बोलक्या, अर्थपूर्ण होतात. सांकेतिक तत्त्वज्ञानाची पुटे न चढता व्यक्तीच्या मनाला होणारा अव्यक्तांचा साक्षात्कार एकदम सजीव होतो खऱ्याखऱ्या आपुलकीने ओलावून जातो. देशपांडयांच्या बऱ्याच कवितांतून ही जादू दिसते. त्यांमध्ये तत्त्वज्ञान आहे; पण या कविता 'तात्त्विक' नाहीत, त्यांना अध्यात्माचा ओझरता स्पर्श होतो, पण अध्यात्म हा त्यांचा विषय नाही. जीवनाशी त्यांचे अतूट आणि एकरूप नाते आहे, पण जीवनावर भाष्य करण्यासाठी त्या

लिहिलेल्या नाहीत. कवीचे स्वतःचे मन हा त्यांचा पाया आहे. तिथे ही विचारवर्तुळे भावनेच्या स्पर्शामुळे निर्माण होतात, पसरत जातात, आणि मग त्यांच्या परिघाला अंतरिक्षाचा स्पर्श होतो.

"अंतरिक्ष फिरलो पण
गेली न उदासी
गेली न उदासी;
लागले न हाताला
काही अविनाशी
काही अविनाशी!"

ही खंत स्वतःच्या मनात निर्माण होते.

"क्षितिज तुझ्या चरणांचे
दिसते रे दूर
दिसते रे दूर;
घेऊनि मी चालु कसा
भरलेला ऊर
भरलेला ऊर!"

अशी तळमळ लागते. परिभाषा व्यापक आहे, पण गहन नाही. अगदी ओळखीचा आशय ती प्रकट करते.

कवीच्या अनुभूतीही याच मापात बसणाऱ्या. व्यापक, विशाल, पण सहानुभवाचे पाणी प्यालेल्या. कधी देशपांड्यांना कुठेही पाहिले तरी पावलेच दिसतात. आकाशाच्या निळ्या मुलायम रेतीतसुद्धा त्यांचे ठसे उमटलेले असतात. त्यांची दृष्टी त्यांचा पाठलाग करते. मन त्यांची पूजा करते. आणि मग.

"तुमच्या दुःखाचा अंश
माझ्याही वाट्याला आलेला आहे.
परंतु मला साऱ्या वाटा बंद का?"

या भाबड्या, तळमळून विचारलेल्या प्रश्नाला "चल तूही पावलांबरोबर" असे उत्तर मिळते. कवी लांबलांब सावल्या सैरावैरा धावताना आणि अंधाराच्या पाण्यामध्ये बुडून मरण पावताना ते पाहतात. कधी सारा अंधारच प्यारा अशी तहान त्यांना लागते, कधी जाणिवेच्या घाटावर अंधारात अंग धुवायला येणारी आणि पश्चात्तापासाठी भांडणारी पापे त्यांना दिसतात. साऱ्या दृश्य अनुभूतींच्या कक्षा रेखून घेतलेल्या नाहीत. तरल आहेत. म्हणूनच क्षणभर कातर करण्याची शक्ती त्यांच्यात निर्माण होते. मन भारावून जाते.

रोखठोकपणा, परखडपणा देशपांड्यांच्या वृत्तीतच नाही. तो त्यांना मानवत नाही.

" अनोळखी मन तिचे
होती एक ती सडक
हवे त्याला गाठते जी
इच्छेसारखी तडक."

या ओळींना सुरू होणारी कविता सरळसरळ परखड भाषेचा हात धरू लागल्यासारखी वाटते. पण पुढच्याच क्षणी ती हळूहळू सूचकतेचा, आशयाचा तरल घुंघट ओढून घेते आणि

" नका विचारू मजला
पुढे तिचे काय झाले ?
इस्पीतळात मरण
तिला कशामुळे आले ? "

या तिच्या शेवटच्या ओळी अक्षरशः स्तंभित करून विचाराला प्रवृत्त करतात. अर्थाचे पदरामागे पदर उमलून येतात.

देशपांड्यांनी काही कवितांतून सुंदर शब्दचित्रे काढली आहेत. तीही रेखीव नाहीत, तर जेवढे दिसते त्यापेक्षा अधिक काही सांगू पाहतात. सुचवून जातात. 'सर्व वावर फुटलं' मधील कापूस वेचणारी म्हातारी, 'दुपार' मधील नदीला घुणं घेऊन चाललेली सून,– यांसारख्या व्यक्ती ते डोळयांपुढे उभ्या करतात. पण त्यांची शारीर आकृती नीटशी दिसतच नाही. त्यांचे भावविश्व मात्र सगळेच्या सगळे साकार होते. म्हातारीची लगबग, उत्सुकता, आपल्या शारीरिक असमर्थतेबद्दल तिला वाटणारी खंत, तिचा अभिमान, माय धरणीवर असणारे तिचे अलोट प्रेम, जिव्हाळा हे सारे ओळीओळींतून उभे राहते.

'वनफूल' मधील प्रेमकवितांतून प्रीतीची भावना अगदी हळुवारपणे फुलारली आहे. त्यांतल्या प्रतिमा, त्यांतली क्षणचित्रे, त्यांतल्या आठवणी, सांगण्याची पद्धती– सारे नाजूक, नजाकतदार आणि तरीही संपूर्ण वास्तव आहे. यात स्वप्नाच्या दुनियेतील भ्रमण नाही, पण

" जागृतीच्या वृक्षाखाली
स्वप्नपाकळ्यांचा सडा :
ओठांवर रेंगाळतो
स्पर्श ओठांचा तेव्हडा "

अशी गोड शब्दांत फुलणारी रम्य अनुभूती आहे. सांडल्या सुखाची अवीट आठवण आहे.

" या गुलाबाच्या वाळक्या काडीवरून
जरी तू हात फिरवलास
तरी तिला फुले येतील अशी तू ! "

किंवा

"खुडलेस तुवा मला
फुललेल्या गेंदापरी;
नाही ठेविलास प्राण
तोहि म्हणायाला उरी !"

यांसारख्या ठिकाणी अभिव्यक्तीचा आगळा आविष्कार दिसून येतो. प्रीतीच्या झुळकीने हलणारे काळजाचे पान, उन्हे वर आली तरी गात्रांवर रेंगाळणारी स्पर्श-छाया, चांदण्यात न्हाऊन केस वाळविणारी दुनिया या आणि अशाच मुग्धमधुर अनुभवांना स्पर्श करणारी प्रीती देशपांड्यांनी अतिशय सुकुमारतेने गोंजारली आहे. मनामनाच्या तळापासून ढवळून निघणारी आणि उभे जीवन ज्वालांच्या तांडवांनी व्यापणारी दाहक प्रीती त्यांच्या ओळखीची नाही. निरभ्र आकाशातल्या तारकां-प्रमाणे त्यांच्या प्रीतीचे सूर हलके हलके उमलून येतात. विफल प्रीतीची हुरहूर ते व्यक्त करतात ती ही

"उगा हालवितो चाफा
नसताना फुले पाने;
कसे जमावे आपणा
रित्या मनांनी भेटणे ?"

किंवा

"उगीच खुडला
वेलीचा बहर;
उगीच जिभेला
लाविले जहर !"

अशा मुलायम परंतु मनाला चटका लावणाऱ्या शब्दांत. त्यांचे मोजकेच शब्द जाणिवेचा काठ ओलावून जातात.

देशपांड्यांची ही संवेदनाशील जाणीव भोवतालच्या निसर्गाशी अगदी आपुलकीने हितगुज करते. संध्येचा श्यामल कोवळा हात पकडू पाहणारा नदीकाठचा उडता बगळा तिला आवडतो, पुसट पुसट क्षितिज रेषा पाहून दोन जिवांची अस्फुट भाषा तिला आठवते, लाज संकोच टाकून किनाऱ्याशी बोलणारी निर्भीड लाट तिचे लक्ष वेधून घेते. या साऱ्या दृश्यांतून मोहक समासोक्तीच्या गुंफणी घडत जातात आणि कवीच्या आंतरविश्वात निसर्ग हळूच पाऊल टाकतो. ठसा उठवतो.

कधी देशपांडे मिस्किलपणाचा बुरखा चढवतात आणि मग "कसं काय चिंतक, कुठवर आली चिंता ?" असे गमतीदार प्रश्न उभे राहतात. "जाऊन या, यात्रेला जाऊन या :" असा उपरोधिक आग्रह सुरू होतो. मृत्यू, अँब्युलन्स आणि स्मशान-यात्री यांच्यांतील विदारक संबंधांची सहज जाणीव करून दिली जाते. अगदी तळाशी

असलेले छोटे मासे वर आल्यावर मोठे कसे होतात, प्रमोशनाच्या फिकिरीत उष्टे घास गिळू लागतात, पळायला पाय नसल्याने वाळूत तडफडू लागतात या साऱ्यांचा तपशील अगदी तटस्थपणे, पण खोचकपणे कथन केला जातो.

या साऱ्यांतून देशपांड्यांचे कविमन आकार घेते. घोटीव, ठाशीव नव्हे, पण अगदी गुळगुळीतही नव्हे. त्याला कुरतडणारे कंगोरे नाहीत, पण त्याच्या साऱ्या नाजुक किनारी, त्याला पडणाऱ्या खळ्या आणि क्वचित काटेरी लव हे सारे या कविता अगदी जिवंतपणे दाखवितात. आकाशाला आलोडन घालण्याची या कवीची धडपड नाही. पण ते करण्याची धडपड त्याच्या पंखांत निश्चित आहे याची खात्री पटविणारी उत्कट सहानुभूती आणि संवेदनशीलता येथे आहे. देशपांड्यांच्या कवितांचे बंध, त्यांच्या आकृती, कुठल्याच पठडीतल्या नाहीत. बऱ्याच वेळा अनिलांची आणि क्वचित पाडगावकरांची पुसट सावली त्यांच्यावर पडते. पण ते 'अनुकरण' नाही. एकाच प्रवृत्तीचा तो उत्स्फूर्त निनाद आहे.

म्हणूनच देशपांडे जेव्हा अगदी गंभीर होतात, आत्मविश्वासाने उफाळून निघतात आणि म्हणतात—

> "माणसाच्या मुक्तीचे अग्रदूत आम्ही :
> नवी टवटवी आम्हाला प्रथम दिसते;"

तेव्हा तो उसना आवेश वाटत नाही, तर कवीच्या मनाचा आणखी एक अमोघ कप्पा उघडल्याचा आनंद होतो.

सरकारी बक्षीस हे पुस्तकाचे खरे मूल्यमापन असा आग्रह कुणीच धरू शकणार नाही, पण 'वनफूल' सारख्या पुस्तकाचा यथोचित गौरव पाहून मात्र पसंतीच्या माना डोलतील यात शंका नाही.

—शशिकांत मिरजकर

['वनफूल' म. म. देशपांडे मौज प्रकाशन. मूल्य ४॥ रु.]

# ज्ञान विज्ञान

## □ माणसे आक्रमक का होतात ?

माणसाची आक्रमक प्रवृत्ती आणि त्यातून उद्भवणारे गुन्हे, दंगली व युद्धे यांसंबंधी दोन उपपत्ती गेली हजारो वर्षे मांडण्यात येत आहेत. एक म्हणजे आक्रमण हा मानवी स्वभावच असून ही प्रवृत्ती नेहमीच राहील. दुसरी उपपत्ती म्हणजे मनुष्यसमाजावर पडणारे ताण. सभोवतालच्या नैसर्गिक वातावरणाशी माणसाचे संबंध यांचा परिणाम म्हणजे ही प्रवृत्ती. पहिली उपपत्ती मांडणारांच्या मते लोक एवढे खुनी प्रवृत्तीचे असतात की, त्यांना नेहमीच कडक नियंत्रणाखाली ठेवले पाहिजे किंवा या वृत्तीचा आविष्कार कमी हानिकारक मार्गाने होईल, असे वळण तिला दिले पाहिजे. त्यासाठी आजच्या व्हिएटनाम युद्धासारखी मर्यादित युद्धेसुद्धा त्यांना करू दिली पाहिजेत. दुसऱ्या उपपत्तिकारांच्या मते साथीच्या रोगांचा प्रश्न आपण काही प्रमाणात सोडविला, त्याप्रमाणे या आक्रमक प्रवृत्तीचा प्रश्नही सोडविणे शक्य आहे. ते सोपे नाही. पण सामाजिक ताणाची कारणे शोधून ती दूर करण्याचा प्रयत्न करता येईल. थोडक्यात सांगावयाचे तर निराशावादी आणि आशावादी असे हे दोन पंथ आहेत.

### माकडांची पाहणी

मनुष्येतर प्राण्यांतील, विशेषतः, माकडांमधील आक्रमक वृत्तीच्या आविष्काराचे संशोधन करून त्यातून या प्रश्नावर काही प्रकाश पडतो काय, यासंबंधी संशोधन गेल्या काही वर्षांत झाले आहे. माकडे व इतर प्राण्यांना जंगलांतील त्यांच्या नेहमीच्या नैसर्गिक वातावरणात राहायला मिळाले तर ते शांतपणे राहतात, त्यांच्यांत फारच क्वचित झटापटी होतात, असे संशोधकांना आढळून आले. युगांडामधील बुडोंगो जंगलातल्या चिपान्झी माकडांचे तीनशे तास निरीक्षण व्हर्नाम व फ्रान्सिस रेनॉल्डस् यांनी केले. या माकडांमध्ये फक्त सतरा किरकोळ झटापटी झाल्या व त्याही काही थोड्या सेकंदांपेक्षा जास्त टिकल्या नाहीत, असे त्यांना दिसून आले.

माणूस केवळ अन्नावर जगत नाही, असे आपण म्हणतो. माणसांइतकेच माकडे व इतर प्राण्यांच्या बाबतींतही ते खरे आहे माणसांप्रमाणेच मोकळेपणाने हालचाली करायला त्यांना पुरेशी जागा लागते. काही वर्षांपूर्वी जे. बी. कॅलहॉन यांनी दहा हजार चौरस फूट जागेत काही जंगली घुशींची वसाहत केली. त्यांना भरपूर

अन्न दिले. त्यांची प्रजा वाढून दोनशेपेक्षा अधिक होताच त्यांना ती जागा अपुरी पडू लागली आणि त्यांच्यांत मारामाऱ्या होऊ लागल्या. स्वतःच्याच पिलांवर हल्ले करून त्यांना ठार करण्याची वृत्ती त्यांच्यांत दिसून आली. माणसांमधील वाढत्या गुन्हेगारीचेही एक कारण वाढती लोकसंख्या व त्यामुळे झालेली गर्दी हे आहे. मुलांवरील हल्ल्यांचे प्रमाणही वाढत आहे. अमेरिकेतील ७१ हॉस्पिटलांत जखमी म्हणून दाखल झालेल्या मुलांची १९६१ साली पाहणी करण्यात आली. त्यात आई-बापांनी मारहाण केल्याने गंभीर जखमा झालेली ३०२ मुले होती. त्यांपैकी ३३ मरण पावली व ८५ जणांच्या मेंदूस कायमची इजा झाली. इंग्लंडमध्ये १९५५ ते १९६४ या काळात ७६४ लोकांना खुनाबद्दल शिक्षा झाल्या. त्यांपैकी ९३ जणांवर आपल्याच एक किंवा अधिक मुलांना ठार केल्याचा आरोप होता.

## सामाजिक ताणांचा परिणाम

अमेरिकन हॉस्पिटलांत दाखल केलेल्या जखमी मुलांच्या आईबापांची पाहणी केली तेव्हा गंभीर स्वरूपाच्या सामाजिक किंवा आर्थिक ताणामुळे त्यांच्या हातून मुलांवर हल्ले घडले हे एक कारण असल्याचे दिसून आले. दुसरे कारण म्हणजे लहानपणी त्यांना त्यांच्या आईबापांनी मारहाण केली होती व तशीच मारहाण ते आपल्या मुलांना करीत होते. माकडांच्या बाबतीतही असेच दिसून आले. सी. आर. कार्पेंटर यांनी १९३८ साली काही माकडे भारतातून जहाजाने सँटिआगो बेटावर नेली. पण त्यांचा प्रवास एवढ्या वाईट परिस्थितीत झाला, की तो ताण असह्य होऊन अनेक माकडिणींनी आपल्या पिलांना ठार केले. हा ताण एवढा दीर्घकाळ टिकला की पुढे प्रवास संपल्यावर या माकडांना त्यांच्या नव्या घरी चांगल्या प्रशस्त जागेत राहायला मिळाले तरी त्यांच्यांत मारामाऱ्या व झटापटी चालूच राहिल्या; एवढेच नव्हे तर त्यांच्या पिलांमध्ये हे लोण उतरले.

माकडांची पाहणी केलेल्या संशोधकांना असे आढळून आले की त्यांचा नेता घटनात्मक अध्यक्षासारखा असतो. काही अनुभवी माकडांच्या संमतीने तो आपल्या कळपाची व्यवस्था पाहतो. वैयक्तिक झटापटीत हा नेता सर्वांत प्रभावी असतो असे नव्हे, पण आपल्या कळपासाठी अन्न मिळविण्याच्या जागा व मार्ग शोधणे, हल्ला करणारांपासून रक्षण करणे ही त्याची कामे असतात. आपल्या कळपात मोठ्या झटापटी जुंपल्या तर मध्ये पडून त्या तो थांबवितो. त्याचे विश्वासू सहकारी त्याला पाठिंबा देतात व सर्व मिळून आक्रमक माकडांवर तुटून पडतात. मादीवर कोणी हल्ला करू नये यावर त्यांचे विशेष लक्ष असते. दोन कळपांत लढाई जुंपली व विरोधी कळप मोठा असल्याचे दिसले तर माघार घेण्याचा आदेश तो देतो.

गर्दी, विषमता, ताण, अडथळे यांतून माणसामाणसांत झगडे होतात. ही कारणे दूर करता आली तर आक्रमक प्रवृत्तीला बराच आळा बसेल, असे संशोधकांना वाटते.

## □ आवाजांचे ठसे

### गुन्ह्याच्या शोधात नवी क्रांती

न्यूयॉर्कच्या एका उपनगरातील कोर्टापुढे खोट्या साक्षीबद्दलचा एक खटला चालू होता. एका पदार्थविज्ञान शास्त्रज्ञास साक्षीसाठी बोलावले होते. कोर्टाच्या खोलीत एक पडदा उभारण्यात आला. दिवे घालविण्यात आले. पडद्यावर हवामानाच्या नकाशासारख्या काही आकृती दिसू लागल्या. या आकृती म्हणजे आवाजाचे ठसे (व्हॉइस प्रिंटस्) आहेत आणि बोटाच्या ठशांइतकेच ते अचूक आहेत असे शास्त्रज्ञ लॉरेन्स कर्स्टा यांनी सांगितले. कर्स्टा गेली ३९ वर्षे बेल टेलिफोन प्रयोगशाळेत संशोधन करीत आहेत. आवाजाच्या ठशांची ही चित्रे पुरावा म्हणून कितपत ग्राह्य मानता येतील यावर कोर्टात अनेक तास चर्चा झाली. बचावाच्या वकिलांनी तो पुरावा म्हणून मान्य करण्यास हरकत घेतली. पण अखेर न्या. रॉबर्ट डेम्पसे यांनी कोर्टात ती चित्रे दाखविण्यास शास्त्रज्ञ कर्स्टा यांना परवानगी दिली.

खोटी साक्ष दिल्याबद्दल एका पोलिसावर हा खटला चालू होता. पोलीस छापा घालणार आहेत अशी सूचना जुगार खेळणाऱ्या एका इसमास या पोलिसाने अगोदरच दिली असता नंतर ते नाकारले व खोटेपणा केला असा त्याच्यावर आरोप होता. जुगाऱ्याला टेलिफोनवर इशारा देणाऱ्या माणसाच्या आवाजाची टेप कोर्टात पुरावा म्हणून दाखल झाली होती. आरोपी पोलिसाच्या आवाजाच्या दोन टेप्सही कोर्टात ऐकविण्यात आल्या. जुगाऱ्याला टेलिफोनवर इशारा देणारा आवाज आरोपी पोलिसाचाच आहे असे फिर्यादी पक्षाचे म्हणणे होते. ते सिद्ध करण्यासाठी कर्स्टा यांना कोर्टापुढे बोलावले होते.

आवाजाचा ठसा कोर्टात यापूर्वी कोणीच पाहिलेला नव्हता. तिन्ही टेप्सच्या आवाजाचे ठसे घेऊन तो एकाच माणसाचा आवाज आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न कर्स्टा करणार होते. कर्स्टा यांना तज्ज्ञ साक्षीदार मानावयाचे का यावर दोन्ही बाजूंचे म्हणणे कोर्टाने ऐकले व अखेर हे ज्यूरींनी ठरवायचे आहे असा निर्णय दिला.

'यू' हा एकच शब्द उच्चारणाऱ्या निरनिराळ्या माणसांच्या आवाजाच्या ठशाच्या सहा स्लाइडस् पुरावा म्हणून कोर्टापुढे दाखल करण्यात आल्या होत्या. प्रत्येक स्लाइडमधील आकृती एकमेकांपासून निराळी ओळखण्याइतकी भिन्न होती. यापैकी आकृतींतील आवाज एकाच माणसाचे आहेत, असे कर्स्टा यांनी सांगितले.

चार वर्षांच्या संशोधनानंतर आवाज ठसे तयार करण्यात कर्स्टा यांनी यश मिळविले. फेडरल एव्हिएशन एजन्सी, अमेरिकन हवाईदल वगैरे संस्थांसाठी त्यांनी आवाज ठसे तयार करून त्यांचे वर्गीकरण केलेले आहे. कर्स्टा व त्यांच्या सहकाऱ्यांनी पन्नास हजार आवाज ठसे घेतलेले असून त्यांपैकी ९७ टक्के लोकांचा आवाज बरोबर ओळखला. एखाद्याने आवाज मुद्दाम निराळा काढून बनविण्याचा

प्रयत्न केला तरी त्याच्या आवाज ठशाचे स्वरूपात त्यामुळे फरक पडणार नाही व हा आवाज कोणाचा हे बरोबर ओळखता येईल असे कर्स्टी यांचे म्हणणे आहे.

बोटाच्या ठशांप्रमाणेच आवाजाचे ठसे ही गुन्ह्याच्या शोधात एक नवी क्रांती ठरणार आहे.

## □ कॉलेज काढणारा पोस्टमन

पन्नास वर्षांपूर्वीचा प्रसंग. उत्तर प्रदेशातील एका खेड्यातला पंधरा वर्षांचा एक मुलगा कलकत्त्यात नोकरीच्या शोधासाठी आला. पण शिक्षण नसल्याने त्याला कोठेही नोकरी मिळाली नाही. त्याची निराशा झाली, ही गोष्ट त्याच्या मनाला फार लागली. पुढे तो लष्करात भरती झाला. पहिले महायुद्ध संपताच लष्करातून बरेच सैनिक मुक्त करण्यात आले, त्यांच्याबरोबर या तरुणालाही मुक्त केले गेले. पुन: नोकरीचा शोध सुरू झाला. अखेर १९२६ साली घाटकोपरच्या पोस्टात त्याला पोस्टमनची नोकरी मिळाली.

पण केवळ कार्डे-पाकिटांवर शिक्के मारण्यात आणि टपालाचा बटवडा करण्यात या तरुणाला सारे आयुष्य घालवायचे नव्हते. नोकरी सांभाळून शिक्षणप्रचाराचे कार्य हाती घेण्याचे विचार त्याच्या डोक्यात घोळत होते. १९३० साली घाटकोपरलाच देसाईवाडीची एक प्राथमिक शाळा या तरुणाने चालवायला घेतली. सुरुवातीला फक्त ११ मुले, राखीव निधी फक्त ११ रु. आणि शिक्षकाचा पगार १२ रु. अशी या शाळेची स्थिती होती. पण पुढे वाढत वाढत हिंदी माध्यमाच्या हायस्कुलात तिचे 'रूपांतर' झाले.

या तरुणाचे नाव नंदकिशोर सिंग ऊर्फ जयरामजी. पोस्टमनच्या नोकरीतून १९४६ मध्ये निवृत्त झाल्यावर शिक्षणकार्यात जयरामजी अधिक लक्ष घालू लागले. १९६३ साली घाटकोपरला त्यांनी एक कॉलेज काढले. या कॉलेजमध्ये आता हजार विद्यार्थी आहेत. यानंतर आपल्या मूळ गावी–उत्तर प्रदेशातील रायपूर मांझा–येथे १९६४ साली त्यांनी एक माध्यमिक शाळा सुरू केली. पन्नास वर्षांपूर्वी ज्या कलकत्त्यातून नोकरी न मिळाल्याने निराश होऊन त्यांना परतावे लागले होते त्याच कलकत्त्यास काही दिवसांपूर्वी त्यांनी भेट दिली. या वेळी नोकरीची भीक मागण्यासाठी ते आले नव्हते. पश्चिम बंगालमध्ये एक शाळा व कॉलेज काढण्याचा त्यांचा विचार असून त्यासाठी मदत मिळवण्याकरता ते आले होते. साठी उलटल्यानंतरही त्यांचा कार्याचा उत्साह दांडगा आहे. "देवाने आणखी काही वर्षे दिली तर भारताच्या प्रत्येक राज्यात शिक्षण संस्था काढण्याचा माझा विचार आहे," असे उद्गार आपल्या कार्याबद्दल बोलताना त्यांनी काढले.

● ● ●

# भिंतीच्या तुंबड्या

## सुधाकर राजे

### • दाखवायच्या दातांचा कारखाना

खायचे दात एक अन् दाखवायचे वेगळे, हे माणसांच्या दुटप्पीपणाचे लक्षण समजले जाते.– पण का ? बाहेर जाताना आपण चांगले कपडे घालतो. मग तेवढ्या-पुरते चांगले दात लावायला काय हरकत आहे ? नकली हसूसाठी नकली दात वापरणेच योग्य नाही का ? चारचौघांत वावरताना आपला बराचसा वेळ हस्ती-दंती करण्यात जातो, मग त्यासाठी अस्सल हस्तीदंतच नाही तरी कल्चर्ड मोत्यांच्या चालीवर कल्चर्ड दात वापरायला काय हरकत आहे ? मूळ मुद्दा असा की, प्रत्येकाचे हसू त्याला शोभणारे पाहिजे. म्हणून ' कसे हसावे ' या विषयावर गंभीर विचार करून एका ब्रिटिश कंपनीने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर कुठल्या प्रकारचे हसू शोभेल हे पाहून त्याप्रमाणे नकली दात करण्याचा उपक्रम आरंभला आहे.

खरे म्हणजे इतका स्तुत्य उपक्रम यापूर्वीच व्हायला हवा होता. जगप्रसिद्ध मोनालिसापासून भारतप्रसिद्ध कामराजपर्यंत काही व्यक्तींच्या स्मितांनी इतिहास घडवला आहे हे पाहिले म्हणजे इतिहासाला वळण लावणाऱ्या स्मिताला वळण लावण्यासाठी दातही तसेच हवेत याची खात्री पटते. शिवाय माणसा-माणसांच्या हसण्यात फरक असतो; एवढेच नव्हे तर एकाच माणसाला निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या प्रकारचे हसू वापरावे लागते. तेव्हा सदरहू कंपनीने केवळ माणसानुरूपच नव्हे तर प्रसंगानुरूप दात करायलाही हरकत नाही.

आपल्याकडल्या एखाद्या राजकीय पुढाऱ्याचेच उदाहरण घ्या. स्वागत-समारंभात स्वतःच्या हातांनी हार घालून घेतानाचे शालीन स्मित, वनमहोत्सवात आपले पांढरे शुभ्र कपडे मातीच्या ढेकळाने खराब होणार नाहीत अशा बेताने कोरे करकरीत फावडे हातात पेलीत फोटो काढून घेतानाचे ' भारत-सेवक ' छाप हास्य, निवडणुकीचे तिकिट मिळविण्यासाठी पक्षातल्या श्रेष्ठींच्या समोर चेहऱ्यावर आणायचे लाचार हसू, तिकिट मिळाल्यावर फुटणारे रुंद हास्य, आणि अखेर आपटी खाल्ल्यावर विजयी प्रतिस्पर्ध्याचे अभिनंदन करताना चेहऱ्यावर आणावे लागणारे उसने हसू– किती म्हणून परी सांगाव्यात ? आता या सगळ्याच हसण्याला एकाच प्रकारचे दात वापरले तर हसेच नाही का व्हायचे ?

अगदी घरातल्या घरात म्हटले तरी हसण्याची केवढी व्हरायटी दिसते. आमच्या हिचेच बघा. एखादे दिवशी ऑफिसच्या घाईत, अस्मादिकांनी नाकावर असलेला

चष्मा धुंडाळण्यासाठी आरडाओरडा केली तेव्हा 'अगदीच कसे हो बावळट तुम्ही!' या अर्थाचे हसू. उलट पहिल्या तारखेला मी ऑफिसातून घरी आलो म्हणजे हिच्या चेहऱ्यावर गुलाबाच्या कळीप्रमाणे उमलणारे गोड स्मित, शेजारच्या प्रमिलाबाईंनी हिच्या नाकावर टिच्चून महाग साडी घेतली पण ती एकाच वॉशमध्ये विटली तेव्हा हिच्या चेहऱ्यावर झळकलेले 'कशी जिरली ऽऽ!' छाप हास्य, अन् पलीकडच्या लीलाबाई वर्णाने (हिच्या मानाने) जरा डाव्या आहेत त्यांना 'तुम्हांला बाई_लाइट कलर्स खुलतात' असे म्हणतानाचे छद्मी हास्य– या सगळ्या वेळी एकच दात वापरायचा प्रयत्न हास्यास्पदच म्हटला पाहिजे. मॅचिंगच्या आजच्या जमान्यात साड्यांना मॅच होणारे चपलांचे पट्टे लागतात. लिप्स्टिकला मॅच होणारे कुंकू लागते, मग हसण्याला मॅच होणारे दात का नकोत?

## • कबुतरांसाठी लूप!

बर्लिनमध्ये कबुतरांची संख्या फार वाढल्याने तेथल्या नगरपालिकेने ठरविले आहे की संततिप्रतिबंधक गोळ्यांच्या मदतीने ही संख्या आटोक्यात आणायची. भले! कल्पना छान असली तरी त्या कबुतरांचा संततिनियमनावर विश्वास नसला तर? आणि ज्या सुधारलेल्या कबुतरांचा असेल त्यांच्या मते गोळ्यांपेक्षा लूप अधिक चांगला असला तर? मागासलेल्या हिंदुस्थानी माणसांसाठी लूप मिळतो तर पुढारलेल्या जर्मन कबुतरांसाठी का नको?

अडचण एवढीच की कबूतर समाजातील पुरुष–वर्गाने 'भार्या लूपवती शत्रू' असे वाटून लूपविरोधी आंदोलन आरंभले तर? यावर उपाय म्हणजे भारत सरकारने येथल्या माणसांसाठी आखलेली 'बच्चा बंद' चळवळ तेथल्या कबुतरांपर्यंत पोचवली पाहिजे,–आणि आपल्याला तरी हे कठीण जायची भीती नाही. 'भारत बंद' पासून (सोमवारी) 'जेवण बंद' पर्यंत सर्व प्रकारच्या (बे) बंदशाहीला सरावलेल्या आपल्या मंडळींना यःकश्चित् कबुतरांची पिले बंद करायला कितीसा उशीर?

## • पेन्शनर कुत्रा

एक अमेरिकन विमा कंपनी कुत्रे, मांजरी वगैरे पाळीव जनावरांचा विमा उतरणार आहे. म्हणजे आता पेन्शनीत निघालेल्या समर्थघरच्या श्वानाला आणि उंदीर कमवायची शक्ती नष्ट झालेल्या बोक्याला आता आपले कसे व्हायचे असा प्रश्न पडायला नको. पण विमा म्हटला की हप्ता आलाच. तेव्हा मनीचा विमा असेल तर किती उंदरांच्या शेपट्यांचा हप्ता अन् मोत्याचा विमा असेल तर किती चघळलेल्या हाडकांचा हप्ता हे कसं ठरवायचं? –

•

# श्री. मो. स. साठेकृत 'भुजंग'

## पुण्यातील पहिला प्रयोग

पुण्यातील 'कला सहायक' या हौशी नाटय-कलावंतांच्या संस्थेने २५ मे रोजी रात्री रमणबाग नाटय मंदिरात श्री. मो. स. साठे यांनी लिहिलेल्या "भुजंग" नाटकाचा पुण्यातील पहिला प्रयोग सादर केला. नाटच प्रयोगाची सुरुवात नांदीपासून फारच उत्कृष्ट झाली. पडदा वर गेल्यावर रंगमचावरील जहागीरदारांचा वाडा फारच आकर्षक व कल्पकतेने मांडला होता. 'डीमर' सारख्या नव्या तंत्राचा अवलंब करून प्रयोगाची सुरुवात एखाद्या नामवंत कंपनीस लाजवील अशी झाली. सुरुवातीसच उमा ( सौ. प्रभा कंदीकर ) व अलका ( कु. शशिकला गांगल ) या दोघी रंगमंचावर होत्या. दोन्ही पात्रांची निवड अत्यंत उत्कृष्ट होती. दोघींची रंगमंचावरील हालचाल, बोलण्याची पद्धत व अभिनय खरोखर खानदानी वाटला. व हा प्रयोग रंगणार अशी खात्री वाटू लागली. पण जसजशी या पात्रांच्या तोंडची भाषणे ऐकू लागलो, तसतसे या नाटकातील संवाद अत्यंत कंटाळवाणे असल्याचे लक्षात येऊ लागले. आणि रंगमंचावरील या कलावंतांचे श्रम वाया जातात की काय, असे वाटू लागले. नंतर धनंजय ( श्री. दत्ता ऐगळीकर ) यांनी रंगमंचावर प्रवेश करून प्रेक्षकांना जरासा दिलासा द्यावयाचा प्रयत्न केला. पण संवादातील बोजड वाक्यांमुळे तेही त्यांना कठीण होऊ लागले. महिपती ( श्री. पल्लोड ) यांनी पहिल्या अंकात काम ठीक केले पण त्यांच्या दुर्दैवाने त्यांना भूमिकाच अशी करावी लागली की, ती प्रेक्षकांना अवाहन न करणारी ठरली व लेखकाचा एक हेतू फसला. नाटकातील एका महत्त्वाच्या पात्राची मांडणी कशी चुकली हे बहुधा लेखकाच्या ध्यानात आले असावे. प्रेक्षकांना आपली भूमिकाच पसंत पडत नाही याचा काम करणाऱ्यांच्या मनावर फार परिणाम झालेला आढळला व तिसऱ्या अंकात तो प्रेक्षकांनाही जाणवला.

भुजंगनाथाची भूमिका करणारे श्री. अभ्यंकर यांनी खरोखर भुजंगनाथ अप्रतिम उभा केला. विशेषत:, शेवटची काही वाक्ये ते इतकी उत्कृष्ट बोलले की तेवढ्या जोरावर त्यांनी संपूर्ण नाटकाचा परिणाम प्रेक्षकांवर घडवला. अभ्यंकरांची बोलण्याची पद्धत, त्यांचा अभिनय, हालचाल ही कसलेल्या नटाला लाजवील अशी होती. नाटकाचे दिग्दर्शनही त्यांनी उत्कृष्ट व दर्जेदार केले होते. पण त्यांनी हेच

नाटक प्रयोगासाठी का निवडले, याचे जर त्यांनी समाधानकारक उत्तर दिले तर त्यांच्याकडे आशेने पाहणाऱ्या प्रेक्षकांवर उपकार होतील !

दिगंबर ( श्री. अनंत देशपांडे ) अत्यंत तडफदार वाटला. वाक्य बोलण्याचा वेग थोडा कमी केल्यास मराठी रंगभूमीवरील एका नायकाची उणीव ते नक्की भरून काढतील. त्यांना भूमिकेची समज फारच छान आहे. विशेषत: आईशी बोलताना व बहिणीशी बोलताना त्यांनी जो फरक दाखवला त्यातच त्यांचे यश आहे.

यानंतर अब्दुल्ला ( श्री. आगाशे ) यांनी दुसऱ्या अंकात अत्यंत प्रभावी काम करून पहिल्या अंकात लेखकाने या भूमिकेस कसे निष्कारण टांगते ठेवून अन्याय केला आहे हे पटवून दिले. गफूरचे काम श्री. पाटणकर यांनी समजून केले. दुसऱ्या अंकात स्वतःच्या मुलास ठार मारल्यानंतरचे भाषण त्यांनी असे प्रभावी-रीत्या म्हटले की, त्यांनी सबंध नाट्य मंदिर हेलावून गेले. त्यांच्या आवाजात एक वेगळाच " दर्द " आहे.

शेवटी परत एकदा उल्लेख करावासा वाटतो, तो कु. शशिकला गांगल व सौ. प्रभा करंदीकर यांचा. कु. शशिकलाने अलका अपेक्षेपेक्षा उत्कृष्ट सादर केली. आणखी एकदोन वेळा तिने नाट्य प्रयोगांतून कामे केल्यास ती एक उत्कृष्ट दर्जाची अभिनेत्री आहे, हे सर्वांस मान्य करावे लागेल. सौ. करंदीकरांनी उमाचे काम छान केले. पण लेखकाने त्यांना पाच-पाच सहा-सहा पाने नुसते न बोलता उभे केले आहे आणि नंतर उमास पात्र पानांनंतर भाषण काय तर "असं काय करायचं ते ? " आता एवढेच वाक्य देऊन एखाद्या पात्रास रंगमंचावर तिष्ठत ठेवून लेखकाने काय साधले हे ध्यानी येत नाही !

– प्रा. विनायक कुलकर्णी


# शस्त्रक्रियेची जरूरी नाही

**नाकातील हाड, मांस, वाढल्यास**

**श्वासोच्छ्वासास अडचण, सर्दी, दुर्गंधी, खपली,**

**डोकेदुखी, दम्यासारखा खोकला असल्यास**

**पोस्टेजसह लिहा.**

## आरोग्य मंदिर

**सिटी हायस्कूल रोड, सांगली (महाराष्ट्र).**

# बॉडी लाईन

## □ एक जन्मगाथा □

सन १९३१-३२ च्या अखेरीपर्यन्त इंग्लिश क्रिकेट संघाचा ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाण्याचा बेत नव्हता. परंतु योगायोगाने याच वर्षी साऊथ आफ्रिकेचे ऑस्ट्रेलियामध्ये आगमन झाले. आणि पुन्हा क्रिकेट प्रेमिकांच्या विश्वात नव्या उत्साहाचे वारे जोराने वाहू लागले. साऊथ आफ्रिकेबरोबर झालेल्या ह्या कसोटी सामन्यांच्या मालिकेचे खास वैशिष्टच म्हणजे हे सारे सामने ऑस्ट्रेलियाने साऊथ आफ्रिकेचा दणदणीत पराभव करून जिंकले. पाच कसोटी सामन्यांपैकी तीन सामने त्यांनी एक डाव राखून जिंकले तर बाकीचे १६९ धावांचा प्रचंड डोंगर उभारून व दहा गडी शिलकीत ठेवून जिंकले. इंग्लंडप्रमाणे साऊथ आफ्रिकाही त्या वेळी ब्रॅडमनच्या बॅटमधून वाढणारा धावांचा द्रुतगती धवधबा रोखू शकली नाही. त्या वर्षी खेळल्या गेलेल्या कसोटी व इतर सर्व सामन्यांमधून त्याने न्यू साऊथ वेलसमधून पहिल्या कसोटी सामन्यात एकूण ३० व १३५ धावा काढल्या. दुसऱ्या कसोटी सामन्यात २२६ धावांचा डोंगर उभारला. तिसऱ्या कसोटी सामन्यामध्ये एकूण अनुक्रमे २१९ व ११२ धावा, तर चौथ्या कसोटी सामन्यात २ व १६७ धावा आणि २२९ धावांचा भव्य डोंगर त्याने अखेरच्या म्हणजे पाचव्या सामन्यात उभारला. आणि जगाला आपल्या फलंदाजीचा जिवंतपणा-ताजेपणा-फिरून सिद्ध करून दिला. ब्रॅडमनच्या ह्या रोमहर्षक फलंदाजीने साऊथ आफ्रिकेची न भूतो न भविष्यति अशी अवस्था झाली.

ब्रॅडमनच्या ह्या राक्षसी फलंदाजीस आळा घालण्यासाठी पाचव्या कसोटी सामन्यामध्ये त्याच्यावर बंपर्सचा मारा करण्यात आला. परंतु त्याच्या हाताची करंगळी दुखविण्यापलीकडे ते अस्त्र निष्प्रभ ठरले. बंपर्सचा सारखा मारा होत असतानाही ब्रॅडमन खेळपट्टीवर घोरपडी-

: लेखक :

## दा. ना. शेणई

सारखा चिकटून राहिला. त्याच्या फलंदाजीच्या वैशिष्टयाबद्दल इंग्लंड-मध्ये रसिक व जाणकार क्रिकेटप्रेमी लोकांत खास चर्चा झाली.

आणि ह्या चर्चेची फलश्रुती म्हणून की काय 'शरीरवेधी' ( Bodyline ) गोलंदाजीचा उदय सन १९३२–३३ मध्ये एम्. सी. सी. च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यातच झाला. वास्तविक, स्थूल दृष्टीने पाहता 'शरीरवेधी' गोलंदाजी म्हणजे Leg-Theory चा काल्पनिक विस्तार असा होतो. सन १९२० मध्ये 'सी. एफ्. रूट' ह्या गोलंदाजाने आपल्या मध्यमगती गोलंदाजीचा उपयोग करून लेग थिअरीस जन्म दिला. परंतु हा गोलंदाज एच्. लारवूड किंवा डब्ल्यू वॉक ह्यांच्याइतका वेगवान नव्हता. त्यामुळे त्याची लेग थिअरी बाद ठरली. लारवूड हा अती वेगवान गोलंदाज तर होताच होता; पण त्याचबरोबर त्याला खेळपट्टीचे पूर्ण आकलन होत असे. त्याच्या ह्या खास वैशिष्टयामुळे तो फलंदाजांवर पूर्ण ताबा मिळवू शके.

जाणकारांच्या मतप्रणालीप्रमाणे शरीरवेधी गोलंदाजीचा उदय हा, ज्याला आपण क्रिकेटमध्ये tactics म्हणतो. त्यासाठी झालेला नसून ब्रॅडमनच्या राक्षसी फलंदाजीस आळा घालण्यासाठी त्या वेळी प्रामुख्याने झालेला आहे. प्रत्येक धाव ब्रॅडमनला पृथ्वीमोलाची वाटे. धावांसाठी तो नेहमी भुकेलेलाच असे. धावांसाठी तो कोणत्याच गोलंदाजाची गय करीत नसे. चांगला ठोकून काढी एकेकांना ! सामने जिंकावयाचे म्हणजे त्याच्या सणसणत्या फलंदाजीस जरब बसविणे हे इंग्लंडच्या शरीरवेधी प्रकारच्या गोलंदाजीचे खास वैशिष्टच ! म्हणजे असे– गोलंदाजीचा मारा सतत लेग स्टंपवर ठेवायचा. अशा वेळी क्षेत्ररक्षकांचे जाळे फलंदाजाच्या लेग-कडे आत व बाहेर उभे करावयाचे. फलंदाजापुढे अशा परिस्थितीत

दोन-तीनच पर्याय असतात. पहिला म्हणजे– चेंडू यष्टीवर सरळ जाऊ देणे आणि तंबूत परतणे. दुसरा– तशा प्रकारचा चेंडू खेळणे व झेलबाद होण्याचे साहस करणे. तिसरा असा– अशा चेंडूवर एल. बी. डब्ल्यू. न होण्याची दक्षता घेणे. पण खेळाडू पूर्ण निपुण असेल तर तो अशा कसोटीस तोंड देऊ शकतो.

१९३२–३३ मध्ये खेळल्या गेलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात तर शरीरवेधी गोलंदाजीने फारच कहर केला. ऑस्ट्रेलियाचे डब्ल्यू. एम्. वुडकूल व डब्ल्यू. ए. ओल्डफिल्ड हे फलंदाज अनुक्रमे छातीवर व चेहऱ्यावर चेंडू बसल्यामुळे जबर जखमी झाले. 'ॲडलेड' ह्या ठिकाणी खेळल्या गेलेल्या ह्या तिसऱ्या कसोटी सामन्यात या गोलंदाजीचा एवढा कळस झाला की ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट मंडळाने सरतेशेवटी एम्. सी. सी. ला तारेने कडक शब्दांत कळविले — 'अशा प्रकारची गोलंदाजी ताबडतोब बंद करा, अथवा आपल्या संघास माघारी बोलवा!' त्यांच्या मते अशा प्रकारची चेंडूफेकी क्रिकेटसारख्या खेळास पूर्णतः घातक तर होतीच, शिवाय त्या दोन देशांचे परस्परांमधील मित्रत्वाचे संबंध बिघडविणारी होती. त्यानंतर दोन्ही देशांच्या क्रिकेट मंडळांमध्ये झालेल्या चर्चेत या उद्दाम चेंडूफेकीवर अखेरचा निर्णय घेण्यात आला. तो असा– फलंदाजावर शरीरवेधी गोलंदाजीचा जाणूनबुजून मारा करण्यात आला तर तो नियमबाह्य समजला जाईल. त्याचबरोबर पंचांना अधिकार देऊन अशा प्रकारच्या गोलंदाजीची पुनरावृत्ती होणार नाही ह्याविषयी त्यांना दक्षता घेण्यास सांगण्यात आले.

इंग्लंडने त्या वर्षीचे पहिला, तिसरा-चौथा व पाचवा असे सामने जिंकले; हे जरी खरे असले तरी ते शरीरवेधी चेंडूफेकीच्या अमानुष सामर्थ्यावर जिंकले हे विसरून चालणार नाही. त्यांचा तो विजय चंद्राच्या डागाप्रमाणे आहे.

पण ब्रॅडमनने चारही कसोटी सामन्यांत एकूण तीनशेशहाण्णव (सरासरी ५६·५७) धावा काढून आपले कर्तव्य अखेर बजावलेच!

●

# हंगेरियन चित्रपट

- पुरुषोत्तम बावकर.

परदेशी चित्रपट पाहत असताना, माझ्या मनात नेहमी मराठी चित्रपटांचे विषय घोळत असतात. आणि मग विषय– निवडीचे कल्पनादारिद्रय व तरुण रक्ताचा अभाव हे मराठी चित्रपटांच्या अवोगतीचे एक महत्त्वाचे कारण आहे याची मनोमन खात्री पटते. थोड्याच दिवसांपूर्वी मला काही हंगेरियन चित्रपट पाहायला मिळाले. आणि पुन्हा एकदा मराठी चित्रपटांविषयीचे वरील विधान किती सत्य आहे याची खात्री पटली.

हंगेरी हा देश क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्राएवढाच, किंबहुना लहानच असेल आणि त्याची लोकसंख्यासुद्धा महाराष्ट्राइतकीच म्हणजे, जवळ जवळ चार कोटी आहे. येथे चित्रपट निर्मितीला, खऱ्या अर्थाने सुरुवात दुसऱ्या महायुद्धानंतर झाली. इसवी सन एकोणीसशे पंचावन्न–छप्पन्न साली हंगेरीतील अंतर्गत राजकीय गडबडीमुळे चित्रपटव्यवसायाला एकदम नरमाई आली. पण पुन्हा स्थिरस्थावर झाल्यावर चित्रपट व्यवसायाने चांगलेच बाळसे धरले. गेल्या वीस वर्षांत, हंगेरियन चित्रपटांनी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतून आपल्या देशासाठी एकशेचार बक्षिसे खेचून आणली गेल्या पाचसहा वर्षांत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या निकालांकडे जरा दृष्टी फेकली तर प्रत्येक ठिकाणी हंगेरियन चित्रपटाला विजय-चिन्ह मिळाल्याचे नजरेस पडते. ही विजय-चिन्हे मिळवण्यात तरुण कलाकारांप्रमाणे काही जुने कलाकारही आहेत हे विशेष.

गेल्याच वर्षी चौथ्या मॉस्को चित्रपट महोत्सवात ' ट्वेंटी अवर्स ' ( वीस तास ) या चित्रपटाला ' ग्रॅन्ड प्रिक्स ' हे विजय-चिन्ह देण्यात आले. याच बोलपटाला त्याच वर्षी व्हेनीस आणि रोम या ठिकाणच्या चित्रपट महोत्सवात पुन्हा तीन विजय-चिन्हे मिळाली. या चित्रपटाचा दिग्दर्शक झोल्टान फाब्री याला हंगेरीच्या सत्यजीत रे म्हणायला काहीच हरकत नाही. सत्यजीतच्या चित्रपटांना जशी अनेक बक्षिसे

आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मिळाली आहेत तशीच, झोल्टान फाब्रीच्या चित्रपटांना मिळाली आहेत. गेल्या चौदा वर्षांत झोल्टान फाब्रीचे एकूण दहा चित्रपट प्रकाशित झाले. त्याचे सारे चित्रपट वास्तव कथानकावर आधारलेले असतात. ही सारी कथानके प्रसिद्ध पुस्तकावरूनच घेतलेली असतात. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याचा एकही चित्रपट प्रेम कथानकावर आधारलेला नाही.

झोल्टान फाब्रीच्याच जमान्यातले आणखी दिग्दर्शक म्हणजे फेलिक्स मॅरिअसी इम्रे फाहेर, कॅरोला माक. या साऱ्यांचे कोणते ना कोणते चित्रपटही परदेशी महोत्सवांत गाजले. जॉर्जी रेन्हेस्न हा विनोदी चित्रपटांचा दिग्दर्शक याच जमान्यातला. याच्याही चित्रपटांनी पारितोषिके मिळवली.

वरील मध्यमवयीन दिग्दर्शकाबरोबरच, नुकतेच चित्रपट महाविद्यालयातून डिप्लोमा घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या पहिल्या चित्रपटांनी जागतिक कीर्ती मिळवली. इस्तव्हान गॉलचा पहिलाच बोलपट ' करंट ' (प्रवाह) हा चित्रपट वादग्रस्त ठरला. चौसष्ट साली कार्लोव्ही व्हॅली महोत्सवात या चित्रपटाला ' ग्रॅन्ड प्रिक्स ' मिळाले. पुढील वर्षी एडिंबरो आणि पेसारो येथील चित्रपट महोत्सवांतही या चित्रपटाने प्रथम क्रमांकाचे मानचिन्ह पटकावले.

इस्तवान झाबो हा दुसरा तरुण दिग्दर्शक. विद्यापीठात शिक्षण घेत असतानाच त्याने बनवलेले ' यू ' आणि ' कन्सर्ट ' ह्या दोन लघुचित्रपटांना परदेशी अनेक बक्षिसे मिळाली. त्याचा पहिलाच मोठा बोलपट ' दी एज ऑफ डे ड्रिमिंग. ' यालाही लोकार्नो येथील महोत्सवात विजय-चिन्ह मिळाले. सान्दोर सार, इस्तव्हान कार्दोस, आणि जानोस रोझा हे आणखी तीन तरुण दिग्दर्शक.

पासष्ट साली कान चित्रपट महोत्सवात ' ओव्हर्चर ' या लघुपटाला ' गोल्डन पाम ' हे पहिल्या दर्जाचे मानचिन्ह देण्यात आले. एकसष्ट वर्षे वयाचा, डोक्यावरचे सारे केस पिकलेला ' जानोस नादास्ज ' हा त्या लघुपटाचा दिग्दर्शक आणि त्याचा तो पहिलाच प्रयत्न. तो व्यवसायाने डॉक्टर आहे. काही वैज्ञानिक अनुबोधपटाचा सल्लागार म्हणून काम करत असताना, आपणही चित्रपट बनवावा, असे वाटून त्याने पहिला प्रयत्न केला आणि तो यशस्वी झाला.

हंगेरीत वर्षाला वीस चित्रपट तयार होतात. हंगेरियन भाषा जगात इतरत्र कोठेही बोलली जात नाही. हंगेरीतील चार कोटी लोकच हे चित्रपट पाहतात. तेथील चित्रपट व्यवसाय सरकारच्या ताब्यात आहे. आणि असे असूनही, हंगेरियन चित्रपटांनी क्रांती घडवली आहे.

मराठी चित्रपट निर्मितीवर सरकारी बंधनें नाहीत. सरकारकडून मदतीचा हात पुढे केला जातो. मराठी साहित्यात उत्तम चित्रपट निर्मितीचे गुण असलेल्या कथा-कादंबऱ्यांना तोटा नाही. आपल्याकडील तंत्रज्ञही मुरब्बी आहेत. पण वाण आहे ती नव्या उमेदीच्या, कल्पक दिग्दर्शकांची आणि निर्मात्यांची.



## □ मार्गित बारा

हंगेरीतली गोष्ट आहे. कलाकारांच्या एका मेजवानीच्या प्रसंगी, एक उंच काळचा-शार डोळयांची शांत पण सस्मित चेहऱ्याची एक देखणी स्त्री हजर होती. साऱ्यांचे डोळे तिच्याकडे वेघले होते. आणि प्रत्येकजण तिचे नाव समजायला उत्सुक होता.

काही दिवसांनंतर 'लॅझसो राकोडी' या दिग्दर्शकाचा डिस्कॉर्ड (Discord) हा चित्रपट प्रकाशित झाला. त्या चित्रपटात नायिकेच्या भूमिकेत तोच चेहरा पुन्हा दिसला. त्या स्त्रीच नाव होत 'मार्गित बारा'.

मार्गित बारा ही हंगेरीची पहिल्या दर्जाची नटी आहे. ट्रान्साल्व्हानियातून ती हंगेरीला आली, आणि तेथील नाटय विद्यापीठात तिने नाटयशास्त्राचा अभ्यास केला. तिच्या लहानपणापासूनच तिला नाटकात कामे करण्याची इच्छा होती. आणि तेच ध्येय उराशी बाळगून ती हंगेरीला आली होती. विद्यापीठातून बाहेर पडल्यावर तिने खूप नाटकांतून कामे केली. आणि काही काळानंतर ती नाटकातून निवृत्त झाली. तिने चित्रपटात कामे करण्यास सुरुवात केली. 'डिस्कॉर्ड' हा तिचा पहिला चित्रपट. त्यानंतर तिला अनेक चित्रपटांतून प्रमुख भूमिका मिळाल्या. 'सन्डे रोमान्स' (रविवारचे प्रेमप्रकरण) ह्या चित्रपटातील एका खेडुत तरुणीच्या भूमिकेने तिला प्रसिद्धीच्या शिखरावर आरूढ केले. यानंतरचे तिचे चित्रपट म्हणजे 'दानी', 'फिवर' आणि 'डान्स माकाब्रे' हे होत.

'दि हाऊस अंडर दि रॉक्स' ह्या दुसऱ्या महायुद्धानंतरच्या हंगेरीमधील सामाजिक परिस्थितीवर आधारलेल्या चित्रपटातील तिच्या भूमिकेला सान्फ्रान्सिस्को येथील चित्रपट महोत्सवात, उत्कृष्ट स्त्री-भूमिकेचे विजय-चिन्ह तिला मिळाले. प्रस्तुत चित्रपट आणि तिने काम केलेले आणखी दोन चित्रपट—मिलिटरी बॅन्ड आणि सन्डे रोमान्स—मी पाहिले आहेत. ह्या तीनही चित्रपटांतील तिच्या भूमिका, तिच्यामध्ये असलेल्या अभिनय गुणांची खात्री करून देतात.

'लॉस्ट पॅराडाईज', 'फातिया नगारा', 'अ कोझी लिटल् कॉटेज', 'अनडिस्टर्बड् हॅपिनेस' आणि 'एव्हिडन्स' हे तिचे हल्लीचे चित्रपट. ह्या चित्रपटात काम

करत असतानाच तिन पुन्हा रंगमंचकावर पदार्पण केले. ती बुडापेस्ट नॅशनल थिएटरची प्रमुख सभासद आहे. हंगेरियन साहित्यातील 'क्लासिक' समजल्या जाणाऱ्या 'बॅन्क बॅन' ह्या नाटकातील तिच्या प्रमुख भूमिकेने तिला पुन्हा एकदा प्रसिद्धीच्या शिखरावर आरूढ केले.

## □ अन्ताल पाजेर

आपल्याकडे राष्ट्रीय अभिनय सम्राट म्हणून कुणा नटाचा सन्मान केल्याचं मला तरी आठवत नाही. पण इतर देशांत अशा प्रकारचा सन्मान जरूर केला जातो. हंगेरीत अन्ताल पाजेर या नटाचा असा सन्मान करण्यात आला आहे. अन्ताल पाजेर याने अजूनपर्यंत सुमारे एकशे पंचवीस चित्रपटांत मुख्य भूमिका केल्या आहेत आणि त्यांतील जवळ जवळ साऱ्याच अभिनयदृष्टचा गाजल्या आहेत.

गेली सत्तेचाळीस वर्षे पाजेर नाटक आणि चित्रपट व्यवसायांत अभिनेता म्हणून आपलं स्थान टिकवून आहे. पाजेरचे वय आज सदुसष्ट वर्षांचे आहे. २६ जानेवारी १८९९ मध्ये हंगेरीतील 'मकाव' या छोटचा गावी त्याचा जन्म झाला. त्याला वकील आणि चित्रकार व्हायची इच्छा होती. पण विद्यापीठात असतानाच त्याने अभिनयात आपले वैशिष्टच प्रकट केले होते. गेल्या सत्तेचाळीस वर्षांत त्याने अनक नाटके, संगीतिका आणि चित्रपट यांत विविध प्रकारच्या भूमिका केल्या आहेत.

दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी पाजेर अर्जेन्टिनाला गेला. तेथे तो बारा वर्षे होता. या काळात त्याने चित्रकाराचा व्यवसाय केला. इ. स. १९५६ साली तो पुन्हा हंगेरीत आला.

झोल्टान फाब्री या प्रसिद्ध दिग्दर्शकाच्या प्रत्येक बोलपटात पाजेरला मुख्य भूमिका असतेच. पाजेरने रावापासून रंकापर्यंत विविध प्रकारच्या भूमिका वठवल्या आहेत. 'स्कायलार्क' ह्या चित्रपटातली कुरूप मुलीच्या बापाची भूमिका एक अविस्मरणीय भूमिका म्हणतो येईल. याच भूमिकेबद्दल त्याला 'कान'च्या चित्रपट महोत्सवात १९६४ साली उत्तम अभिनयाचे मानचिन्ह मिळाले होते.

गेल्या वर्षी मॉस्को चित्रपट महोत्सवात झोल्टान फाब्रीच्या 'ट्वेंटी अवर्स' या चित्रपटाला उत्तम चित्रपटाचे मानचिन्ह मिळाले होते. ह्या बोलपटातील त्याची भूमिकाही त्या वेळी फार गाजली.

आपल्याकडील बाबुराव पेंढारकर किंवा अशोककुमार ह्यांच्याशी अन्ताल पाजेरची सहज तुलना करता येईल.

● ● ●

# प्र ति ष्ठा न. . . . .

आपल्या अर्थव्यवस्थेचा एवढा क्रांतिकारक कायापालट चालू स्थितीत होऊ शकतो का? आजचे नेतृत्व येत्या दहा वर्षांत हे कार्य करू शकणार आहे का?

-प्रत्येकाने आपले अंदाज ठरवावेत.

पण एक गोष्ट स्पष्ट आहे. अंदाज बांधून स्वस्थ राहण्यापेक्षा अधिक काहीतरी प्रत्येकाने आपापल्या कुवतीनुसार करण्याची ही वेळ आहे, काळाची निकडीची हाक आहे. राजकीय स्वातंत्र्याप्रमाणेच आर्थिक स्वातंत्र्याचा लढाही अखेरीस सर्वसामान्य माणसाने आपला मानला पाहिजे. यातील आपला वाटा कोणता हे ठरवून तो उचलण्यास तयार असले पाहिजे.

सेतुबंधनाचे वेळी आपल्या अंगावर मावेल एवढी वाळू समुद्रात नेऊन टाकणाऱ्या रामायणातल्या त्या इवल्याशा खारीइतका तरी पुण्यसंचय आपण करू शकतो, नाही का?

यासाठी योजले आहे–

माणूस प्रतिष्ठान.....

[माणूस फौंडेशन].....

एक नवी कल्पना –

आर्थिक शिस्तीचा एक वेगळा प्रयोग.

एक विधायक प्रयत्न. —*संपादक*

☐ *या कल्पनेचा अधिक विस्तार मात्र पुढील अंकी.*

☐ *हा पुढचा अंक १ व १५ जुलैचा मिळून जोड अंक निघेल.*
*तो १० जुलैला प्रकाशित होईल.*
*वाचक व विक्रेते यांनी कृपया याची नोंद घ्यावी.*

MANOOS ( Fortnightly ) : 15 June 66 : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर